सहामाही „ २ „ ८

साल अखेर „ ७ „ १ ८८

किरकोळ अंकास ....................... ८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........ ८१ ०६

दुसरे खेपेस .... ........ ८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Six monthly......... 3 ............... 3 as

Single copy .................................. 4as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ...... 4 as

Repetition Per line ... 3 as

VOL XXXI AKOLA MONDAY 6 DECEMBER 1897 NO 47

वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख ६ माहे डिसेंबर सन १८९७ इ० अंक ४७


## देशी स्त्रियांच्या कलाकुशलतेच्या कामाचें प्रदर्शन.

पुढील महिन्याच्या ह्मणजे दिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत उमरावती येथें हिंदुस्थानांतील सर्व भागांतून प्रमुख लोक येणार आहेत; व त्यांचा मुक्काम येथें चार पांच दिवस होईल. या प्रसंगीं ठिकठिकाणच्या स्त्रियाही बऱ्याच येतील असा संभव आहे. अशावेळीं स्त्रियांनीं केलेल्या कलकुशलतेच्या कामाचें प्रदर्शन केल्यापासून स्त्रियांच्या कौशल्यास उत्तेजन दिल्यासारखें होऊन शिवाय इतर बरेच फायदे होण्याचा संभव आहे, असें दिसून आल्यावरून तशा प्रकारचें प्रदर्शन (ह्मणजे पुण्यास सन १८९५ साली दिसेंबर महिन्यांत झालेल्या प्रदर्शनाच्या धर्तीवर) करण्याचा विचार ठरला आहे.

हें प्रदर्शन तारीख २७ दिसेंबर सन १८९७ पासून तारीख २ ज्यानेवारी सन १८९८ पावेतों उघडें राहील. या प्रदर्शनांत लोकरीचीं वीण कामें—(ह्मणजे गळपट्टे, टोप्या, ज्याकिटें, आसनें फुलें, चित्रें, इ०) कानव्हस वर केलेलीं कामें, पोतीचीं कामें दोऱ्याचीं, रेशमाचीं व जरीचीं काशिद्याचीं कामें वगैरे कामें ठेवण्यांत येतील. व जी परीक्षक मंडळी नेमली जाईल ती जीं कामें पसंत करील त्यांस बक्षिसें देण्यांत येतील.

तरी सर्व एतद्देशीय स्त्रियांस विनंती आहे कीं ज्यास ही कामें करितां येत असतील त्यांनीं नमुने तयार करून प्रदर्शनांत ठेवण्यासाठीं पाठवावे. ज्या स्त्रियांजवळ पूर्वीं तयार केलेले नमुने असतील त्यांनीं ते पाठविण्यास हरकत नाहीं. मात्र पूर्वीं एखादे प्रदर्शनांत त्यास बक्षिस मिळालें असल्यास तसें कळवावें

पदार्थ उमरावतीस तारीख २० दिसेंबरच्या पूर्वीं दाखल झाले पाहिजेत. पदार्थ पाठवितेवेळीं या बरोबर एक पत्र असावें. त्या पत्रांत पदार्थ तयार करणाऱ्या स्त्रीचें पूर्ण नांव व पत्ता असून पदार्थ विकण्याची इच्छा आहे किंवा नाहीं व असल्यास काय किंमतीस विकला जावा या विषयींचा खुलासा असावा.

ज्या स्त्रियांस प्रदर्शनांत ठेवण्यासाठीं पदार्थ पाठविण्याची इच्छा असेल त्यांनीं आपण कोणते पदार्थ पाठविणार या विषयीं आगाऊ तारीख १० दिसेंबरच्या पूर्वीं कृपा करून कळवावें. हीं पत्रें येतील त्या धोरणावर प्रदर्शना संबंधानें एकंदर व्यवस्था करण्यांत येईल. वेळोवेळीं ज्या कमजास्त व्यवस्था होतील त्या जाहीर करण्यांत येतील.

उमरावती तारीख २४।११।९७

| | |
|---|---|
| फुलमणी बाई काणे. | द्वारकाबाई वैद्य. |
| जानकीबाई मुंडले. | वेणूबाई नामजोशी |
| सोनाबाई मेहरबान. | लक्ष्मीबाई सरंजामे. |
| काशीबाई केतकर. | कृष्णाबाई बिवलकर |
| यमुनाबाई चिटणीस. | राधाबाई मुधोळकर |
| सावित्रीबाई जोशी. | गंगुबाई जोशी. |

ताजा कलम—पत्रें पाठविणें व पदार्थ पाठविणें ते पुढील पत्यावर पाठवावे:— सौ० गंगुबाई जोशी यांस, रा रा मोरो विश्वनाथ जोशी हायकोर्ट वकील यांचे बंगल्यावर उमरावती क्यांप मध्यें देणें.


## दुर्मिळ संधी

(मार्च १८९८ अखेर पर्यंतच)

नानालहरी— मासिक पुस्तक १८९७ जानेवारी पासून निघते यांत विद्वानांचे, अत्यंत मनोहर, चटकदार संग्रहणीय निवडक निवडक विषय येत असतात. वर्षाची ट. ख. सह वर्गणी ८९, अगाऊ पाठविणारास अगर पहिला अंक व्ही. पी. नें मागविणारास ८८ चें मनोरंजक अत्युत्तम स्त्रीचरित्र अवघ्या ८२ स मिळेल.

मराठी विद्या—लहान मुलाला व ढ मनुष्यास देखील बालबोध मोडी उत्तम लिहिण्यावाचण्याला शिकवून देणारे असून यांत असा प्रयोग आहे कीं, त्यानें मोडी अक्षर सुरेख व तात्काळ वळते. किंमत ८१० दोन प्रती घेणारांस हरहुन्नर, औषधी, पक्वान्नादि अत्युपयुक्त माहितीचें ८१२ चें 'व्यवहारमंजरी' पुस्तक इनाम.

कर्नाट महाराष्ट्र भाषामंजरी —गानें मराठी जाणणारांस कानडी अगदीं सप्रमाण, शुद्ध व उत्तम लिहितां वाचतां बोलतां येईल. व कानडी जाणणारांस मराठी भाषेचें पूर्ण ज्ञान होईल. किंमत ८१२ दोन प्रती घेणारांस बिरबल बादशहाच्या गोष्टीचें १ रुपयाचें पुस्तक इनाम.

गुप्तविद्याज्ञान—यांत गुप्त व अप्रसिद्ध ज्योतिष, हुन्नर, मंत्र इ० आहेत. २ प्रतींचीं किंमत १ रुपया.

इंद्रजाल—ह्यांत मंत्र, तंत्र, जादू इत्यादि अद्भुत अल्पसाधनी क्रिया आहेत २ प्रतीची किंमत ८१२ ही १८१२ चीं ४ पुस्तकें घेणारास 'रामविजयकथासार' ८१२ चें पुस्तक इनाम.

या शिवाय तऱ्हतऱ्हेचीं पुस्तकें आमचे कडे विकत मिळतील ट. प्या. व्ही. पी. खर्च निराळा.

नानालहरीचे प्रकाशक

पोष्ट–गड इंग्लज येथें इ० कोल्हापूर.


ECHOES

How sweet the answer Echo makes
To Music at night
When, roused by lute or horn, she wakes,
And far away o'er lawns and lakes
Goes answering light!
Yet Love hath echoes truer far
And far more sweet
Than e'er, beneath the moonlight's star,
Of horn or lute or soft guitar
The songs repeat.
'Tis when the sigh,—in youth sincere
And only then,
The sigh that's breathed fo. one to hear—
Is by that one, that only Dear,
Breathed back again.

*T. Moore.*

प्रतिध्वनी

किती तरी मनोज्ञ तो प्रतिरस सुगीत ध्वनी
सुकोमल विपंचिका स्वमरें उठे जो वनी!
परिज्जल सुशांत तें जयिं अतें निशा निश्चला
अहा! बहुत सौम्य तो प्रति निनाद रानांतला ॥ १ ॥
तथापि अनुरागज स्वन व तत्प्रतिध्वान तो
अकृत्रिम मनोज्ञही अधिक त्याहुनी भासतो।
विपंचिरव वेणुचा स्वन सतार वा त्यापुढें।
कशास वदणें वृथा दिसती सर्वही बापुडें ।२
निशा शशि कर प्रभा-विकसिता तदा यौवनी
अकृत्रिम ह्वदी उठे सरल राग जेव्हां मनी।
विशुद्ध अनुराग हा सुतनु जाणुनी त्याजला
प्रति प्रणय दाविते ध्वनिस या नसेची तुला ॥ ३ ॥

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशिर्ष शुद्ध १३ शके १८१९

राजद्रोहाचे वर्तमानपत्रकर्त्यांवरील खटले अखेरीस संपले हें दुःखांत सुख होय. नामदार टिळकांचें अपील रद्द झालें. प्रतोदकर्त्यांच्या अपिलांत दोषस्थापन कायम होऊन काळेपाण्याच्या शिक्षेच्या ऐवजीं एक वर्षाची व तीन महिन्यांची शिक्षा हायकोर्टानें कायम ठेविली, मोदवृत्तकर्त्यांस ९ महिन्यांची साधी कैद सांगण्यांत आली, पुणेवैभवकर्त्यानें क्षमा मागितली आणि त्यावरून त्यास सोडून देण्यांत आलें. राजद्रोहाच्या लेखाबद्दल हे अखेरचे खटले होते असें भविष्यकालच्या इतिहासावरून राज्यकर्त्यांच्या ध्यानांत येईल अशी आह्मी उमेद बाळगतों. इंडियन लोक राजनिष्ट आहेत या विषयीं कोठेंच मतभेद नाहीं. शिक्षा पावलेले पत्रकारही राजद्रोही नाहींत आणि ते राजभक्त आहेत ही गोष्ट देखील सर्वमान्य आहे. नेटीव पत्रकर्ते आपल्या लेखानें राजद्रोह पसरतात अशी सरकारास शंका आली आणि पिनलकोडाच्या आधारें सरकारानें वर्तमानपत्रांतील लेखाविषयीं लोकांच्या मनांत दहशत बसविली हें निर्विवाद आहे. सरकारा विषयीं द्वेष, मत्सर, किंवा द्रोह उत्पन्न न होईल असे लेख असले पाहिजेत हा उपदेश, वरील खटल्यांनीं उदाहरणासह शिकविला. पत्रकाराचे स्वातंत्र्याची कल्पना आलिकडील १०।१२ वर्षांत मोठी विस्तृत झाली होती ती निरास केली. सरकारच्या अशा कृतीनें राजद्रोह बंद होत नसतो पण इंडियन लोकांची राजनिष्ठा राजद्रोहाला स्थळ मिळूं देत नाहीं. लोकमताला कोंडून ठेवण्यांत आलें आणि पत्रकारांची स्वतंत्रता अशी संकोचित झाली. सरकारची मर्जी ह्मणजे जवळ जवळ ईश्वराचीच आज्ञा होय तेव्हां तिला शिरसावंद्य समजून आह्मी इतर नेटीव पत्रकारा प्रमाणें वागण्याचा निश्चय केला आहे. स्तुतीपाठा सारखें दुसरें औषध नाहीं.

तेराव्या राष्ट्रीय सभेच्या सेक्रेटरीस नामदार आलफ्रेड वेब साहेबांचे पत्र आलें आहे त्याचा आशय असा आहे:-

प्रीय मित्रहो.

मी जरी आपल्या पासून फार अन्तरावर आहे व जरी मला आपल्या फारसे उपयोगी पडवत नाहीं तरी माझें मन आपल्या बरोबर आहे. आणि लवकरच भरणाऱ्या राष्ट्रीय सभेबद्दल माझी कळकळ आणि राष्ट्रीय सभेला यश यावें अशी अन्तःकरण पूर्वक इच्छा ही प्रदर्शित केल्या वाचून राहवत नाहीं.

हिंदुस्थानचे सर्व देशाभिमानी व परोपकारी राष्ट्रीय भक्त व आमच्यातले आपल्या बद्दल कळवळा बाळगणारे सर्व लोक यांची अशी खात्री झाली आहे कीं आपल्याला मोठ्या संकटाचे (जरी धोक्याचे नव्हते) तरी दिवस आले आहेत.

हिंदुस्थानच्या दुःखद स्थितीमुळें आह्माला स्वार्थत्याग आणि नेटाचे परिश्रम करणे आज जरूर आहे.

रोगाची साथ, दुष्काळ आणि त्यांत सुशिक्षित लोकांनीं ज्या लष्करी पद्धती बद्दल आपली नाखुषी नेहमी दाखविली आहे, अशी लष्करी पद्धती व तिच्यामुळें लोकांवर पडणारा बोजा या सर्व कारणांनीं अधिकारी वर्गाकडून उदार तऱ्हेचे वर्तन व्हावयाला पाहिजे होतें (पण तसें न होतां उलट पक्षी अधिकारी वर्गाची) उद्दाम तऱ्हेची ताठ्याची व अविचाराची वागणूक मात्र नजरेस येते हे. राष्ट्रीय सभेच्या कैवाऱ्यांचे श्रम शिथील व्हावेत अशी ही वेळ नव्हे अशा वेळीं राष्ट्रांतील विचारी व स्वतंत्र तऱ्हेनें विचार करणाऱ्या लोकांचे विचार मोकळ्या मनानें प्रदर्शित होऊं नयेत, तसले विचार जागच्या जागीं जिरून जावेत, असें ज्यांनां वाटतें ते देशाची शांतता-प्रगती-निरनिराळी राष्ट्र वर्ग व धर्म यांचा परस्पर प्रेम

संबंध या सर्वांचे हितचिंतक नव्हेत (तर हित शत्रू होत.). वर्तमान पत्रांतून, विश्वविद्यालयातून व शाळांतून उदार विचारांचा होत असलेला प्रसार व पाश्चात्य सुधारणेच्या कल्पना व हिंदुस्थानच्या सुधारणेच्या कल्पना यांचें होत असलेलें एकीकरण ह्या दोन्हीही गोष्टी अशा तऱ्हेनें घडून आल्या आहेत कीं आतां आपली प्रगती निराळ्या तत्वावर बसविणें अगर राष्ट्राला निराळें तऱ्हेचें वळण देणें अशक्य झालें आहे. आमची व आपली प्रगती अथवा अधोगती बरोबरच झाली पाहिजे. आह्माला आपल्यापासून पुष्कळ शिकावयाचें आहे. आपल्यालाही आह्मापासून पुष्कळ शिकावयाचें आहे.

या पिढींत १९ व्या शतकाच्या शेवटीं हिंदुस्थानवासी लोकांना एकल्यांनाच मानहानीचीं नसलीं तरी निराशेचीं कडू फळें चाखावीं लागत नाहींत. आपल्याला धैर्य धरलें पाहिजे; आणि चांगल्या तत्वांचा शेवटीं जय होणार अशी पक्की खात्री बाळगली पाहिजे.

कसेंही असलें, तरी समाधानाची व उन्नतीची गोष्ट ही कीं जुलूम करणाऱ्या पेक्षां जुलूमाखालीं राहणारा बरा, आणि किंबहुना श्रीमंतींत लोळणाऱ्या धनाढ्य थोर पुरुषाला जेवढा कर द्यावा लागत नाहीं तेवढ्या कराखालीं चक्काचूर होऊन गेलेली अती दीन प्रजा होणें बरें.

हिंदुस्थानच्या लोकांचें दारिद्र्य व आमच्या कडच्या लोकांची साधारण बरी स्थिती यांचा माझ्या मनांत जेव्हां विचार येतो (कारण आयर्लंडांत आह्मी लोक तुमच्या लोकांचे उत्पन्नाचे दुप्पट पैसा मादक पदार्थ सेवन करण्यांत खर्च करितो) तेव्हां जें राष्ट्र तुमच्या दारिद्र्यावस्थेंत तुह्माला मदत करण्याचें एकीकडेच ठेवुन तुमच्यापासून पैसा काढतें त्या राष्ट्राचें रहिवाशी ह्मणविण्यास मला खरोखर लाज वाटते.

जसजसा आपल्याला अनुभव जास्त येत जातो तसतशी अति शाहाण्या व मोठ्या मनुष्याच्या वाक्याची सत्यता जास्त कळून येते. "माझें राज्य [सत्य न्याय आणि शांतता यांचें] या जगांतलें नव्हे पण आपण होता होईल तो तसलें तऱ्हेचें राज्य येथें होण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

"इंपिरियल पार्लमेन्ट" ह्मणजे न्याय मिळण्याचें शेवटचें कोर्ट यांत. हिंदुस्थानचे लोकांचे प्रतिनिधी नसून हिंदुस्थानचें राज्य करणें किती अन्यायाचें व बेकायदेशीर आहे. ही गोष्ट इंग्लीश राष्ट्राचे नजरेस आणून देण्याचे कामीं आमचे प्रयत्न चालूं पाहिजेत.

आमचें लोकमत व आपलें लोकमत यामध्यें अधिकारी वर्गानें तयार केलेल्या परस्पराविषयीं गैरसमजुती, सामाजिक, नैतिक व धार्मिक भेदबुद्धी यांनीं परिप्लुत असा जो एक तऱ्हेचा आडपडदा आहे तो नाहींसा केला पाहिजे.

आपला ह्मणजे राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांचा व तिच्या पक्षाच्या लोकांचा व पुष्कळ मित्रमंडळीचा व तसाच सर्व लोकसमुदायाचा—जो लोकसमूह मोठ्या शांततेनें दुःखांत दिवस काढीत आहे [अशा तऱ्हेची शांतता आणण्याकरितां आमच्याकडे सतत प्रयत्न चालूं आहेत] या सर्वांचा सहवास मला घडून त्यांच्या विचारासारखे विचार करण्याला शिकलों ह्मणजे हा मी मोठा हक्क मिळविला असें समजतों.

आपला

आलफ्रेड—वेब

---

आमच्या कांग्रेसला प्लेगचें एक नंगीच गडांतर आहे. यातून ती पार पडे पर्यंत मनाला स्वस्थता वाटणार नाहीं हें उघड आहे. तरी रिसेप्शन कमिटीनें नुकतेंच गणित करून इष्टानिष्ट ग्रह पाहिले त्यांच्या गणितांत या गंडांतराची भीति नाहीं असें वर्तविलें आहे. आह्मा हिंदुलोकांची ज्योतिषावर अति श्रद्धा आहे, आणि ह्मणून आमची चिंता बरीच दूर झाल्या सारखी आहे. आमचे राज्यकर्ते रेसिडेंट व कमिशनर साहेब बहादूरादिकरून सर्वजण प्लेगादिकाची पीडा न होता, राष्ट्रीय सभेसारखें, दांडगे काम यथासांग होऊन सर्वांना यश मिळावें अशा बद्दल फार झटत आहेत सध्यां प्लेगची दहशत चोहोंकडे महशूर आहेच. तिच्या पायाचें नखही इकडे दिसू नये ह्मणून क्वारंटान व इतर प्लेग नियम फार कडक रीतीनें अंमलांत आणण्या विषयीं खबरदारी घेतली आहे.

दुष्काळ आणि प्लेग यामुळें कांग्रेसच्या बद्दल जीव धाकधुक करीत होता. पण आतां काडीइतकीही भीति बाळगण्याचें काम दिसत नाहीं. आमचे सरकार आह्मा साठीं जिवापाड श्रम घेतात आणि आपण व आपल्या गोष्टी यांचा त्यास फार अभिमान वाटतो. तर याचें चीज करून दाखविणें आपणाकडे आहे. आपल्या सरकारचें पाठबळ असल्यावर मग मनांत शंकाच ठेवण्याचें कारण नाहीं. ज्या लोकांनीं वर्गणी अद्याप दिली नसेल त्यांनी यथाशक्ती मनोभावानें द्रव्यद्वारा जो हातभार लावावयाचा आहे तो त्यानीं लवकर लावावा, आणि या राष्ट्रीय कामाची एकदिलानें छान उभारणी करून श्रेय घ्यावें.

कांग्रेसला येणाऱ्या इतर प्रांतस्थ लोकांनां आमची एक प्रार्थना आहे. प्लेगग्रस्त प्रांतांतील लोकांनीं न येण्याची तसदी घ्यावी. त्यांना कांग्रेसची कळकळ फार आहे व त्यांचे डोळे इकडे लागतील यात संशय नाहीं. त्यांना वर्तमानपत्रद्वारा सर्व हालहवाल कळेलच, तर प्लेग विषयीं भिऊनच रहावें हें बरें. अशुभ बोलूं नये पण नेम नाहीं. ह्मणून त्यांनीं आपला व तसाच आमचाही जीव धोक्यांत घालूं नये असें आग्रह पूर्वक सांगणें आहे. राष्ट्राच्या कामा साठीं त्याना देहाची पर्वा नसेल खरी परंतु अशा तऱ्हेनें तो खर्ची पडावे यांत राष्ट्राचें व कोणाचेंही हित नाहीं. एखादेवेळीं ज्या साठीं त्यांची एवढी दगदग, त्या राष्ट्रीय कामालाच, त्यांच्या चांगल्या पण भलत्याच हट्टानें, खो बसण्याचा संभव आहे. ही आमची विनंती ते चांगला विचार करून मान्य करतील व आपल्या घरांतील व बाहेरील लोकांचा जीव संकटांत घालणार नाहींत अशी आशा आहे.

सध्यांच्या संकटाच्या व आणिबाणीच्या वेळीं आमच्या वऱ्हाडी लोकांनीं कांग्रेस सारख्या कामाला हात घातला आहे व त्या साठीं ते हरप्रयत्न करून तें काम उत्तम रीतीनें तडीस नेतील तर तें त्यांस अमूल्य भूषण होईल, सरकार अगदीं अनकूळ जरी नसेल तरी आंतून अन्य रीतीनें तें प्रतिकूळ नाहीं व होता होईल तों ते मदतच करतील. हें धाडसाचें काम आह्मी सरकारच्या जोरावर हिंमत धरून करण्यात एक पायावर उभे आहों; आतां हें निर्विघ्नपणें शेवटास नेऊन आपली बाजू राखणें हें ईश्वराकडे आहे व तो आह्माला यश देणार अशी आमची मनोदेवता सांगते.

---

## वर्गणीचा महिमा

समाजामध्यें आपल्या अनिच्छेनें आपणास स्वयंभूत लाभ पुष्कळ होत असतात. या लाभा बद्दल आपण समाजाला ऋणी असलें पाहिजे; आणि हें ऋण फेडण्याची संधी सार्वजनिक कार्याच्या वेळीं प्राप्त होते. सार्वजनिक कार्याची व्याप्ति, विषय, व उपयोग या मानानें त्या कार्याला लघुपणा किंवा गुरुपणा येतो; आणि कार्याच्या महत्वाच्या मानानें आपणांवर तद्विषयक ऋणाचा भार हलका किंवा वजनदार असतो. ज्या ऋणाची फेड करणें कायद्यानें भाग आहे तें दिल्यानें कोणी काहीं कृतकृत्य होत नाहीं. तो तसें न करील तर त्याच्यावर कायद्याच्या शिक्षांचा अंमल चालतो आणि त्या दुःखांस भिऊन ऋणमुक्त होणारा प्राणी समाजांतल्या नीच कोटीचा होय.

परंतु ज्या ऋणाला नैतिक बंधनें आहेत त्या ऋणाच्या संबंधानें मनुष्यमात्राची जबाबदारी मोठी आहे. जो ज्या मानानें हें देव, ऋषि, पितृ इत्यादिकांचें ऋण फेडतो त्या मानानें तो खरा नीतिसंपन्न, कुलीन, व लोकमान्य ठरतो. अशाच लोकांवर समाजाची मोठी भिस्त असते इतकेंच नाहीं तर त्यांच्या सत्कृतीनेंच समाज सुस्थित व उन्नत होतो.

सार्वजनिक कार्याची उभारणी एक दोन व्यक्तींच्या हातून होत नाहीं. व्यक्ति समूहाच्या एकीकृत कृतीचा परिणाम सार्वजनिक कार्य होय. अशा कार्याला मदत करण्याचे पर्याय अनेक आहेत, ज्याला ज्या साधनांची अनुकूलता असेल त्यानें त्या साधनांचा सदुपयोग सार्वजनिक कार्याकडे केला पाहिजे. विद्यादि साधनें प्रस्तुत पुष्कळ उपलब्ध आहेत परंतु मोठी नड द्रव्यबलाची पडते. द्रव्याचा जोर चालत नाहीं असा दुनियेंत प्रांतच नाहीं. द्रव्य काहीं अजब शक्ती आहे आणि त्या द्रव्याची जो मदत करितो तो सार्वजनिक कार्याचा खरा पुरस्कर्ता होय. वर्गणी ह्मणजे द्रव्यद्वारा मदत आहे. वर्गणी देणारा गृहस्थ आपण स्वतां ऋणमुक्त होतो इतकेंच नाहीं तर तो स्वतांचा थोरपणा सहजीं दर्शवून समाजाला भूषणास्पद व आधारभूत होतो.

प्रस्तुत राष्ट्रीय सभेच्या कार्याची उत्तम संधी वऱ्हाड प्रांतस्थ जनसमूहास आली आहे. राजकीय उन्नतीच्या दृष्टीनें राष्ट्रीय सभा सर्वव्यापी व अत्यंत उपयुक्त संस्था आहे. तिच्या निमित्त आपणाला कृतकार्य झालें पाहिजे. आमच्या प्रांतांतील अग्रणी, देशाभिमानी व उदारचरित लोकांच्या अतूल परिश्रमानें राष्ट्रीय सभेचा शुभ समय या प्रांतीं मोठा उत्सवकारक व आनंदकारक होणार आहे. तेव्हां सामान्य जनाचें कर्तव्य आपल्या पुढारी मंडळीस पाठबळ देण्या संबंधानें आहे. मोठ्या आनंदाची गोष्ट कीं आमच्या प्रांतस्थ लोकांच्या वर्गणीच्या अभिवचनावरच चालू असलेली राष्ट्रीय सभेची वार्षिक उभारणी वऱ्हाडांत होत आहे.

वर्गणी देणें हें सत्कृत्य आहे. जे राष्ट्रीय सभेला वर्गणी देतात त्यांस आह्मी राष्ट्रीय संतमालेंत गणतों. ज्यांनीं उदार प्रेरणेनें वर्गणी विषयीं वचन दिलें आहे ते समाजांतल्या उच्च कोटींतले लोक असल्यामुळें ते आपल्या वचनाची मातब्बरी ओळखून असतात. वर्गणीचीं कामें सार्वजनिक असतात ह्मणून ती वर्गणी अगदीं वेळेवर दिली ह्मणजे तिचें दुप्पट-महत्व वाढतें. वर्गणी गोळा करण्याचे श्रम व वेळ वांचतो. रोख पैसा हातीं येत गेल्यानें कार्य सुलभतेनें व जोरदारपणें होतें. आणि एकाच्या तत्परतेनें व उदारपणानें दुसराही वर्गणी नीटपणें व योग्य वेळीं देतो. तथापि आह्मी ही गोष्ट विसरतां कामा नये कीं वर्गणी ह्मणजे पैशाची बाब होय. पुष्कळ मी मी ह्मणणारे लोकांचे पैशाच्या ठिकाणीं उपाय हरतात मनाप्रमाणें पैशाची सोय होत नाहीं आणि संसारांच्या अडचणी ही पुष्कळ असतात. लौकिकाची चाड बाळगून जे वर्गणीचे आंकडे घालतात आणि वेळेवर पैशाच्या अभावामुळें पंगु व दीनवदन होतात ते खरोखर दयेला पात्र आहेत. परंतु ज्यांची मनःप्रवृत्ती संदीप्त नाहींत, द्रव्याच्या लोभानें जे उदारभाव मोड करितात, आणि वर्गणीदानाला नकार सांगतात त्यांस आह्मी मोठा दोष देतों. त्यांचीं मनें सत्कार्यांत गढून रत नाहींत ही समाजाची निकृष्ठ स्थिती होय. सार्वजनिक वर्गणी गोळा करण्याचें काम मोठ्या युक्तीनें व गोडीगुलाबीनें जितकें उत्तम होतें तितके वर्तमानपत्रांत व्यक्तीचे दोषाचा स्फोट करण्यानें होत नाहीं. थोडी विशेष सहिष्णुता ठेविली पाहिजे आणि सत्कार्याच्या माहात्म्यावर लोकांची मर्जी राखून पैसा गोळा केला पाहिजे. राष्ट्रीय सभेच्या वर्गणीदारांस आमची सविनय प्रार्थना आहे कीं त्यानीं आपापल्या वर्गण्या सत्वर देऊन राष्ट्रकार्य यशस्वी करावें व त्या गोष्टीचा बहुमान आपणा साठीं संपादावा.

---

The Berar Sumachar

MONDAY DECEMBER
6 1897

---

The Hindu Law is rich in its literature and legal acumen. It regulates a highly valuable social life on the scientific basis of a family. The law is comprehensive in its width and range. It is however losing in its utility as times and circumstances bring about new phases of life. The old law is however not adaptable to all sets of possible circumstances. Modern times have introduced a civilizing agency on western principles. Life has been moulded in different channels of development due to the advance in material wealth. The crude ways of living are fast giving way to the new ways of a refined society. The old unit of the social fabric was a joint and common family. New surroundings have evolved an individualistic life as opposed to that of the old archaic family. The tendencies of modern

times are most favourable to make an an individual one unit in the Hindu society. The old frame of social living has crumbled down and in these days of hard competition and struggle for bread each one has to make a living for himself. In days of yore when agriculture was the main and sole profession of the masses at large every member contributed to the general fund of the family and was thus freely admitted to the blessings of a joint family. But circumstances have changed the whole atmosphere of a Hindu home. Equality does not continue in respect to the earnings of the able-bodied persons in the family. Inequality is the result of the individual freedom and free competition of the modern day. The old family in its joint and undivided nature is no more a blessing and the new aspects of the present life have introduced a dividing element in the family. Self-acquisitions are more universally favoured in these days. A man feels himself more at liberty when he thinks that his gains will be his and the other members of his family will have no claim over them. In order to introduce this vivifying principle of acquiring money for one's self and to create a new stimulus to private industry and enterprise a new bill of the Hindu Gains of learning has been put on the legislative anvil at Madras as an experimental measure. The aim of this bill is to anglocize the whole trend of Hindu life. We have our own objections to this new piece of legislation. In the first place, the Hindu Law will lose its intrinsic excellence if it be codified in parts only. The proposed codification will shift the very foundations of the Hindu Law. No doubt, case-law has played an important part in its administration. The whole law as it stands in its present scattered form has arrived at that stage when it should be codified in a complete, universal and acceptable form. Secondly, we have not sure indications with us that the individualistic and contractual tendencies of the day are an improvement upon the old ways of social and mutually sympathetic states of life. We can not augur well for the future because in the western principle we foresee the development of a killing power to give sovereignty to the theory of the 'survival of the fittest'. To our plain minds this is not the best state of life we can achieve. Thirdly, we oppose the measure of the Madras—reformers on the ground of sentiments. The bill proposes to give one a free and large control over the disposition of his property. He is authorized to raise the position of woman as a powerful queen over his earnings. We make a widow a less dependent member in the family and save her from the hard lot to which she is often subjected in a Hindu house. This advantage is well nigh set at naught when we stop the very springs of sympathy, fellow-feeling and a morally influential Government of something like a patriarch. It is not that we wish to minimize the evils of a joint family-life. But we are not prepared to welcome such a change as the recent bill at Madras has in view. Fourthly, if time has been bringing forth the changes which the bill proposes to introduce we fail to see the necessity of accelerating this smooth process of a new life by the help of legislation.

---

At Allahabad, Lord Elgin has well expressed his opinion about the importance of the ways in which the last experiences of the famine should be utilized to provide a preventive measure for a future occasion of famine. He remarks thus:—

"I think I may safely join you in the congratulations you have expressed that the clouds are now rolling away from the horizon. There is one piece of work which the Government of India still has to do, that is to make sure that the experience gained will not be forgotten. The famine of this year has been very widespread, and the work in different provinces has been performed under different conditions. It is therefore a unique opportunity, which we do not wish to let slip, and we propose shortly to institute an inquiry not into the success or failure of the operations—for we maintain that their success has been amply established—not to put any one on his defence—but to collect and to collate for the benefit of those who will have to deal with the next famine—may it be far distant—and to enable them to apply to it the experience of the present."

---

## वऱ्हाड

हवामान—थंडी चांगली कडाक्याची पडूं लागली आहे. पीकपाण्याची हवाल सध्यां ठीक आहे. सार्वजनिक आरोग्यही असमाधानकारक नाहीं.

रा० रा० लक्ष्मण गोविंद ऋषी, डिपुटी इनस्पेक्टर, वाशिम यांची बदली इलिचपूर जिल्ह्यास झाली असून इलिचपुराहून रा० रा० गोपाळ रामचंद्र पिटके बी. ए. डिपुटी इनस्पेक्टर यांस वाशिमास बदलण्यांत आलें.

रा० रा० वामन संतो उमरावती यांस तेल्हारे कोर्टाचें क्लार्क आफ कोर्ट नेमण्यांत आलें.

जुडिशिअल कमिशनरच्या कचेरींतील १०० रुपयांच्या जागेवर येथील इंग्रजी आफिसांतील क्लार्क मि. बार्कले यांस बढती देण्यांत आली.

जुडिशिअल कमिशनरचे डिपुटी क्लार्क आफ कोर्टाचे जागीं रा० रा० नारायण मोरेश्वर रहाळकर बी. ए. यांस शाळाखात्यांतून बदलून घेण्यांत आलें हे कळविण्यास आनंद वाटतो.

मि० फ्रेजर पोलीस सुपरीनटेंडंट, उमरावती यांनीं दोन महिन्यांची रजा घेतल्यामुळें त्यांच्या रजेंत इलिचपूरचे पोलीस सुपरिन्टेंडंट मि. म्यागिल्ल यांस उमरावतीस बदललें आणि इलिचपुरास मि. ओग्रेडी एक्स्ट्रा असि-कमिशनर यांस पोलीस सुपरिनटेंडंट नेमून त्यांच्या उमरावतीच्या कोर्टावर लेफ्टनंट मारिस यांस नेमिलें व त्यामुळें मुनशी अजीजुद्दीन असिस्टंट कमिशनर हे खामगांवासच सब डिव्हिजनल आफिसर राहतील.

रा० रा० विठुजी नारायण तहशीलदार पुसद यांनीं पेनशनी बद्दल अर्ज केल्या वरून त्यास पेनशन मिळाल्या विषयीं हुकूम झाला. हे गृहस्थ वाणीचे रसाळ असून आपल्या कर्तृत्वानें तहशीलदारीच्या हुद्याला चढले. वरिष्ठांची मर्जी राखून यांनीं आपली तहशीलदारी प्रजेला सुखावह केली. सुयशानें संपादलेल्या पेनशनीचा यांस चांगला लाभ होवो.

मलकापूर, शेगांव व खामगांव या स्टेशनांवर प्लेगं संबंधानें उतारूंची तपासणी मोठ्या सक्तीनें अमलांत येईल.

मे. एफ. डब्ल्यू फ्रीडो डिपुटी कमिशनर यांची स्वारी आकोला तालुक्यांतील फिरणें पुरें करून आतां बाळापूर तालुक्यांत वार्षिक पाहणी करीत आहे त्यांचे मुक्काम तारीखवारीनें स्थळशः असे आहेत.:—

| मिती | मुक्काम |
|---|---|
| ६ दिसेंबर | मोरगांव. |
| ७ | (वरळपाचें)बोरगांव. |
| ८ | हातें. |
| ९।१० | लोहारें. |
| ११ | निमकर्दे. |
| १२।'१३।१४।१५ | . बाळापूर. |

रा रा. बाळकृष्ण लक्ष्मण बापट डिपुटी इनस्पेक्टर, उमरावती हे शाळाखात्याची उत्कृष्ठ सेवा इतकीं वर्षे झाल्या नंतर या महिन्याच्या अखेरी पासून पेनशन घेणार आहेत. राजश्री बाळकृष्ण शास्त्री चांगले विद्वान, अनुभवी व सरळमार्गी आहेत. ह्यांची वृत्ती तापट प्रकृतीची आहे तथापि ते अगदीं करारी माणूस आहेत. त्यांची कारकीर्द चोखपणाची व प्रामाणिकपणाची झाली असून पुष्कळ दृष्टीनें अभिनंदनीय आहे. आपल्या पेनशनीच्या कालांत राजश्री शास्त्रीबोवा चांगलीं चांगलीं लोकोपयोगी कार्यें करतील अशी आह्मास आशा आहे.

उमरावतीच्या डिपुटी इनस्पेक्टरच्या जागीं रा० रा० हरी रामचंद्र रोहिणखेडकर बी. ए. यांची शिफारस डायरेक्टर साहेबांनीं केली आहे. राव बहादूर सिताराम विश्वनाथ पटवर्धन यांच्या सारख्या अधिकाऱ्यांनीं चांगल्या कसोटीला लावलेल्या गृहस्थांची निवड केली आहे ही गोष्ट आनंदाची होय. राजश्री हरीभाऊ यांची परिपक्व विद्वत्ता, दीर्घकालीन चाकरी, व शुद्धता पावलेली कारकीर्द हीं मुकीं प्रसादचिन्हेंच होत. राव बहादूरांच्या निवडीला वरिष्ठ अधिकारी मान देतील अशी बळकट आशा आहे.

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८८ रुपये |
| जवारी | ९० रु० |
| गहूं ( कांठे ) | १२९ रु० |
| ,,( बनशी ) | १३० रु० |
| चणे | १०० रु० |
| तेल | ६। रु० मण |
| तूप | ८ मण |
| मीठ | ३॥।= मण. |
| सोनें | २६ तोळा |
| चांदी | ८० |

---

### नोटिशीचे उत्तर

तीर्थ० रा० रा० चिमणाजी नारायण कुळकर्णी मौजे कदमापूर तालुके खामगांव जिल्हे अकोले यांसः—

नोटीस देणाणार बाळकृष्ण देवराव कुळकर्णी बोंडगांवकर रहाणार मौजे मंजनगांव तालुके खामगांव याज कडून असे कळविले जाते कीं तुमची नोटीस ता० ८ माहे नोवेंबर सन १८९७ इसवीची आली ती पावली मजकूर समजला. माझा धाकटा बंदु दत्तक द्यावा असें तुमचें ह्मणणें आहे त्यांत हिंदु धर्म शास्त्रांत दत्तक देण्यास मजला अधिकाव मुळींच नाहीं. त्याची मातोश्री जिवंत आहे यास्तव तिजला नोटीस देऊन तिचा विचार घेतला पाहिजे. दुसरे जर तिचा विचार तुह्मी घ्याल तरी तिजला हिंदुधर्म शास्त्रा प्रमाणें बाप जिवंत नाहीं ह्मणून मुलगा दत्तक देण्याचा अधिकार आहे किंवा नाहीं यानबद्दल तुह्मी शास्त्रार्थ दाखविला पाहिजे ह्या प्रमाणें निर्णय करून घ्यावा. तो पावेतो तुह्मास कोणतेही रीतीनें त्रयस्त इसम दत्तक घेण्यास अधिकार पोचत नाहीं. घेतल्यास रद्द केला जाईल. प्रथम्तः तिजला नोटीस देऊन शास्त्रार्थ वगैरे दाखविल्या नंतर दुत्तक घेण्या संबंधानें आह्मी आपला विचार कळवूं. तो पावेतो तुह्मी कांहीं एक करूं नये. कळावें तारीख ४ माहे डिसेंबर सन १८९७ इ०

(सही)

बाळकृष्ण देवराव कुळकर्णी बोंडगांवकर रहाणार मंजनगांव तालुके खामगांव

द० खु०

---

### नोटीस.

रा. रा. गबूसिंग जमादार साहेब बहादूर राहणार आकोटं – यांस

या लेखानें कळविण्यांत येते कीं मौजे केमलापूर परगणे आकोट येथील सर्व्हे नंबर ४३ चे शेत सालीम त्याच्यामालकाकडून माझ्या वहिती साठीं घेतलें आहे आणि त्या मध्यें माझी वहिवाट पुष्कळ महिन्या पासून चालू झाली आहे. तर मेहरबानांस विनंती कीं सदर्हू शेतांत आपल्यां तर्फेचा माणूस कोणीही न येऊं देण्या विषयीं खबरदारी घेऊन माझ्या शेतीच्या उपभोगाला आपण स्वतां किंवा मार्फतीनें व्यत्यय आणूं नये. या पुढें जर कोणी मला त्रास देईल तर त्याचा कोर्ट मार्फत जबाबदार घेतला जाईल. माझ्यावर कोणाचा कांहीं हक्कसंबंध असेल तर त्याबद्दल त्यास दिवाणी कोर्ट खुलेंच आहे. माझ्या ताब्यांतील शेतांत आगळीक होऊं नये ह्मणून सूचनार्थ ही नोटीस दिली आहे. कळावें. तारीख २९ माहे डिसेंबर सन १८९७ इ०

(सही)

मोतीसा गुरु कमालशा रहाणार अकोट.

---

## वर्तमानसार

इंडियाचें एक विद्वरत्न हरपलें! पंडित गटूलालजी घनश्यामजी यांस कफाच्या विकृतीनें भावनगर येथें गेल्या गुरुवारीं देवाज्ञा झाली. पंडित गटूलाल हे शीघ्र व प्रासादिक कवी होते. हे संस्कृत भाषेंत मोठे प्रवीण असून त्यांचें वाचन शास्त्रीय गहन विषयांत पुष्कळ होतें. त्यांची स्मरणशक्ती अचाट होती आणि तिचे चमत्कार त्यांनीं पुष्कळदां दाखविले होते. लहानपणींच यांची दृष्टी गेली. अगदीं अंधपणांत त्यांनीं विद्यार्जन केलें आणि त्यांची अप्रतिम विद्वता पाहून काशीच्या पंडितांनीं त्यांस 'भरत मार्तंड' अशी सार्थ पदवी दिली होती ही गोष्ट त्यांच्या अलौकिकपणाची साक्ष देते. पंडितजीच्या मरणामुळें सर्व विद्याभिलाषी लोकांस मोठें दुःख होईल. ईश्वर त्यांच्या आत्म्यास उत्तम गती देवो!

पादशकट.— फक्त इंग्लंडांत दरसाल साडेसात लाख पायगाड्या तयार होतात.

नीळ.— बिहार प्रांतांत ह्या वर्षी २,७३,३०० एकर निळीची शेती करण्यांत आली आहे.

सर वुईल्यम् बिसेट यांस सरकारानें हिंदुस्थानांतील एकंदर रेल्वेचे डायरेक्टर नेमिलें.

प्यारिस शहरांतील एका उपाहाराच्या दुकानीं रोट्या करण्याचा फार मोठा कारखाना आहे. ह्या कारखान्यांत ४००० नौकर आहेत.

प्रसंग पडल्यास यु. स्टे. अमेरिकेला बाहेर देशीं १२ बारा लाख सैन्य पाठवितां येईल इतकी तयारी आहे असें सांगतात.

येत्या जानेवारीमध्यें दिसणाऱ्या सूर्यग्रहणाचा वेध घेण्यास खुद्द व्हाईसराय लॉर्ड एल्गिन आणि त्यांची मंडळी बक्सर किंवा डुमरांव येथें जाणार असल्याचे ठरल आहे.

पॅरिस शहरांत घोड्यांचें मांस विकणारांचीं २०० दुकानें आहेत. १८९६ सालीं तेथें ३०,००० घोडे लोकांकडून मारून खाण्यांत आलें.

कृष्णमार्जारपोषणहननद्वीप.— मिचिमान सरोवरामध्यें एक लहानसें बेट एका व्यापारी कंपनीनें खरिदी घेतले असून, त्या बेटावर ती कंपनी काळ्या मांजरांची उत्पत्ति करून त्यांची केसांसुद्धां कातडीं काढण्याकरितां त्यांस मारण्याचा कारखानाही ह्याच बेटावर आहे.

मोठ्या खर्चाचा दगडी पूल.— अवघ्या जगांत अलीकडच्या शिल्पानें बांधलेल्या नद्यांवरील दगडी पुलांमध्यें, हड्सन नदीवरील दगडी पुलासारखा मोठ्या खर्चाचा पूल दुसरा कोठेंही बांधला गेला नाहीं. या दगडी पुलाचें कॉंट्रॅक्ट १०,००,००० पौन्ड ह्मणजे दीड कोट रुपयांस दिलें होतें.

विजेचा जोर.--शहरांत जो विद्युत्पात होतो त्याचा जोर पांचपटींनीं जास्त असतो असें विद्युच्छास्त्रवेत्त्यांनी अनुभवून ठेविलें आहे. ह्याचें कारण त्यांनीं असें प्रसिद्ध केलें आहे कीं, शहरांत जो विद्युत्पात होतो त्यास शहरांतील अनेक छपरांच्या लोखंडी पत्र्यांनीं, लोखंडी कठड्यांनीं आणि पन्हाळांनीं अवरोध होऊन त्याची शक्ति पुष्कळच कमी होते. खेडेगावांतून घरांना लोखंडी सामान फारसें वापरण्यात येत नसल्यामुळें तेथें होणारे विद्युत्पात शहरांतल्यापेक्षां फार नाश करितात.

भावी सूर्यग्रहण.—येत्या जानेवारीमध्यें जें खग्रास सूर्यग्रहण दिसणार आहे त्याचे वेध घेण्यासाठीं हिंदुस्थानांतून सरकारतर्फे तीन ठिकाणून मंडळ्या निघणार आहेतः— पहिली डेऱ्हादून येथील वेधशाळेंतून ट्रिग्नामेट्रिकल सर्व्हेकडील कॅप्टन बरार्ड आणि मि० पोप, दुसरी मंडळी मद्रास येथील वेध शाळेंतील ज्योतिषी मि० स्मिथ् यांची आणि तिसरी पुण्याच्या वेध शाळेकडील सायन्स कॉलेजांतील प्रोफेसर नायगांववाला यांची मंडळी; यांचे शिवाय अवघ्या जगावरील ठिकठिकाणचे ज्योतिषी या ग्रहणाचे वेध घेण्यास येणार आहेत, व त्यांची सर्वप्रकारची उत्तम सरबराई रहावी ह्मणून तयारी चालली आहे.

प्राचीन.—दंतकथेप्रमाणें एक गोष्ट सिलोन बेटांत घडल्याची खबर आली आहे. ती अशी कीं, एका जैन धर्मी गृहस्थाची स्त्री एका उपाध्याशीं व्यभिचार करूं लागली. त्या बाईस एक चार वर्षांचा मुलग होता. ह्यानें तो संबंध पाहिल्यामुळें त्या नवराबायकोचा तंटा होऊन बराच गोंधळ झाला. दुसरे दिवशीं नवरा नौकरीवर गेल्यावर पुनः उपाध्येबोवा घरांत आले. त्या वेळेस हे पोर अशीच चाहाडी करील असें मनांत आणून त्यांनीं त्या पोराचा प्राण घेतला, आणि त्याचेंच मांस शिजवून त्या बाईनें रात्रीं नवऱ्याच्या पानावर वाढिलें नवऱ्यास त्याबद्दल संशय येऊन तो न जेवतां तसाच निजून राहिला. पुढें मध्यरात्रीं ती बाई एक सोटा होतांत घेऊन त्या नवऱ्याच्या उरावर मारणार तों नवरा जागा झाला. त्यावेळेस ती पळून गेली. दुसरें दिवशीं तिनें पोर मारलें व त्याचेंच मांस आपणास वाढलें होते वगैरे सर्व वर्तमान त्यास कळलें. त्या मुलाचें शिर जंगलांत फेकून दिलेलें सांपडलें व सर्व खुलासा झाला. याला ह्मणतात स्त्रीचरित्र. ज्ञा० च०

कोंबड्यांची अंडीं चिनी लोक बेंच दिवसपर्यंत जशाची तशीं ठेवूं शकतात.

पासिफिक महासागरांतील कित्येक टापूंतील रहिवासी लोक शार्क माशांच्या दाताची सुऱ्या, तरवारी वगैरे हत्यारें बनवितात.

सिंहाला पकडण्यास पांच मनुष्यें पुरी होतात. परंतु एका वाघाला पकडण्याकरितां ९ माणसें लागतात. यावरून सिंहापेक्षां वाघ अधिक सामर्थ्यवान आहे हें सिद्ध झालें.

आपल्या देशांत एकमेकांकडील वर्तमान एकमेकांस कळविण्यास कागदांचा उपयोग करतात त्या ऐवजीं आस्ट्रेलियांत रंगीबेरंगी काठ्यांचा उपयोग करतात.

निजाम हैदराबाद येथील जी दुसरी पलटण हल्लीं रावळपिंडी येथें आहे तिला पेशावरकडे जाण्याचा हुकूम झाला आहे

मद्रास इलाख्यांत मुख्यत्वेंकरून कडाप्प जिल्ह्यांत दुष्काळ चांगला जाणवूं लागला आहे.

मद्रास शहर व तिनेवल्ली या ठिकाणीं दुष्काळाचा प्रभाव चांगला दिसूं लागला आहे.

दक्षिण, कर्नाटक व व त्यांच्या आसपासच्या भागांत फारच महर्गता चालली आहे.

हिंदुस्थानांतील शिक्षासत्रांत कोणाच्या कधीं व कोणत्या कारणावरून आहुती पडतील त्याचे अनुमानच होणें नाहीं. सनदी नोकरी करण्याची इच्छा बाळगणाऱ्या मि० लक्ष्मी नारायण नांवाच्या बऱ्हाणपूर येथील एका ग्राज्युएटावर, त्यानें आपलें वय खोटेपणानें कमी सांगितल्याचा आरोप ठेवून १८२ व ४१७ दोन कलमान्वयें फौजदारीचा या लवून त्यास सहा महिन्यांची साध्या कैदेची शिक्षा सांगण्यांत आली आहे. हल्लीं सदर शिक्षेवर अपील झालें असून आरोपीहि जामिनावर सुटला आहे. पण आह्मी ह्मणतो ग्राज्युएटांनीं भाकरी करतां चाकरी करण्यापेक्षां स्वतंत्र धंदा करून कां पोट भरूं नयें? 'नीचपणा चाकरींत वदाति बुधपहा' या एका अधुनिक कवीच्या कवितास्मरणाचा कोणी विचार करील काय?

'राक्षस' जरी कोणी पाहिले नाहींत तरी तें नांव ऐकलें नाहीं असा एकही प्राणी साऱ्या हिंदुस्थानांतही मिळणार नाहीं. पुष्कळशा कादंबऱ्यांतून त्यांच्या खाद्यासंबंधाच्या भयंकर गोष्टी आढळतात त्याचेच अंश हल्लींचे मांसभक्षक लोक असावेत असा तर्क केल्यास तो अगदींच वृथा ठरलेलं वाटत नाहीं. रशियन वगैरे युरोपियन लोक मांसभक्षक असल्याचे सर्वत्र प्रसिद्धच आहे पण त्यांतही रशियन लोकांची बरकडी आहे. शिळ्यामांसाची त्याना गोडी तर आहेच परंतु पाण्यांतून काढलेले जिवंत व तरफडत असलेले मासे तळून खाण्याची त्यांना अलिकडे बरीच संवय झाली असल्याचें समजतें, आणि ती इच्छा पुरी व्हावी एतदर्थ त्यांनीं रशियांतील कित्येक हॉटेलांत हल्लीं लहान लहान तलाव बांधले असून त्यांत जिवंत मासे सोडण्यांत आले आहेत जेव्हां ज्याला ते खाण्याची इच्छा होते तेव्हां त्यांतील एक, दोन, चार जें काय लागतील तेवढे मासे घेऊन व त्यांची जिवंतपणीं तप्त तैल कढईत आहुती देऊन आपल्या पोटाची आग शांत करतात. यावरून हे लोक कसे आहेत ते वाचकांस तेव्हांच ताडतां येईल असें आह्मांस वाटतें.

आगगाडीनें प्रवास करणें अगदीं सुखावह असा बहुतेकांचा तर्क आहे परंतु अलिकडे तो प्रवासही दुःसह वाटूं लागला आहे. एक दलाल आपल्या बरोबर ३ हजाराची रोकड घेऊन अमृतसर येथें गुळाची खरेदी करण्या करिता रेल्वेनें जात असतां त्याच्याच डब्यांत बसलेल्या दुसऱ्या एका इसमानें त्या दलालास डब्यांतून खालीं ढकलून दिलें नंतर कांहीं वेळानें रुपयाचा थैलाही खालीं टाकला व स्वतः उडी मारून बाहेर आला. रुपयांच्या थैल्यासह तो पसार झाल्यावर मग पोलिसास वर्दी कळून त्याबद्दलचा आतां तपास चालला आहे असें तिकडून आलेल्या बातमीवरून कळतें. चोराचा पत्ता नाहीं. शु०

युरोपियन अधिकारी लोक आपल्या अधिकारास्त्राचा कोणत्यावेळीं कोणावर आणि कशा रीतीनें प्रयोग करतील याचा मुळींच नियम सांगवत नाहीं. भागलपुर येथील मि. क्रॅकिट साहेबांनीं तेथील जमीदार बाबू उपेंद्रनाथ बानरजी, यांजवर नुकताच खटला करून त्यांस २६ रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. खटला करण्यास जमीदार साहेबांकडून तसाच कांहीं मोठासा गुन्हा झाला असेल असें कोणास वाटेल पण नाहीं हो. फक्त जमीदार साहेबांनीं आपल्या घरीं गाणें केलें होतें व तें ऐकल्यापासून साहेब बहादुरांना त्रास झाला. केवढा भयंकर गुन्हा तरी हा! युरोपियन लोकांचा बॉल होत असतांना कोणा नेटिवास त्या पासून त्रास झाल्यास व त्यानें त्यावर खटला चालविल्यास त्यांसही दंडाची शिक्षा होईल काय? असा कित्येकांचा प्रश्न आहे. याचें उत्तर काय येईल बरें!

गेल्या बुधवारी आस्ट्रियाचे राजसभेची जी बैठक झाली तींत फारच दंगा झाला होता. कित्येक मेंबर तर हातघाईवर आले होते, आणि १५ मिनिटेंपर्यंत त्यांच्यांत बरीच मारामारी झाली. त्या मारामारींत सामील झालेल्या सगळ्या मेंबरांना कैद करण्यांत येईल असा संभव आहे

रोज एक गुंज क्किनाइन घेतल्यानें गाठींचा रोग येत नाहीं असें एक अनुभविक डाक्टर कळवितात इकडे वाचकांनीं लक्ष द्यावें.

आता कसें!— पुण्यास झडतीचे वेळीं सोल्जरांनीं दांडगाई केली ह्मणून मागें प्रसिद्ध झालें, त्याबद्दल नामदार गव्हरनर साहेबांनां माठा धुस्सा येऊन त्यांणीं त्यांचा कैवार घेतला. विलायतच्या लोकांनीं त्यांची पाठ थोपटली, हें सर्वांना माहीत आहेच. आतां पण असें समजतें कीं, पुण्यास युरोपियन लोकांतही प्लेग पसरल्यामुळें बंगल्याची झडती सोल्जरांकडून होऊं लागली आहे. आणि सोल्जरांबद्दल इंग्लिश पत्रांतून कागाळ्या येऊं लागल्या आहेत. आतां कसें! सोल्जर खोटे कीं नेटिव्ह खोटे?

विलायत सरकारच्या खजिन्यांत सुमारें तीस वर्षां पासून १ अब्ज ६० कोटी रुपये अमानत आहेत. पुष्कळ शोध केला तथापि वारस मिळत नाहींत. हिंदुस्थानचें कर्ज फेडण्याकडे हा पैसा देऊन टाकून त्या योगे एथील लोकांवरील कराचा बोजा हलका केल्यास हिंदुस्थानची ३० कोटी प्रजा ब्रिटिशराष्ट्रास दुवा मागणार नाहीं काय? मग इंग्लिश लोकांनीं तसें कां करूं नये?

अनुभव पहा— नुसत्या आवाजानें काचेचें पात्र फोडतां येतें. पातळ ग्लास जलदीनें तोंडाशीं न्याव एकदम मोठ्यानें ओरडा ह्मणजे आवाजाच्या आघातानें ग्लास फुटून तुकडे होतात एकानें या प्रमाणें एकामागून एक असे अनेक ग्लास फोडलीं आहेत

जोडवीं—पूर्वात्य देशांतील स्त्रियांस हंसतां हंसतां पाश्चिमात्य देशांतील सुधारलेल्या स्त्रिया अनेक रीतीनें त्यांचें अनुकरण करूं लागल्या आहेत. कानास भोकें पाडून कुंडलें त्यांत अडकवूं लागल्याचें महशूर आहेच. आतां पायाचें बोटांत जोडवी घालण्याची रीत थोडी सुरू झाली आहे. ही जोडवी आपल्या प्रमाणें चांदीची नसून हातांतील आंगठ्या प्रमाणें सोन्याची व रत्नजडित सुंदर असतात. तिकडील स्त्रियांचे पायांत नेहमी बूट असल्यामुळे ही जोडवी घालण्याची वेळ मात्र निराळी असते. 'टर्कीज बाथ' घेण्याला ह्मणून जेव्हां त्या स्त्रिया स्नानगृहांत पोहण्यास जातात, तेव्हां पाण्यावर त्यांचे पाय दिसत असतात ते प्रेक्षक समुदायास अधिक सुंदर दिसावे ह्मणून अमेरिकेंतील कांहीं स्त्रियांनीं ही टूम काढल्याचे प्रसिद्ध झालें आहे.

एखाद्या खोलींतली उष्णता काढून तेथें गारवा आणावयाचा असल्यास खोलीच्या मध्यभागीं एक पंचा भिजवून लांब बांधवा. तावडतोब १०-१२ अंश उष्णता कमी होते. धा० वृ

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ „ १ ८

किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........ ८१ ०६

दुसरे खेपेस .... .......८१

Single copy ........................4as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......4 as

Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXI AKOLA MONDAY 13 DECEMBER 1897 NO 48

वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख १३ माहे डिसेंबर सन १८९७ इ० अंक ४८


## देशी स्त्रियांच्या कलाकुशलतेच्या कामाचें प्रदर्शन.

पुढील महिन्याच्या ह्मणजे दिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत उमरावती येथें हिंदुस्थानांतील सर्व भागांतून प्रमुख लोक येणार आहेत; व त्यांचा मुक्काम येथें चार पांच दिवस होईल. या प्रसंगीं ठिकाठिकाणच्या स्त्रियाही बऱ्याच येतील असा संभव आहे. अशावेळीं स्त्रियांनीं केलेल्या कलकुशलतेच्या कामाचें प्रदर्शन केल्यापासून स्त्रियांच्या कौशल्यास उत्तेजन दिल्यासारखें होऊन शिवाय इतर बरेच फायदे होण्याचा संभव आहे, असें दिसून आल्यावरून तशा प्रकारचें प्रदर्शन ( ह्मणजे पुण्यास सन १८९६ सालीं दिसेंबर महिन्यांत झालेल्या प्रदर्शनाच्या धर्तीवर ) करण्याचा विचार ठरला आहे.

हें प्रदर्शन तारीख २७ दिसेंबर सन १८९७ पासून तारीख २ ज्यानेवारी सन १८९८ पावेतों उघडे राहील. या प्रदर्शनांत लोकरीचीं वीण कामें—( ह्मणजे गळपट्टे, टोप्या, ज्याकिटें, आसनें फुलें, चित्रें, इ० ) कानव्हस वर केलेलीं कामें, पोतीचीं कामें दोऱ्याचीं, रेशमाचीं व जरीचीं काशिद्याचीं कामें वगैरे कामें ठेवण्यांत येतील. व जी परीक्षक मंडळी नेमली जाईल ती जीं कामें पसंत करील त्यांस बक्षिसें देण्यांत येतील.

तरी सर्व एतद्देशीय स्त्रियांस विनंती आहे कीं ज्यास हीं कामें करितां येत असतील त्यांनीं नमुने तयार करून प्रदर्शनांत ठेवण्यासाठीं पाठवावे. ज्या स्त्रियांजवळ पूर्वीं तयार केलेले नमुने असतील त्यांनीं ते पाठविण्यास हरकत नाहीं. मात्र पूर्वीं एखादे प्रदर्शनांत त्यास बक्षिस मिळालें असल्यास तसें कळवावें

पदार्थ उमरावतीस तारीख २० दिसेंबरच्या पूर्वीं दाखल झाले पाहिजेत. पदार्थ पाठवितेवेळीं त्या बरोबर एक पत्र असावें. त्या पत्रांत पदार्थ तयार करणाऱ्या स्त्रीचें पूर्ण नांव व पत्ता असून पदार्थ विकण्याची इच्छा आहे किंवा नाहीं व असल्यास काय किंमतीस विकला जावा या विषयींचा खुलासा असावा.

ज्या स्त्रियांस प्रदर्शनांत ठेवण्यासाठीं पदार्थ पाठविण्याची इच्छा असेल त्यांनीं आपण कोणते पदार्थ पाठविणार या विषयीं आगाऊ तारीख १९ दिसेंबरच्या पूर्वीं कृपा करून कळवावें. हीं पत्रें येतील त्या धोरणावर प्रदर्शना संबंधानें एकंदर व्यवस्था करण्यांत येईल. वेळोवेळीं ज्या कमजास्त व्यवस्था होतील त्या जाहीर करण्यांत येतील.

उमरावती तारीख २४।११।९७

| | |
|---|---|
| फुलमणी बाई काणे. | द्वारकाबाई वैद्य. |
| जानकीबाई मुंडले. | वेणूबाई नामजोशी |
| सोनाबाई मेहरबान. | लक्ष्मीबाई सरंजामे. |
| काशीबाई केतकर. | कृष्णाबाई त्रिवलकर |
| यमुनाबाई चिटणीस. | राधाबाई मुधोळकर |
| सावित्रीबाई जोशी. | गंगुबाई जोशी. |

ताजा कलम—पत्रें पाठविणें व पदार्थ पाठविणें ते पुढील पत्यावर पाठवावे:— सौ० गंगुबाई जोशी यांस, रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी हायकोर्ट वकील यांचे बंगल्यावर उमरावती क्यांप मध्यें देणें.


## दुर्मिळ संधी

( मार्च १८९८ अखेर पर्यंतच )

नानालहरी— मासिक पुस्तक १८९७ जानेवारी पासून निघत यांत विद्वानांचे, अत्यंत मनोहर, चटकदार संग्रहणीय निवडक निवडक विषय येत असतात. वर्षाची ट. ख. सह वर्गणी ८९, आगाऊ पाठविणारास अगर पहिला अंक व्ही. पी. नें मागविणारास ८८ चें मनोरंजक अत्युत्तम स्त्रीचरित्र अवघ्या ८२ स मिळेल.

मराठी विद्या—लहान मुलाला व ढ मनुष्यास देखील बालबोध मोडी उत्तम लिहिण्यावाचण्याला शिकवून देणोर असून यांत असा प्रयोग आहे कीं, त्यानें मोडी अक्षर सुरेख व तात्काळ वळते. किंमत ८१० दोन प्रती घेणारांस हरहुन्नर, औषधी, पक्कान्नादि अत्युपयुक्त माहितीचें ८१२ चें 'व्यवहारमंजरी' पुस्तक इनाम.

कर्नाटक महाराष्ट्र भाषामंजरी --यानें मराठी जाणणारांस कानडी अगदीं सप्रमाण, शुद्ध व उत्तम लिहितां वाचतां बोलतां येईल. व कानडी जाणणारांस मराठी भाषेचें पूर्ण ज्ञान होईल. किंमत ८१२ दोन प्रती घेणारांस बिरबल बादशहाच्या गोष्टीचें १ रुपयाचें पुस्तक इनाम.

गुप्तविद्याज्ञान—यांत गुप्त व अप्रसिद्ध ज्योतिष, हुन्नर, मंत्र इ० आहेत. २ प्रतींचीं किंमत १ रुपया.

इंद्रजाल—ह्यांत मंत्र, तंत्र, जादू इत्यादि अद्भुत अल्पसाधनी क्रिया आहेत. २ प्रतीची किंमत ८१२ ही १८१२ चीं ४ पुस्तकें घेणारास 'रामविजयकथासार' ८१२ चें पुस्तक इनाम.

या शिवाय तऱ्हतऱ्हेचीं पुस्तकें आमचे कडे विकत मिळतील ट. प्या. व्ही. पी. खर्च निराळा.

नानालहरीचे प्रकाशक

पोष्ट–गड इंग्लज येथें इ० कोल्हापूर.


## कळलें पण उमजलें पाहिजे

या सदराखालीं आह्मी एप्रिल १८९६ पासून कांहीं पत्रें प्रसिद्ध करीत आहोंत. तीं मधून मधून उमरावती येथील प्रमोदसिंधूत एप्रिल १८९७ पर्यंत आलीं आहेत. यापुढें तीं वऱ्हाडसमाचारांत देण्याचा आमचा विचार आहे. एकंदर इंग्रजी व मराठी मिळून बहात्तर पत्रें प्रसिद्ध झालीं —यांपैकीं कित्येक पत्रें निव्वळ प्रेमदृष्ट्या लिहिलीं गेलीं आहेत आणि विचार दृष्ट्या त्याचें पृथक्करण करणें आह्मांस इष्ट वाटत नाहीं. विद्वानांचें मत आमच्या विरुद्ध पडलें आहे. पण कोणत्याही रीतीनें औद्धत्याचा अंगिकार न करितां, तशीं पत्रें हातीं पडलींच तर तीं नष्ट करण्याचा आह्मांस अधिकार नाहीं इतकेंच आह्मी ह्मणतों. ज्या विद्वानांनीं आह्मांस सद्हेतूनें दोन गोष्टी सांगितल्या त्यांचे आह्मी आभारी आहोंत-- आणि 'तशा पत्रां सारखीं पत्रें इतरत्रही सांपडतात, नाहीं असें नाहीं' असें त्यांनीं मनाची प्रशस्य समता ठेवून कळविल्याबद्दल आह्मी त्यांचें अभिनंदन करितों. अनेक प्रसंगास उद्देशून एका तरुणानें हीं पत्रें लिहिलीं आहेत—आणि त्याचे सर्व विचार जगापुढें ठेवणें आपचें पवित्र कर्तव्य आहे. खरोखर अत्यंत कळकळीनें व प्रामाणिकपणानें लेखणींतून पडणारे लेख कांहीं काल पावेतों अप्रिय वाटले, तरी संपादकांनीं त्यांत हात घालण्यानें कित्येक प्रसंगीं तोटाही होतो—सबब आह्मी आजपर्यंत पडून राहिलेलीं पत्रें पुनः फेरबदल न करितां प्रसिद्ध करीत आहोंत.

नंबर ७३

प्रिय—यांस,

संगती सुखांत अत्यानंदानें काळ घालवीत असतां आपण जिच्या करितां हळहळत होतो ती तरुणी स्वकर्तव्यास जागृत झालेली पाहून तुला महदानंद होईल. एकाच विषयाचा ध्यास घेऊन बसणोर प्रबल मनोवृत्तीचे तरुण त्यांच्या प्रिय मित्रांकडून देखील वेडेपीर ठरतात हें कळून तुला वाईट वाटेल ! जिनें सर्वकाल स्वर्गानंद दिला तिचे स्मरणानें क्षणभर सुखदुःखाचा अनुभव घेत बसणें वेड्याचीं लक्षणें असून दुःखसागरांत पडलेल्या कारुण्यमूर्तीस जन्मार्जित हक्क परत देणें किंवा ते देण्याची खटपट करणें अनवश्यक न वाटणें हीं मूर्खपणाचीं लक्षणें आहेत ! ! आह्मी सध्यां सुधारणेच्या अत्युच्च शिखरावर स्थित झालों असून स्त्रीविषयक गोष्टींची आह्मांस मुळींच गरज उरली नाहीं ! आमच्या समाजांत भूतदयेची स्वातंत्र्य कल्पनांची व समसमानतेची परमावधि झाली असून अति अनुभवशीर तरुण उदंककालीन सुधारणेचे आधारस्तंभ आणि पाश्चिमात्य शिक्षणानें ज्यांच्या प्रगमनशीलतेस प्रगति आली आहे असे नरवर इत्यादि सर्वांची अशी खात्री झाली आहे कीं विफल जीवितांनीं आजन्म वैधव्यदावानलानीं दग्ध होणेंच इष्ट आहे ! ! अशा मंद भागिनींस परवशतेतून मुक्त करण्याची खटपट करणेंच काय–पण त्या दैवहतां विषयीं विचार करणेंच महत्पाप होय ! ! ! तशांत असे विचार असणाऱ्या थोर महात्म्यांच्या उक्तीस मान न देतां, एखादा तरुण विधूर योग्य हतभागिस दुःखमुक्त करण्यास प्रवृत्त होत असेल तर त्याच्या प्रथम पत्नीवरील प्रेमास हरताळ लागू पहात आहे—पण त्याच विधुरानें कुमारीशीं लग्न केल्यास हे निस्सीम सत्यभक्त, विकारवशतेचा गंध नसणारे हे परोपकारांत महा साधु आणि परदुःखार्थ रात्रंदिन हळहळणारे स्वार्थ त्यागी मर्त्यश्रेष्ट त्या तरुणास मुळींच दोष न देण्यास निर्लज्जपणानें तयार आहेत ! तत्वज्ञानामृतोदधींतच सर्व आयुष्याचा सर्व काल घालविण्याची वरवर इच्छा असणाऱ्या नरपुंगवास क्षुल्लक व क्षणैक सुख देणाऱ्या सुधारणांस महत्व देण्यास मुळींच वेळ नसून–निष्कारण गप्पा मारण्यांत, असभ्यतेचा अंगिकार करून अश्लील शब्दोच्चार करण्यांत, स्वतःस फाजील शहाणे समजून न कळत किंवा जाणून बुजून कोंवळ्या मनावर दुःखप्रहार करण्यांत आणि आपल्यास मानवीस्वभाव पूर्ण कळला आहे अशा घमेंडींत अहंकारानें व्यर्थारोप करण्यांतच त्यांचा काल जात आहे .... यांत त्यांचा तरी काय अपराध आहे ! स्वतः वरूनच जग ओळखण्याची ज्यांस संवय आहे त्यांनीं कोमल मन ह्मणजे काय हें न ओळखणें अगर दुसऱ्याचे दुःखाची तीव्रता आणि तें सहन करण्यांत दाखविलेली महात्मता यांची किंमतच त्यांस न कळणें अगदीं साहजिक आहे ........ पण हें कळवून तुला व्यर्थ शीण देण्यांत काय अर्थ आहे ! कोणी कांहीं ह्मणाले तरी तुला मजविषयीं कधींच कमजास्त वाटणार नाहीं अशी, तूं स्त्रीस्वभावांतील उत्तमांगाचें जें आविष्करण केलें आहेस त्यावरून माझी खात्री आहे..... सर्व इंद्रियांस शैथिल्य येऊन विचारशक्ति पार नष्ट झालेली स्थिति अत्यंत सुखावह आहे, असें ज्यांस खात्री पूर्वक कळत नसेल त्यांस तर दोष नकोच– पण मृत्युनंतर स्वप्नें पडणार नाहींत अशी खात्री असणारे तरुण देखील, प्रेमातिरेकें किंवा परदुःख निवारण यांना बळी पडून ऐन प्रसंगीं नामर्द ठरतात ही अति दुःखाची कीं अत्यंत आनंदाची गोष्ट आहे तें सांगवत नाहीं क्षणार्धांत स्वर्ग सुखाचा अगर अनंत मानसिक यातनांचा अनुभव घेणारे, कित्येक वेळां सुखदुःखाचा पूर्ण अभाव अशा स्थितींत असणारे, अनेक वेळा अत्यासक्ति अनिवार भडकून स्वप्नीं ध्यानीं रात्रंदिनी लोकांचें औदासिन्य पाहून सचेतन कल्होळांत चडफड करणारे आणि प्रसंग विशेषीं आपली धडपड व्यर्थ वाटून नैराश्यास बळी पडणारे—अशा तरुणांची स्थिति केवढी दयार्द्र असली पाहिजे ! त्यांच्या वर्तनांत दोष काढणारे दोषैकदृष्टीच स्वार्थपरायण

पायलींच पन्नास सांपडतील—पण त्यांच्या वृत्तीचा अनुभव घेणार व शांतपणानें त्यांचा वर्तनक्रम अवलोकून त्यांच्या मनःसागरांत होणाऱ्या प्रचंड वादळाच्या स्वरूपाची कल्पना करणारे कितीजण सांपडतील ? फार थोडे ! !

---

## राष्ट्रीय सामाजिक परिषद्

हिंदुस्थानांत सामाजिक परिषद् कसकशी आपलीं कामें करीत आहे, याजकडे आपणास आज थोडेसें लक्ष पोचविण्याचें आहे. कारण आज इतकीं वर्षे तिची बठक होते, तर तिजपासून काय काय चळवळ झाली आहे व कोणत्या प्रांतांत कोणते लोक या बाबतींत प्रयत्न करीत आहेत, हा प्रश्न पहिल्यानेंच आपणापुढें उभा राहतो; आणि ह्मणूनच त्या प्रश्नाचा निकाल केल्या शिवाय आपणास दुसरे माहितीकडे तूर्त वळतां येत नाहीं. हिंदुस्थानातील निरनिराळ्या प्रांतांत, निरनिराळ्या लोकांकडून निरनिराळ्या तऱ्हेनें अवलंबन करण्यांत येतें हें पुढील सामाजिक परिषदेच्या इतिहासावरून समजेल. बंगाल प्रांतांत, नवे लोक व जुने लोक ( नव्या मताचे व जुन्या मताचे ) यांचा सामाजिक बाबतींत अगदींच बेबनाव आहे. तिकडे ब्रह्मसमाजांतच बहुतकरून नवे मताचे लोक शिरले आहेत. व त्यायोगें त्यांनीं निराळीच त्यांस योग्य वाटली तशी एक समाजसंस्था अस्तित्वांत आणिली आहे. जुन्या मतांच्या सुधारणे संबधानें ते अगदींच काळजी करीत नाहींत. नाहीं ह्मणायाला फक्त कै. ईश्वरचंद्र विद्यासागर हेच कायते जुन्या मतांचे लोकांपासून अलग न राहतां त्यांच्याशीं मिळून मिसळून राहिले होते, व त्यांच्या सुधारणे बद्दल ही कळकळ करीत होते. वरील कारणामुळें समाजाचे केवढे बरें नुकसान झालें आहे ? बंगाल्यांत असलेले अशा प्रकारचें सामाजिक नुकसान हें आमच्याकडील हिंदु मुसलमान लोकांच्या तंट्यामुळें झालेलें नुकसानाप्रमाणेंच आहे. बंगाल्यानजीकच असलेला, वायव्येकडील प्रांत यांत तर ब्राह्मण लोक सामाजिक सुधारणेंत फारच मागें आहेत. फक्त जे युनिव्हर्सिटींतून शिकून बाहेर पडतात तेवढेच काय ते लोक साधारणपणें समाजसुधारक आहेत. अर्थात त्यांची समाजसुधारणा इतर लोकांस उपयोगी पडण्यासारखी अजून झाली नाहीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांच्याच पलीकडे पंजाब प्रांत, यांत एक सामाजिक सुधारणा करणारा आर्यसमाज आहे. परंतु असें ह्मणतातकीं त्याची स्थिती बहुतेक बंगाल्यांतील स्थिती सारखी आहे. मुसलमान लोकांपैकीं कांहीं पर जातींत गेलेल्या इसमांस त्यांनीं पुन्हा आपल्या धर्मांत घेतलें आहे असें ऐकिवांत आहे. शिक्षणासारख्या महत्वाच्या प्रश्नाबद्दल तिकडे अजून पूर्ण आळस आहे, असें दिसतें ; बाकी लोक प्रयत्न करतील तर सुधारणा लौकर अमलांत आणतील असें अलिकडे वाटूं लागलें आहे. त्याच्या खालीं सिंधप्रांत, यांत अजून विशेष कोणत्याच प्रकारची सामाजिक सुधारणा, अगर एखादी समाजसंस्था, अस्तित्वांत आली नाहीं असें वाटतें. तिकडील लोकांनीं या बाबतींत काळजीपूर्वक लक्ष्य घ्यावयास पाहिजे आहे व ती त्यांना घेण्या बद्दल सुचविणें हें आपलें मुख्य कर्तव्या पैकींच एक आहे. राजपुतान्यांतील कांहीं संस्थानांत अशा प्रकारचे समाज आहेत परंतु त्यांची इतकी प्रसिद्धी कोठें नाहीं. कांहीं कांहीं लोक चांगले सुशिक्षित आहेत परंतु ते तसेंच आपल्या इतर बंधूकडे लक्ष पोंचवीत नाहींत असें दिसतें. हें त्यांचें वर्तन चांगलें नाहीं असें आह्मास वाटतें; तरी आमच्या अल्प सुचनें प्रमाणें तिकडील सामाजिक सुधारणेंत अग्रगण्य लोक प्रयत्न करितील अशी आशा आहे. नंतर गुजराथे संबधानें पाहता श्री सयाजीराव महाराज गाईकवाड हे सुधारणाप्रिय आहेत. त्यांनीं या बाबतींत पुष्कळ प्रयत्न केले आहेत. तेथें एक सामाजिक परिषद् आहे. व ती आपलें काम उत्तम रीतीनें बजावीत आहे. मुंबई इलाख्यांत सामाजिक बाबतींत पुष्कळ प्रयत्न होत आहेत. प्रत्येक जिल्ह्यांत समाजसुधारणारी एखादी तरी संस्था आहे. मुंबई इलाख्यांतील सुधारणें संबधानें जो प्रयत्न होत आहे त्याचें सर्व श्रेय ना० रानडे यांजकडेसच आहे. पुण्यास फिमेल हायस्कूल आहे. व दरसाल बऱ्याच विद्यार्थिणी परिक्षेंत पसार होऊं लागल्या आहेत ही फार समाधानाची गोष्ट आहे. गुजराथेंत अहमदाबादेस फार प्रयत्न करण्यांस येत आहेत असें ऐकिण्यांत आलें आहे. ह्मैसुरकडे तर लग्नाचे वया संबंधी फारच काळजी घेण्यांत येत आहे; व ह्या बाबतींत ह्मैसूर सरकारा कडून कायदाही करण्यांत आला असून तो अमलांत ही येऊं लागला आहे. मद्रास कडेही महाजन सभा आहे व तिनें या बाबतींत पुष्कळ सुधारणाचें मनावर घेतलें आहे. मद्रासेकडे विद्याखात्यांत पुष्कळ लोक पसार होऊं लागले आहेत, व शिक्षण पुर्णत्वाप्रत पोचेल असा संभव दिसत आहे. नागपूर येथें ही एक सामाजिक विषयांत चर्चा करणारी संस्था आहे; व ती आपलें काम उत्तम बजावीत आहे असें ऐकण्यांत आहे. आपल्या वऱ्हाडांत सामाजिक बाबतींत जरी पुष्कळ लोक प्रयत्न करीत आहेत, तरी अजून त्यापेक्षां जास्त प्रयत्न करण्यास पाहिजे आहे. स्त्री शिक्षणासंबंधानें हा वेदर्भ प्रांत फारच मागें आहे. इकडे मॅट्रीक्युलेशन पर्यंत शिकलेल्या किती बरें सुभगिनी निघतील ? जर कदाचित् एखादी दुसरी निघालीच तर ती वऱ्हाडच्या तद्देशीय लोकांपैकीं तरी निघणार नाहीं हें खास आहे.

समाज बंधुनो! अशा प्रकारें जिकडे तिकडे या टोकापासून त्या टोकापर्यंत सामाजिक सुधारणा करण्या बद्दल वादविवाद सुरू असून कांहीं कांहीं गोष्टी होत ही आल्या आहेत. अशा नाना तऱ्हेचे लोक निरनिराळ्या प्रांतांतून उमरावतीस येतील. ते पोषाखानें, आचारानें जरी निराळे दिसले तरी ते आपले सर्व देशबंधुच आहेत हे कोणी विसरतां कामा नये. देशबंधुत्वाच्या नात्यानें त्यांशी बोलण्यास, मिळून मिसळून राहण्यास, एकमेकांबद्दल आदरसत्कार पूर्वक ममता दाखविण्यास आपण लाजतां कामा नये. देशबंधूंनो ! समाजांतील व्यक्तींचें सामाजिक हक्क कबूल करण्यास तयार व्हा, सारख्याच मुद्यावर सर्व मनुष्यमात्रांस वागविण्यास भिऊं नका; आणि राजकीय, सामाजिक, व नैतिक सुधारणा हातांत हात घालूनच चालल्या पाहिजेत हें तत्व पूर्णपणें हृदयांत ठेवा.

आपला.
सा० बि०

---

## वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशिर्ष वद्य ९ शके १८१९

राष्ट्रीय सभा हो जशी राष्ट्राची एक बाजू आहे तशी सामाजिक परिषद् ही दुसरी बाजू आहे. ह्या दोन संस्था राष्ट्राची मुख्य अंगें आहेत आणि या दोन संस्थांच्या द्वारानेंच इंडियन राष्ट्राला एकराष्ट्रत्व प्राप्त होत आहे. दोन्ही संस्थांची उपयुक्तता सारख्याच योग्यतेची आहे इतकेंच नाहीं तर एकी शिवाय दुसरी संस्था लंगडी पडते आणि उभय संस्थांचें अस्तित्व परस्परांस परिपोषक आहे. राजकीय संस्थेपासून सरकारी नोकरांचा एक मोठा वर्ग अलिप्त व निराळा आहे. आपल्या नोकरांचा संबंध राष्ट्रीय सभेशी असूं नये असा सरकारचा मानस आहे आणि त्या प्रमाणें हुकुमाची अंमलबारी चालूं आहे. पण सामाजिक परिषदे संबधानें तसा कांहीं प्रकार नाहीं. सर्व लोक तिचे सभासद होऊं शकतात आणि अशा संस्थेच्या हातून आपली राष्ट्रीय उन्नती चांगली होण्याचा बलवत्तर संभव आहे. या संस्थे पर्यें मन घालण्यास सरकारी नौकरांनीं काडीमात्र शंका धरूं नये. किंबहुना बिनसरकारि मंडळीवर राष्ट्रीय सभेच्या कामाचा मोठा बोजा पडतो तर सामाजिक परिषदेच्या बाबदींत निदान त्या मंडळीस जंगी मदत देऊन त्यांचें काम हलकें करणें हें प्रत्येक सरकारी चाकरींतल्या नेटिवाचें कर्तव्य आहे. तशात सामाजिक परिषद् मोठी दैवशाली आहे. तिच्या तैनातीला राष्ट्रीय सभेचा मंडप वगैरे, सामुग्री आपोआप बिनखर्चानें मिळते अर्थात् सरकारी नौकरांवर सामाजिक परिषदेचा मोठासा खटाटोप पडत नाहीं. आयतीच सर्व सिद्धता होते. तेव्हां सामाजिक परिषदेच्या पुरस्कर्त्यां मधील सरकारी नौकरांनीं आपल्या सहगामी राष्ट्रीय सभावाल्या मंडळीस थोडाबहुत विसावा द्यावा हें उचित होय.

सामाजिक परिषदेच्या संबधानें व्यवस्थेची मोठीशी भानगड नाहीं तरी ८००। ६०० रुपयांचा अवान्तर खर्च पडतो. यंदा स्त्रियांच्या कलाकौशल्याचें प्रदर्शन व्हावयाचें आहे आणि त्या निमित्त २०० रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. तेव्हां हा खर्च भरून काढण्यासाठीं वर्गणी उभारणें सुरूं केलें आहे. सरकारी नोकरींतल्या सुखवस्तु गृहस्थांवर आणि इतर लोकांवर हा वर्गणीचा कर बसविण्यासाठीं सामाजिक परिषदेचे प्रांतिक प्रेसिडेंट रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यांनीं खटपट चालविली आहे. अशा सामाजिक सत्कार्याला वर्गणीचा आश्रय पुष्कळ लोक उदार पणानें देतील अशी आह्मास आशा आहे. परंतु ही वर्गणी सर्व लोकां पासून मिळावी असें वर्गणी गोळा करण्यांत मूळ तत्व कायम ठेविलें आहे. रक्कम थोडी आहे तथापि तिचे आश्रयदाते सर्व प्रकारच्या व्यवसायिकांच्या समूहामध्यें असावे अशी योजना केली आहे. वर्गणीचें तत्व तिच्या स्वल्पतेनें लघुत्व पावत नाहीं हें प्रत्येकानें विसरता कामा नये. यथाशक्ती मदत केल्यानें मनुष्य कृतकार्य होतो, समाजाच्या उन्नतीला स्वकृतीनें पुष्टी देतो आणि दुसऱ्यास चांगलें उदाहरण घालून देतो. वर्गणीची रक्कम रा० रा० रामचंद्र विष्णु महाजनी बी० ए० यांच्याकडे भरावी. याच गृहस्थांस मुख्य खजिनदार या जिल्ह्या संबंधानें नेमण्यांत आलें आहे. आमच्याकडे कोणी वर्गणी पाठवितील तर ती आह्मी मोठ्या आनंदानें त्यांच्याकडे रवाना करूं.

---

## "राष्ट्रीय सभेचा तेरावा वाढदिवस"

( आमच्या एका मित्राकडून )

आणखी पंधरा दिवस लोटले कीं पुरे ! मग आह्मां भारतीयांची कोण धांदल उडणार ह्मणतां ती पुसूं नका ! अगोदरच बिचारे भारतीय दुष्काळ, बहूत वर्षांनीं भेटीस आलेला महामारीचा वडील व लोचट भाऊ प्लेग ( ग्रांथिक सन्निपात ) , धरणीकंप, व अप्रासंगिक व निष्कारण पेटलेला राजक्रोधाग्नी इत्यादिक अनाहूत अनादरणीय अशा पाहुण्यांची सरबराई करतां करतां जेरीस आलेले आहेत ! त्यांच्यांत त्राण व हुरूप ही बहुतेक नामशेष झालेलीं ! असें असून ही त्यांनीं राष्ट्रीय सभेच्या तेराव्या वाढ दिवसाची भक्कम तयारी कंबर बांधून चालविली आहे हें पाहून फार समाधान वाटतें. ह्यूम, वेडर्बर्न, दादाभाई, बानर्जी, अयोध्यानाथ, अय्यर, चार्लू इत्यादि पाश्चिमात्य व पौर्वात्य महासंताच्या प्रसादानें आर्यमातेला राष्ट्रीय सभेसारखें अलभ्य असें कन्या रत्न होऊन बारा वर्षें होतील. आर्यमाता वृद्ध झाल्या कारणानें तिनें वरील संतवृंदावरच तिची जोपासना करण्याचें पूर्णपणें सोंपविलें! राष्ट्रीय सभा ह्मणजे आह्मा आर्यांची सख्खी बहीण ! पण तिची जोपासना कशी करावी यांचा रस्ता आह्मास माहीत नसल्या कारणानें प्रथम प्रथम सर्व भार आह्मी वरील संतवृंदावरच टाकिला होता. व आतांहीं आह्मी त्यांच्याच धोरणानें चालत आहों. श्री भगवान् कृष्ण जन्मास आले तेव्हां कंसाची जी स्थिति झाली होती तीच स्थिति राष्ट्रीय सभा जन्मास आल्यापासून तिच्या द्वेष्ट्यांची झाली आहे. पण राष्ट्रीय सभेचे जन्म कालचे ग्रहच बलवत्तर !! ह्मणूनच तिनें नाना संकटांतून पार पडून हीं बारा वर्षें पाहिली आणि तीच आमच्या उत्कर्षास सर्वोतोपरी कारण आहे अशी आमची खात्री झाली आहे. ह्मणून आह्मी तिला क्षणभर विसंबत नाहीं व कधींही विसंबता कामा नये. तिचा जन्म झाला तेव्हांच आदिमातेनें माझ्या " छबिलेला " तिच्या

योग्यते प्रमाणें वर मिळेल काय ह्मणून मि. ह्यूम, दादाभाई आदिकरून संतमंडळीस प्रश्न केला. तेव्हां त्यांनीं प्रश्नफल पाहून वर्तविलें कीं ईश्वर, सत्य दृढ, निश्चय व उद्योग यांच्या प्रसादानें तिला योग्य असाच वर मिळेल व त्या योगानें ती उभयकुळांच्या उद्धारांस कारणीभूत होईल. मात्र या गोष्टीस कालावधि लागेल. आईची ममता व तिची दूर दृष्टीं ! पहा केवढी आहे ती ? वराचे नांव, गांव, सांगून उपयोग नाहीं कारण न जाणो एखादा तिराच बाप्या बराचसा हुंडा देऊन आपलीच मुलगी द्यायचा ह्मणजे फसला बेत !!! शिवाय यां जगांत उपद्व्यापी व विघ्न संतोषी लोक कां थोडे आहेत. योजिलेल्या वरासंबंधानें उगीच कोठें अलिकडे अलिकडे बोलणें चालणें चाललें होतें तों आंग्लो इंडियनस्, हॅमिल्टन् हारिस, सर भावनगरी ( हे राष्ट्रीय सभेचे उलच्या काळजाचे बंधु बरें ! ) हे हितशत्रु मोडा घालण्यास तयारच ! असो आतां राष्ट्रीय सभा ही बारा वर्षाची झाली. व आर्यशास्त्राप्रमाणें ती "लग्नाला योग्य जाहली आहे." पण "सामाजिक परिषद्" ह्मणून "राष्ट्रीय सभेची आवळी जावळी बहीण आहे. तिचें डोकें फार विचारी आहेसें दिसतें ! तिनें सल्ला दिला कीं "राष्ट्रीय सभेचें" इतक्यांत लग्न करून उपयोगी नाहीं. देश, काल पाहून वर्तलें पाहिजे. ती गुणवान आहे, रूपसंपन्न आहे, कुलवान आहे, तिच्या लग्नाची कांहीं पंचाईत पडणार नाहीं. चार पांच वर्षे उशीर कां होईना ! तोंपर्यंत ती अंगापिंडानें चांगलीच भरेल. शिवाय राष्ट्रीय सभेकरितां ज्या वराची योजना केली आहे तो वर अतिश्रेष्ठ राजकुलांतला आहे. राष्ट्रीयसभाही कांहीं हलक्या सलक्या कुळांतली नव्हे. तिच्यामध्यें आर्य तेज जाज्वल्य आहे. आतां ही सोयरीक जमण्यास पुष्कळ अडचणी व संकटें येतील. व वधू कडील लोकांस अनिवार संकटें भोगावीं लागतील. तेव्हां कोठें हा योग घडून येणार ! त्याला काल लागेल ! व तसें वर्तविलें ही आहे. तेव्हां सध्यां आपणास कांहीं वर्षे पर्यंत राष्ट्रीय सभेचा वाढदिवसच साजरा केला पाहिजे. व तिची शक्ति कोणत्या खऱ्या, योग्य व प्रासंगिक उपायांनीं वाढेल त्या उपायांची योजना आपणांस केली पाहिजे. वराकडील मंडळीस आपली बहीण "राष्ट्रीय सभा" ही पसंत पडली आहे असें दिसतें. नाहींतर "स्थानिक स्वराज्य" "कायदे कौन्सिलांत सभासद निवडण्याचा हक्क" वगैरे साखरपुडे तिला ते लोक पाठवून देतेना. आतां वराकडील मंडळीचे जे अधिकारी आहेत, जे मंत्री आहेत व लाळ घोटणारे द्वारपाल श्वानवृत्ति आहेत ते आपल्या अकांड तांडवानें मंत्रजागरणानें, व भुंकण्यानें आपल्या यजमानाचे कान फुंकतात व भरतात आणि आह्मांस भेवडावितात. त्यामुळें आह्मांस त्रास–जुलुम वना–सोसावा लागतो हें खरें. पण त्यास आपण खचितच भीक घालतां कामा नये. तेव्हां कशास न जुमानता, न्याय दृष्टीनें, कायदेशीर रीतीनें, सत्यास धरून व आर्यकुलाला साजेल अशा मार्गानें राष्ट्रीय सभेच्या वाढ दिवसाचा उत्सव करण्यास अगदीं कचरतां कामा नये. यंदाचा तेरावा वाढ दिवस आहे. व तत्संबंधी उत्सव विदर्भ देशांतील अमरावती नामक पुराण प्रसिद्ध अशा नगरींतच व्हावयाचा आहे. तेव्हां राष्ट्रीय सभेच्या सर्व बंधूंनीं तो समारंभ साजरा केलाच पाहिजे. मध्यंतरीं राष्ट्रीय सभेचा "विदर्भ" देशाशीं कांहीं संबंध पोंचत नाहीं. ह्मणून तिचा वाढदिवस अमरावतीस करितां येत नाहीं ह्मणून आमचा सरकार ( विदर्भ देशचा सरकार ) कानमंत्र सांगण्याच्या कांहीं निरुद्योगी लोकांनीं खटपटी चालविल्या होत्या. पण त्यांत त्यांनां यश आलेंच नाहीं हें सर्वांस ठाऊक झालेंच आहे. ह्मणून विदर्भ देशांत उत्पन्न झालेला व विदर्भ देशाचें केवळ भूषण असा जो कवि भवभूति त्यानें

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञां ।
जानंति ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्तिमम कोऽपि समानधर्मा ।
कालो ह्ययं निरवधि र्विपुलाच पृथ्वी ॥

या श्लोकांत उपदेश केल्याप्रमाणें आपण हातीं घेतलेलें काम आपणांस काया, वाचा-मनें करून केलेंच पाहिजे. ज्यांच्या प्रांतांत प्लेगोबा अद्याप पाहुणचार घेतच असतील त्यांना समारंभास हजर राहतां कदाचित् येणार नाहीं तर त्यानीं इतर प्रकारानें तो समारंभ साजरा केलाच पाहिजे ! व जे हजर राहतील त्यानीं वाढदिवसाचें पक्वान्नभोजन पदरांत पाडलें ह्मणजे आपलें काम आटपलें असें समजूं नये

# The Berar Samachar

MONDAY DECEMBER 13 1897

The Government of India have characterized the National Congress as a liberal and constitutional institution of India. They want to stand aloof from this political association and have therefore issued a circular to the effect that the Government servants should take no part in the movements of the Congress. The Government of India have no objection to the attendance of their servants as formal visitors and sight-seers. In spite of this general and moderate order of the Government, some officers make it a point to throw a feeler in the midst of their servants and to order them to have no concern whatever with the Congress-wallas. A man cares more for his bread than for the Congress and goes sometimes the length of expressing disaffection towards the Congress. The visitors' gallery of the Congress is open to visitors and we shall be glad if we get an authoritative declaration of Mr. Bullock that he has no objection to a formal visit to the Congress. We think that the Government servants can safely be onlookers pure and simple. We request the Reception Committee to make a reference on the point. The matter is urgent and a right decision thereon will dispel from people's minds hazy and wrong notions of their liabilities as simple visitors.

We need not mention here the plain axiomatic fact that the National Social Conference is an institution which is in the good books of the Government and the latter will be glad to rejoice at an assembly where all of their subjects will sit together to reform the society as a whole under the benign influences of Her Majesty's rule.

We are glad to notice the way in which the Local Administration has devised means to prevent the Epidemic from entering the outskirts of our province. We are still more happy to find that the measures which will shortly come in force after they receive the formal sanction of the Resident at Hyderabad, though essential in the interest of public health of the Province, are in no way intended to throw any unnecessary obstacle in the way of delegates from Bombay side desiring to attend the coming sessions of the National Congress. We have therefore to request our friends from the sister Presidency, not to get alarmed at the regulations which will be published shortly. A careful perusal of them will at once clear all the apprehensions rightly or wrongly entertained so long. Persons coming from *infected* areas, *will* be detained in *quarantine* at Malkapur for a period of seven days; but they will be exempt from detention in the absence of any illness provided they produce certificates from the Plague authorities in their respective areas of their not being exposed to any plague infection for a period of ten days immeditely preceding their departure. Similarly persons arriving from non—infected areas such as Madras, Kolhapore and others, but who may have travelled through infected areas, will be exempt from detention if they have not broken their journey "en route."

In spite of all odds, the 13th Indian Nationl Congress will be held at the capital of Berar in the next Christmas. The time is most critical and the occasion promises a grand achievement if we succeed in holding the Congress as promised. We ardently hope—and earnestly feel that we realize the hope—that all people will rise equal to the greatness of the national task. The patriotic fervour is intense in the hearts of our Berar-people and we pray to our countrymen that they will muster strong to make the Congress a living and permanent institution. The arrangements of the Congress are well approved of by the Local Government and we are obliged to Messrs. Plowden and Bullock for their kind assurance in making the sessions of the Congress as easy as possible. The plague-rules are at work but the extreme measure of human precaution coupled with the harmonious attitude of the Government has dispelled reasonable fears on that account. We were ransacking the literature of the Congress to embody in fitting eloquent terms all notions of the aims of the Congress and the methods of arriving at them; and we cannot helping quoting the invigourating and philosophical explanation from the speech of Rao Bahadur V. M. Bhide at the 11th Congress of Poona:—

"The Congress is a great instrument of political education, welding together all the various races and creeds of India into a great and glorious whole, destined under Providence to take its rank among the foremost nations of the world. The welding process is always a work of time, and implies a long course of heating and hammering, and this process of heating and hammering has to be repeated times out of number before the union is completed. The hammering is done for us under Providence by great extraneous agencies represented by the supremacy of a militant civilization and literature, which will allow us no rest and no seclusion from the outside world, but it will force us to take our place in the race of material improvement in which it deservedly occupies the formost position. Not all the hammering in the world, however, can accomplish the full results of the welding process unless it is accompanied by a responsive generation of internal heat, without which the outside forces would only splinter us to pieces, as has been unfortunately the case in many other parts of the world, where old civilizations have crumbled down and never learnt to raise their head again. Even in our own days in these last years of the 19th century, we have before us the spectacles of a great Mahomedan power in Europe and a great Mongolian power in Asia unable to retain their places from sheer inability to generate the heat without which the outside influences can never work to any good account."

## वऱ्हाड

हवामान—थंडी विशष कडाक्याची पडते. सध्यां पर्यंत सार्वजनिक आरोग्य वाईट नाहीं. प्लेगाचा आजार उद्भवण्याची मात्र मोठी दहशत पडली आहे पीकाच्या आमदानीनें लोक सुखांत आहे.

मे० प्रिडो साहेब डिपुटी कमिशनर, आकोला, यांची स्वारी बाळापुरास असून पुढील मुक्काम येणें प्रमाणें आहेत:—

| तारीख. | मुक्काम. |
|---|---|
| १३।१४।१५ दिसेंबर | बाळापूर. |
| १६ | वाडेगांव |
| १७ | सस्ती. |
| १८।१९ | आलेगांव |
| २० | पातूर. |

येत्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेचें अध्यक्षस्थान मंडळीच्या विनंती वरून रा. रा. वामनराव हरी कोल्हटकर जज्ज, जबलपूर यांनीं स्वीकृत केलें आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय. या अध्यक्षस्थानाला अशा खऱ्या लोकमान्य सुधारकाची निवड झाली हें विशेष अभिनंदनीय आहे.

अलिशान रेसिडेंट मि० प्लौडन यांची स्वारी येत्या २९ वे तारखेच्या सुमाराला वऱ्हाडांत येणार आहे तेव्हां साहेब बहादूर काँग्रेसच्या प्रतिष्ठित व विख्यात प्रेक्षकांमध्यें अग्रस्थान सुशोभित करितील अशी उमेद आहे

आह्मास लिहिण्यास आनंद वाटतो कीं रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे तहशिलदार आकोला यांस माजिस्ट्रेट वर्ग २ चे अधिकार देण्यांत आले आहेत.

गेल्या दुष्काळांत गरीब लोकांच्या सांगोपना प्रीत्यर्थ जो उदार आश्रय मिळाला त्य बद्दल लोकांचे आभार मानण्याच्या इराद्यानें मे० प्रीडो साहेब बाळापूरास आज दरबार भरविणार आहेत.

आज पासून भुसावळ व बडनेरा यांच्या दरम्यान मालाच्या गाडीला माणसांचे डबे जोडीत होते ते आज पासून बंद करण्यांत आले आहेत. यापुढें ही भिकार गाडी बंद झाल्यामुळें लोकांची मोठी गैरसोय होणार आहे.

इलिचपुरास नाना साहेब देशपांडे यांच्या वाड्यांत रा० रा० श्रीपाद महादेव वकील यांच्या अध्यक्षतें खालीं जाहीरसभा भरून राष्ट्रीय सभेसाठीं १३७ मुखत्यार निवडण्यांत आले.

## वर्तमानसार

### अजब तिजोरी.

कोचीन— चीनचा राजा मोठा हैशी आहे आणि पूर्वेकडील इतर राजाप्रमाणें त्याजवळही अपरंपार संपत्ति आहे. पण तिचा व्ययं कोणत्या रीतीनें करावा हें मात्र त्याला माहित नाहीं. त्यानें आपला बहुतेक खजिना एका चमत्कारिक तिजोरीत बंद करून ठेवला आहे. त्या शिवाय त्याचें पुंष्कळसें जवाहीर त्याच्याच महालाच्या आवारांतील तलावांतील जीं झाडें आहेत त्याच्या सेटांत भरलेलें आहे. त्या तलावावर चौकी पहारा नाहीं. पण ज्याला वाटेल त्यानें तलावांतून पोहून खजीना असलेल्या झाडाजवळ जावे व त्यांतील हवे तेवढें जवाहीर घेऊन चालते व्हावें अशी तेथील रीत आहे. परंतु आश्चर्य हें कीं अशा रीतीनें उघड्यावर खजीना ठेवला असतां आणि तो वाटेल त्यास घेऊन जाण्याची परवानगी असतां आजपर्यंत एकानेही त्या खजिन्याजवळ जाऊन त्यांतलें जवाहीर आणण्याची हिंमत केली नाहीं. याचे कारण असें सांगतात कीं, त्या राजानें तो खजिना जसा उघड्यावर तलावाचे मध्यावर ठेविला आहे त्याप्रमाणें मेठमोठाले जबरदस्त मगरही त्या तलावांत सोडले आहेत. राजाचा खजिना घेण्यास कोणी मनुष्य अन्यास आपले आयेंत काम होईल अशा इच्छेनें ते तसल्या गिऱ्हाइकासाठीं नेहमी अतुर झालेले असतात. जेव्हां राजाला च स्वतः खजिन्याची जरूर लागते जेव्हां राजा व प्रधान यांच्या एकवट हुकूमानें तलावांतीऊ मगर मारून टाकण्यांत येतात व काम झाल्यावर पुन्हां नवीन मगर त्या तलावांत आणून सोडले जातात. अजब तिजोरी खरी. गु०

जर्मन रेलवेवर तिकीट देणारांची मुळींच जरूरी नाहीं तिकिटांच्या मोठ्या पेट्या केलेल्या असतात. प्रत्येक डब्यावर गांवाचें नांव व भाडे लिहिलेले असते उतारूनें तितके पैसे आंत टाकावें ह्मणजे पटकन तिकीट बाहेर येतें.

चिनी भाषेच्या परीक्षेस हिंदुस्थान सरकारानें आठ महिन्यांची रजा ठेविली होती परंतु तेवढी रजा पुरेशी होणार नाहीं ह्मणून एक वर्षाची रजा ठेविली आहे. ह्या रजेशिवाय चीनची राजधानी पेकिन येथें जाण्या येण्यास लागणारे दिवस अधिक रजा मिळेल असें प्रसिद्ध झालें आहे.

कौंटेस मिऱ्यांडा या नांवाची एक स्पेन देशची श्रीमंत बाई आहे. तिनें ख्रिस्ती धर्म टाकून बुद्ध धर्माचा स्वीकार केला. ही बाई चालू नोव्हेंबर महिन्याच्या प्रारंभी सोलोम. ध्यें आली असून तेथें तिचा तीन वर्षेपर्यंत राहण्याचा विचार आहे. ह्या तीन वर्षात ती तेथें बुध्द धर्म पुस्तकाचा आणि दुसऱ्या बुध्द ग्रंथाचा अभ्यास करून नंतर ती अमेरिकेंत बुद्ध धर्माचा उपदेश करण्यासाठीं जाणार आहे. ह्या बाईला मि. धर्मपाल ह्या नांवाच्या बौध्द धर्मी गृहस्थांनीं बुद्ध धर्माची दीक्षा दिली आणि ती त्या धर्माची कट्टी भक्त बनली आहे.

झारिनाच्या गाडीवरील घड्याळ हलीची रशियाच्या बादशाहाची [ झारची ] पत्नी आमच्या राणीची नात ह्मणजे जर्मनीच्या बादशाहाची धाकटी बहीण आहे तिचे लग्न झाले त्यावेळीं सेंटपिटस्बर्ग येथील राहाणाऱ्या इंग्लिश स्त्रियांनीं तिला एक उत्तमप्रकारचे घड्याळ नजर केले. तें त्या बादशाहिणीच्या [ झारिनाच्या ] गाडींत बसविलें गेलें आहे हें घड्याळ कांसवाच्या पाठीमध्यें बसविलें असून त्याचे सर्व काम शुद्ध सोन्याचे केलेलें आहे. त्याचे कांटे हिरेजडित असून त्याच्या तकटावर त्या बादशाहाच्या ( झारच्या ) मुकुटाचा आकार आणि त्या खाली A हें अक्षर हींही हिऱ्याचीच करून बसविली आहेत सारांश हें घड्याळ मोठें मौलवान् झालें आहे.

एक शतकापूर्वीचें पोस्ट आफिस—म्यांचेस्टर येथील पोस्ट ऑफिस शंभर वर्षापूर्वी एका पोस्टमास्तरणीच्या ताब्यांत असून तिला तिच्या मुली आणि दोन हलकारे ( टपाल नेणारे ) मदतगार असत. आणि तेवढ्या मंडळीकडून म्यांचेस्टरच्या पोस्ट आफिसचें काम चालत असे. पण तेंच आफिस आज शंभर वर्षांनीं केवढें झालें आहे पहा! हल्लीं त्या पोस्टाकडे २,२२२ नोकर असून त्याशिवाय शहरांतल्या व भोंवतालच्या वाड्यांतल्या पोस्टाच्या इतर शाखांवरील पोस्टमास्तर व त्यांचे हाताखालचे लोक असें एक मोठें टपाल शाखेचें लष्करच बनलें आहे. ह्मणजे, शंभर वर्षांपूर्वी जें पोस्टआफिस एका स्त्रीच्या ताब्यांत होतें तें आतां सुमारें ३,००० लोकांच्या समुच्चयाकडून सुव्यस्थित रीतीनें चाललें आहे एवढा तेथील टपालच कारखाना वाढला त्याकडे इतके लोक गुंतले गेले.

गरीब लोकांस सागोतीची मेजवानी—व्हिक्टोरिया ( आस्ट्रेलिया ) येथील सरकारानें कांहीं महिन्याखालीं म्यांचेस्टरच्या लॉर्ड मेयरच्या पत्यावर मेलबोर्न येथील म्यांचेस्टर येथें आगबोटीवरून मारलेलीं व बर्फात ठेवून नकुजेशी केलेलीं ६०० मेंढरें म्यांचेस्टरच्या गरीब लोकांना सागोतीची मेजवानी देण्यासाठीं पाठविलीं. आस्ट्रेलियांतून दरसाल हजारो खंडी सागोती यूरोपांत विक्रीसाठीं पाठविण्यांत येते. महिना महिना आगबोटीला प्रवास करण्यास लागूनही आस्ट्रेलियाखंड परदेशास मांस पुरविते. ह्मणजे मांस नीट रीतीनें राखून परदेशास पाठविण्याचें कसब तिकडील खाटकांस उत्तम साधलें आहे. व इंग्लंड वगैरे देशांकडून आस्ट्रेलियाच्या खाटकांस फार चांगला आश्रय मिळतो हें लक्ष्यांत वागवून, वर लिहिल्याप्रमाणें तिकडील एका देशाच्या सरकारानें परोपकार बुद्धीनें वरील कृत्य केलें. सबंध ६०० मेंढरांचीं प्रेतेच म्यांचेस्टर येथील गरीब व अनाथ लोकांना खाण्यास देण्यासाठीं पाठविलीं.

एक्स्रे फोटोग्राफी—या नवीन युक्तीवरून काय काय विलक्षण शोध निघतील तें सांगतां येत नाहीं, व त्या युक्तीचा कोणीकडे कसा उपयोग होईल तें समजत नाहीं! प्यारिसच्या स्टेशनावर येणाऱ्या मालावरील जकातीचा निर्णय करण्याकरितां ह्या युक्तीचा उपयोग करण्यांत येतो; कोणत्याही मालाच्या गठ्ठयांत किंवा पेटींत कोणकोणत्या प्रकारचा माल आहे हे तो गठ्ठा किंवा पेटी न उघडतां व न फोडतां समजून घेण्यांत येतें. आणि येणेंकरून माल पाठविणाराला व स्टेशनावरील जकात वसूल करणारांना विशेष त्रास किंवा आटापीट न पडतां आपलें काम करितां येते, ही मोठी सोय झाली आहे. आतां ह्या युक्तीनें असें एक विशेष काम होत असल्याचें अनुभवास आलें आहे कीं, प्रत्यक्ष माणसाच्या अंतःशरीररचनेची स्थिती जशी ह्या फोटोग्राफीनें समजतें त्याच प्रमाणें त्या माणसाच्या फोटोवरून जर एक्स्रे फोटोग्राफीनें पाहिलें तर ही अंतःस्वरूप हुबेहुब समजते! व ह्याप्रमाणें कोणाही मनुष्याच्या अंतःशरीररचनेची डॉ० ला परीक्षा करणें असले तर त्याला प्रत्यक्ष त्या मनुष्याला आपले पुढें आणून व त्यावर एक्सरे फोटोग्राफीचा प्रयोग करून पाहण्याचें कारण नसून, ज्या माणसाची अंतःशरीररचना पाहण्याची असेल त्याचा फोटोग्राफ डॉ. कडे पाठविला ह्मणजे त्यावर एक्स्रे फोटोग्राफीचा प्रयोग करून त्यास सर्व प्रकारचें ज्ञान करून घेतां येते! डॉ. रॉन्ट्जेन साहेबांच्या या एक्स्रे फोटोग्राफीनें डॉक्टर लोकांस हें केवढें साहाय्य झालें ! त्याचें महत्व वर्णन करितां येत नाहीं.

हुकूम सुटणार—सरकारी नौकरांनीं पुणें शहरापासून तीन मैलांपलीकडे राहून रोज नौकरीवर येत असावें असा सरकारी हुकूम सुटणार असल्याची वदंता आहे. ज्ञा. च

अमेरिकेंतील युनायटेडस्टेटसमध्यें कोलोऱ्याडो नांवाचा ओसाड प्रदेश आहे. तेथें छत्री घेतल्या शिवाय पावसांत मनुष्य गेला तरी तो भिजत नाहीं. तेथें पावसाचें तुफान होतें परंतु त्या पावसाचा एक थेंबही जमीनीवर येत नाहीं. वर पहावें तर ढगांतून पाऊस पडतो आहे असें दिसतें परंतु ह्या ओसाड प्रदेशांवरील हवेच्या उष्ण थरांत पाऊस आला ह्मणजे त्याचे हवेत शोषण होऊन जाते आणि खालीं एक थेंबही येत नाहीं.

उत्तर हिंदुस्थानांतील धरणीकंपानें जें नुकसान झालें आहे तें भरून काढण्यास मदत ह्मणून सरकारानें ११ लाख रुपये खर्च करण्याची परवानगी दिली आहे. आ. व.

सरहद्दावरील लढाऊ लष्कराकडे दरमहा एक कोटीचा खर्च होत आहे! ही लढाई गेल्या जुलैंत सुरू झाली. तेव्हां पांच कोट तर उडालेच. आणखी किती उडतात कोण जाणें! स०

भविष्य—सन १८९९ सालीं नवंबरच्या १३ व्या तारखेस ह्मणजे बरोबर २ वर्षांनीं याच आठवड्यांत मोठा अनर्थच होणार असल्याचें युरोपियन ज्योतिषी सांगतात, त्यांचे असें ह्मणणें आहे कीं, त्या दिवशीं पृथ्वीचा लय होईल. कित्येकांचें ह्मणणें आहे कीं जरी सर्व पृथ्वी लयास जाणार नाहीं तरी पृथ्वीचा कांहींसा भाग तरी समुद्रास्तृप्यंतु होणार आहे असा योग येण्याचें कारण सूर्यापासून एक तारा पतन पावेल व तोच सर्व जीवजंतूचा संव्हार करील.

न्या. सिं.

कोर्टाचे बेलीफ बजावणीस जातील तेव्हां गांवचे पोलीस पाटील व गांव कामगार यांणीं त्यांस मदत करणें हें त्यांचें कर्तव्य आहे, असें ठरविण्यांत येत असल्याचें समजतें.

मद्रास इलाखा कडपास पावसानें दगा दिल्यामुळें पिकें करपून लोक मोठ्या संकटांत पडलें आहेत. खाण्याला अन्न नाहीं आणि सरकार सारा भरण्याला पैसा नाहीं!

पोष्ट खात्याचा कायदा नवा बनविण्यांत येत आहे. आज पर्यंत ज्या बेकायदा गोष्टी होत असत त्या कायदेशीर करून आणखी बरींच नवी कलमें घातलीं आहेत. बीभत्स किंवा राजद्रोही पत्रें, पुस्तकें फोडून त्याचा नाश करण्याचा पोस्टाला अधिकार दिला आहे.

पाटणा जिल्ह्यांत पृथ्वीचे पोटांत कांहीं घरें सांपडलीं आहेत.

अमृतसरकडे एक दलाल जवाहीर खरेदी करण्यासाठीं आगगाडींतून जात असताना त्याला एका भामट्यानें गांठून गाडीतून उचलून बाहेर फेकले आणि त्याची रोकड घेऊन आपण ही उडी टाकून पसार झाला.

मद्रास मेल पत्राला एक गृहस्थ विचारतो कीं, मैलापुरास एक तरुण ब्राह्मण आला असून तो वर्षा पासून कांहीं खात नाहीं. वाटलें तर एखादे वेळ घोटभर पाणी पितो. हा ब्राह्मण नित्य तीन वेळां स्नान करून अनुष्टान करतो त्याची प्रकृती दुरुस्त असून पूर्ववत घट्टाकट्टा आहे हें कसें!

धा० वृ०

व्हियाना येथें सरकाराविरुद्ध मोठी मारामारी सुरू झाली आहे. पोलिसानें पुष्कळ दंगेखोरास कैद केले आहे.

खुद्द आस्त्रियाच्या पार्लमेंटांत मेंबरानीं दांडगाई केल्यामुळें अध्यक्षास पळून जाणे भाग पडलें व कित्येक मेंबर कैद करण्यांत आलें आहे

माझा कोरियावर ताबा कबूल करा तर केयाच हे ठिकाण तुह्मी घ्या असें रशियानें जर्मनीस कळविले आहे.

टर्कीनें थिसली प्रांतांतून बाहेर पडावें असें रशिया व फ्रान्स सांगत आहे

पूर्व यूरोप व एशिया या ठिकाणीं जर्मनीचे महत्व वाढत असल्यामुळें रशिया, फ्रान्स व इंग्रज यांनीं आपापलें हित रक्षण करण्याच्या तयारीस लागावें असें तिकडील एक पत्रकर्ता ह्मणतो.

पार्लमेंटाची सभा ता० ८ फेब्रुवारी रोजीं उघडेल.

विलायतेस वाऱ्याचे तुफान झाल्यामुळें किनाऱ्यावरील १२ जहाजे खलाशासह समुद्रस्तृप्यंतु झाली.

याच वादळाने वुलविच येथील दारूगोळ्याचा खजिना वाहून जाण्याचा संभव होता ह्मणून ७ हजार लष्करी लोक तेथें मदतीस ठेविले होते तरी बराच दारूगोळा वाहून गेला असें ह्मणतात.

गेल्या सोमवारी रात्री जर्मनीतली प्रेग शहरीं मोठा दंगा झाला. बंदुकीच्या बागनेटानें पोलिसास तो मोडावा लागला. ५० इसमांस कैद केले आहे. ठा० अ०

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवाशी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ......................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... .......८१

# वऱ्हाडसमाचार.

Six monthly........ 3 ............ 8
Single copy ... ... ... ... ... ... 4a

Advertisement
Below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ......4 as
Repe i ion Per line...3 as

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXI | AKOLA MONDAY 20 DECEMBER 1897 | NO 49

वर्ष ३१ | आकोला सोमवार तारीख २० माहे डिसेंबर सन १८९७ इ० | अंक ४९

### दुर्मिळ संधी

( मार्च १८९८ अखेर पर्यंतच )

**नानालहरी**— मासिक पुस्तक १८९७ जानेवारी पासून निघतें यांत विद्वानांचे, अत्यंत मनोहर, चटकदार संग्रहणीय निवडक निवडक विषय येत असतात. वर्षाची ट. ख. सह वर्गणी ८९. अगाऊ पाठविणारास अगर पहिला अंक व्ही. पी नें मागविणारास ८८ चें मनोरंजक अत्युत्तम स्त्रीचरित्र अवघ्या ८२ स मिळेल.

**मराठी विद्या**—लहान मुलाला व ढ मनुष्यास देखील बालबोध मोडी उत्तम लिहिण्यावाचण्याला शिकवून देणार असून यांत असा प्रयोग आहे कीं, त्यानें मोडी अक्षर सुरेख व तात्काळ वळते. किंमत ८१० दोन प्रती घेणारांस हरहुन्नर, औषधि, पक्वान्नादि अत्युपयुक्त माहितीचें ८१२ चें 'व्यवहार-मंजरी' पुस्तक इनाम.

**कर्नाटक महाराष्ट्र भाषामंजरी**—यानें मराठी जाणणारांस कानडी अगदीं सप्रमाण, शुद्ध व उत्तम लिहितां वाचतां बोलतां येईल. व कानडी जाणणारांस मराठी भाषेचें पूर्ण ज्ञान होईल. किंमत ८१२ दोन प्रती घेणारांस बिरबल बादशहाच्या गोष्टीचें १ रुपयाचें पुस्तक इनाम.

**गुप्तविद्याज्ञान**—यांत गुप्त व अप्रसिद्ध ज्योतिष, हुन्नर, मंत्र इ० आहेत. २ प्रतींचीं किंमत १ रुपया.

**इंद्रजाल**—ह्यांत मंत्र, तंत्र, जादू इत्यादि अद्भुत अल्पसाधनी क्रिया आहेत. २ प्रतीची किंमत ८१२ ही १८१२ चीं ४ पुस्तकें घेणारास 'रामविजयकथासार' ८१२ चें पुस्तक इनाम.

या शिवाय तऱ्हतऱ्हेचीं पुस्तकें आमचे कडे विकत मिळतील ट. प्या. व्ही. पी. खर्च निराळा.

नानालहरीचे प्रकाशक
पोष्ट–गड इंग्लज येथें इ० कोल्हापूर.

---

### राष्ट्रीय सभेची जाहिरात

यंदाची राष्ट्र सभा उमरावतीस ता. २७ माहे दिसेंबर रोज सोमवार पासून तीन चार दिवस होईल. मुंबई इलाख्यांत बरेच ठिकाणीं सांथीचा ताप पसरला आहे. तो या प्रांतांत राष्ट्र सभेच्या प्रसंगीं शिरू नये ह्मणून राष्ट्र सभेची कमिटी आपल्या कडून हरएक प्रकारची व्यवस्था करीत आहे. या बाबतींत नियम करावे व अशा तापानें आजारी असलेल्या लोकांस व ज्यांच्या अंगांत या तापाचें विष शिरलें आहे, असा संशय असेल अशा मनुष्यास मुळीं वऱ्हाडांत येऊं देऊं नये, अशी कांग्रेस कमिटीची खटपट आहे. या बाबतींत कमिटीच्या कांहीं गृहस्थांनीं मे. कमिशनर व स्यानिटरी कमिशनर साहेब यांच्या गांठी घेतल्या आहेत व या संबंधानें अलिशान रेसिडेन्ट सा० ब० यांच्या पर्यंत पत्रव्यवहार होऊन काय व्यवस्था करावयाची हें ठरलें आहे. व जिकडे हा रोग पसरला आहे तेथून येणारे लोकांस तपासणें व ज्यांच्या विषयीं शंका येईल त्यांना मलकापूरच्या अलीकडे एकदम न येऊं देणें वगैरे बाबद नियम मे. स्यानिटरी कमिशनर साहेब यांनीं केले आहेत. त्यांस मे. कमिशनर साहेब यांची मंजुरी मिळून अलिशान रेसिडेन्ट सा० यांच्या मंजुरी करितां ते गेले आहेत. तिकडून एक दोन दिवसांत येतील. व ते आल्यावर सर्वांच्या माहिती करितां व खात्री करितां तें छापून प्रसिद्ध करण्यांतही येतील

याजवरून स्पष्ट दिसून येईल कीं, सांथीचा ताप असलेलीं माणसें सभेला येण्याचा संभव नाहीं. तेव्हां नेमलेल्या दिवशीं राष्ट्र सभा खास भरेल.

मुखत्यार [ डेलिगेट ] ह्मणून सभेस येणारे गृहस्थांस सभेचे मंडपाचे आवारांत राहण्याची व जेवणाची सर्व सोय केली आहे. केवळ सभा पहाण्याकरितां येणाऱ्याची सोय केलेली नाहीं परंतु जर कोणास मुखत्याराप्रमाणे राहण्याची व जेवणाची सोय पाहिजे असेल तर त्यांनीं सभेचे सेक्रेटरी यांस २० दिसेंबरचे आंत कळविलें पाहिजे.

प्रत्येक मुखत्यारानें दहा रुपये फी देऊन आपलें नांव सभेचे दिवशीं प्रातःकाळीं १० वाजण्याचे आंत अगर सभेचे आदले दिवशीं नोंदविलें पाहिजे. नांवें नोंदण्याची जागा सभेचे मंडपा लगतच केली आहे. जे मुखत्यार निवडले गेले आहेत त्यांना दाखला देण्या करितां छापलेले नमुने जिल्हा कमिटीकडे व तालुका कमिटीकडे दिले गेले आहेत ते दाखल्याचे नमुने प्रत्येक मुखत्यारांनीं आपल्या बरोबर आणावे. दाखल्याशिवाय मुखत्यारांची नोंद होणार नाहीं.

मुखत्यारास एक फूल अंगावर लावण्या साठीं व एकेक पास मिळेल. पन्नास रुपये अगर अधिक वर्गणी देणारास पास—१० रु फी न घेतां फुकट दिला जाईल अगर एक १० रुपयांचें टिकीट फुकट मिळेल.

सभा पहाण्याकरितां येणारे गृहस्थांस टिकिटें विकत घ्यावीं लागतील. पहिली प्रत १० रुपये दुसरी प्रत ५ रु. टिकिटें मिळण्यास कदाचित् वेळेवर मारामार पडेल. ह्मणून टिकिटांची फी पूर्वींच मानिआर्डरीनें पाठवावी ह्मणजे नांवावर टिकिटें राखून ठेविलीं जातील. टिकिटें पूर्वींच विकत घ्यावी अशी शिफारस आहे. नाहीं तर वेळेवर टिकिटें न मिळालीं तर मंडळी नाउमेद होईल. २५ रुपये वर्गणी देणारास एक टिकीट ५ रुपयांचें फुकट मिळेल.

प्रत्येक मुखत्यारास सभेचे मंडपाचे आवारांत जेवणाची व्यवस्था केली आहे तर्थे जेवण करणें असेल तर एक टिकीट घ्यावें लागेल. तिकीट घेतल्याशिवाय जेवणाचे मंडपांत जातां येणार नाहीं सबब जेवणाचें टिकीट घेण्याची काळजी घ्यावी. जेवणाचे टिकीटांस पांच रु. फी पडेल. हें टिकीट कांग्रेस संपेपर्यंत एकच पुरेल.

यंदाच्या राष्ट्रीयसभे सारखा प्रसंग वऱ्हाडांत पहाण्यास मिळणें फार कठीण आहे तो आपल्या सर्वांच्या सुदैवानें येत आहे.

सभेसाठीं आपल्या हिंदुस्थान देशाच्या सर्व भागांतून लोक तर येतीलच पण वऱ्हाडांतील जमीदार, सावकार, शेतकरी, व्यापारी, वकील व इतर संभावीत गृहस्थही या सभेस येणार आहेत, तर लोकांनीं ही सभा पहाण्याची अमोलिक संधि दवडूं नये

रंगनाथ नरसिंह मुधोळकर
बाळकृष्ण हरी करंदीकर
सभेचे सेक्रेटरी.

---

### कला कुशलतेचें प्रदर्शन

पुष्कळ इतिहासकार व तत्वज्ञानी यांचें असें मत असें आहे कीं कोणत्याहीं राष्ट्राची उन्नती होणें, किंवा अवनती होणें हें त्या देशांतील स्त्रियांच्या हातीं मुख्यत्वें करून असतें. स्त्रिया ज्या प्रमाणें आपल्या मुलामुलीस शिक्षण देतील, त्याप्रमाणें तीं मुलें पुढें निपजून आपल्या देशाचें बरें वाईट करितील हा सर्व साधारण नियम आहे. स्त्री आणि पुरुष हीं संसाररूप गाड्याचीं दोन चाकें असलेंमुळें एकावांचून दुसरें नीट चालावयाचें नाहीं. तद्वतच स्त्रियांची उन्नती किंवा अवनती ही पुष्कळ अंशीं पुरुषांच्या साहाय्यावांचून होत नाहीं. पुरुष गैर मार्गानें वागले तर स्त्रियांनाही अडचण पडेल खरी, परंतु आपणच नीतीनें वागून, आपल्या पतीस ही त्याप्रमाणें वागावयास लावणें हा स्त्रीधर्म होय. हा मायामोह पसारा जर आनंदानें चालविला, तरच त्यांत सुख आहे. नाहींतर हा मृत्यु लोकचा नरक ह्मटलें असतां काय हरकत आहे? पतीची व स्त्रीची जर एक मताची जोड पडली नाहीं तरी स्त्रियांनींच कांहीं तडजोड काढून लोकांत फजीती न होईल असें रीतीनें वागून, आपल्या पतीसही त्याप्रमाणें वागावयास लावावे हाच त्यांचा मुख्य कर्तव्याचा भाग आहे. अशा प्रकारच्या स्त्रिया ह्या आर्यावर्तांत अनेक होऊन गेल्या. त्यांनीं आपल्या बुद्धीनं ज्ञानानें आणि कृतीनें सर्व भूमंडळास थक्क करून सोडलें होतें; अशा बद्दलचे पुष्कळ उपयुक्त दाखले आपल्या प्राचीन ग्रंथावरून आपणास सांपडतील. स्त्रियांना सुशिक्षित करणें, त्यांच्या कर्तव्यांची त्यांना पूर्णपणें माहिती करून देणें, मुलाबाळांचें संगोपन नीट रीतीनें करण्याबद्दल त्यांना समजावून देणें, आणि त्या प्रमाणें त्यांना वागावयास लावणें हे पुरुष धर्म होत. स्त्रियांनाही स्वतःच कोणकोणत्या गोष्टी करावयास शिकले पाहिजे, त्या सांगतों. घरांतील स्वयंपाकादि कर्तव्य, सडासारवण वगैरे स्वच्छतेचें कर्तव्य, मुलाबाळास लागणाऱ्या पांघरुणांची शिवण्याची व्यवस्था, वगैरे अनेक आहेत, आणि शिवाय फावल्या वेळांत करमणूक ह्मणून गळपट्टे, टोप्या वगैरे विणण्याचें काम. आज मी विणण्याचे, शिवण्याचे कामाबद्दलचे दोन शब्द सांगतों; कारण इतर गोष्टीप्रमाणेंच शिवणकाम हें फार महत्वाचें आहे. अगदीं गरीब स्थितींतील बायकांना मात्र ह्याबद्दल माझें कांहीं सांगणें नाहीं, कारण त्यांना एकंदर काम घरांतच करावे लागणार व थकून दमून गेल्यावर त्यांच्यांनीं घटका दोनघटका झोपेंत अगर गोष्टी बोलण्यांत वेळ घालविला तर काय मोठेसें आहे? पण श्रीमंताच्या व मध्यम स्थितींतील बायकांना मात्र बराच वेळ सांपडतो, कारण श्रीमंताच्या घरीं तर एकंदर काम करण्यास गडी माणसें ठेवण्याची ऐपत असते, व मध्यम स्थितींतल्यांस कांहीं कांहीं कामें घरीं करावीं लागतात खरी, परंतु त्यांच्या [श्रीमतांच्या] बायकांच्या वेळेचा निमावेळ तरी सांपडतो हें खास आहे. इतकाच वेळ त्यांनीं शिवण कामासारख्या महत्वाच्या गोष्टीकडे लावावा, पार्शी लोकांच्या स्त्रिया या कामांत फार पुढें गेल्या आहेत. आमच्या इकडील स्त्रियांनीं आह्मांस संसारांत पैशाचीच मदत केली पाहिजे असें आमचें ह्मणणें नाहीं. त्यांनीं शिंप्याकडे, आणि दुकानदाराकडे गळपट्ट्या सारख्या चिजा घेण्यांत जो पैसा खर्च होतो तोच वांचवावा, ह्मणजे ह्या गोष्टी त्यांनी घरींच तयार करावयास शिकावें; त्यांना ह्या गोष्टी येणार नाहींत असें नाहीं. पण बहुतेक वेळां आमच्याकडील बहुतेक वेळ आळसांतच जातो! कांहींचा झोपेंत व कांहींचा गप्पा मारण्यांत. स्त्री समाजाचें अशा प्रकारानें किती तरी नुकसान होत आहे? पुराण कथा वगैरे ऐकण्यास कांहींचा जाण्याचा परिपाठ असतो खरा, परंतु तेथें तरी निवळ पुराणा कडेच लक्ष देणाऱ्या फार थोड्या. ह्मणजे इकडच्या तिकडच्या गप्पा मारण्यांच बहुतेक वेळ जातो ह्मणण्यास हरकत नाहीं. अशीं आजमित्तीस किती बरें कुटुंबें सांपडतील कीं ज्यांच्या घरांतील चोळ्या, लहान मुलांचें आंगरखे हीं शिंप्याकडे जात नाहींत? फारच थोडी सांपडतील असें मला वाटतें. कांहीं स्त्रियांची बुद्धी या कामांत फारच चांगली असते असें मला वाटतें, इ० स०

१८९५ साली डिसेंबर महिन्यांत पुण्यास जें 'शिवण कामाचें प्रदर्शन" झालें त्यांत खरोखरच फार प्रेक्षणीय वस्तु होत्या. त्या आपल्या हिंदुस्त्रियांनींच केल्या होत्या असें वाटतें, कारण बक्षिसें ज्या वेळेस वाटलीं त्या वेळेस तीं बहुतक हिंदु स्त्रियांनांच मिळालीं होतीं. तेथें प्रदर्शनांत काय काय चिजा होत्या त्या पैकीं थोड्याशा जितक्या लक्षांत आल्या तितक्या सांगतों.

१ साधे शिवण काम:—चोळ्यावर काढलेला कशीदा, कांहीं रेशमाचें काम, कांहीं वेलबुट्या हीं खरोखरच फार प्रेक्षणीय होतीं.

२ लोकरी पैकीं काम:—गळपट्टे, टोप्या लोकरीची बारीक तारांतून विणलेलीं झाडें हीं फार चांगलीं होतीं.

३ रेशमाचें काम:—यांत कांहीं देवांच्या तसबिरी नकाशे वगैरे चांगले होते

४ कलाबतूचें काम:—जाकीटें, बायकांच्या बंड्या, चोळ्या वगैरे चांगल्या होत्या.

५ निरनिराळ्या रंगाच्या पोतेचें काम--- बारीक तारांतून गुंफलेलीं मण्यांचीं झाडें, लेखणी, करंडा वगैरे भोंवती गुंफलेली पोत हीं फार चागलीं होतीं इ० इ०

वरील प्रकारच्या एकंदर गोष्टी घडवून आणण्याचे श्रेय "करमणूक" पत्राच्या कर्त्याकडेस आहे. इतकें आरंभिलेलें काम असेंच जर पुढें चालेल, व ज्या ज्या ठिकाणीं कांग्रेसची बैठक होईल तेथील सुशिक्षित स्त्रीवर्गाकडून तें होईल तर खरोखरच आमचा स्त्रीसमाज सुधारल यांत शंका नाहीं. अशा प्रकारचें समाज प्रत्येक जिल्ह्यांत स्थापन झाले पाहिजेत. व त्यांत असल्या विषयांची चर्चा झाली पाहिजे. अशा प्रकारें युरोपियन, पार्शी सुशिक्षित स्त्रीवर्गाबरोबर जर आमचा मागें राहिलेला स्त्रीसमाज उद्योग करील तर आह्मांस कां बरें आनंद वाटणार नाहीं ? मुलींच्या शाळेंतूनच अशा प्रकारचें शिक्षण देण्याबद्दल सरकारनें तजवीज केली पाहिजे. ड्राइंग सारखा विषय त्यांना फारसा कठीण वाटणार नाहीं असें आह्मास वाटतें. मुंबई इलाख्यांत सोलापूर येथें सरस्वती मंदीर नांवाचा स्त्री समाज स्थापन झाला आहे. त्यांत अशा प्रकारचाही प्रयत्न होत आहे असें ऐकीवांत आहे. आपल्या ह्या वऱ्हाड प्रांतांत यंदा उमरावतीस वरील प्रदर्शन होणार आहे व सदरहू संस्था उत्पन्न करण्याचें तेथील सुशिक्षित स्त्रीवर्गानीं मनावर घेतलें आहे, हें एकून फार समाधान वाटतें. अशा प्रकारचें प्रदर्शन दरसाल भरविण्याची खटपट झाल्यास फार चांगलें होईल.

सारासारविचारी.

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष वद्य ११ शके १८१९

## जिल्ह्याचा दरबार

गेल्या सोमवारीं बाळापूर मुक्कामीं मि. एफ. डब्ल्यू. प्रीडो साहेब यांच्या अध्यक्षते खालीं या जिल्ह्यांतील प्रमुख गृहस्थांचा दरबार भरला होता. आलिशान रेसिडेंट साहेबांच्या सहीच्या सन्मानदर्शक पत्रिका बहुमानानें देण्यासाठीं दरबार भरविला होता. गेल्या जून महिन्यांत जो ज्युबिलीचा महोत्सव झाला त्या आनंदसमयाच्या मितीच्या ह्मणजे २२ जून १८९७ च्या तारखेच्या या पत्रिका आहेत. चक्रवर्तिनी महाराणी सरकारच्या नांवानें नामदार व्हाईसराय व गव्हरनर जनरल इनकौंसिल यांच्या हुकूमावरून पत्रिका लिहिण्यांत आल्या आहेत आमच्या जिल्ह्यांतील तीन गृहस्थांस हा पत्रिकेचा अद्वितीय लाभ मिळाला. हे तीन राजमान्य महाजन लोकांच्या परिचयांतले आहेत आणि त्यांस बहुमान मिळाल्या बद्दल सर्वजण सरकारच्या गुणपरीक्षणा बद्दल फार तारीफ करून त्यांचें योग्य अभिनंदन करितील. या तीन गृहस्था पैकीं आमच्या आकोल्याचे मुसलमानांतील बुजरूक, वजनदार, व अक्कलवान सौदागर मि. सिलिमखान दाऊदखान हे आहेत. यांनीं मुनसिपालिटींत बहुत वर्षें जनसेवा केली आणि इतर सार्वजनिक कामांत वेळोवेळ पुष्कळ मदत दिली आहे. आणि त्यांच्या या लोककार्याबद्दल सरकारांतून त्यांचे आभार मानण्यांत आले ही विशेष समाधानाची गोष्ट होय. आकोला तालुक्यांतील उगव गांवचें प्रसिद्ध देशमुख रा० रा० मुगूटराव बळवंतराव हे दुसरे गृहस्थ पत्रिकेच्या सरकारी बहुमानाला पात्र ठरले या गोष्टी विषयीं आमच्या जिल्ह्यांतील लोकांस आल्हाद वाटत आहे. राजश्री मुगूटराव हे घरंदाज देशमुख असून बाणीदार, उदारशील, व सार्वजनिक कार्यांत प्रमुख असतात. यांनीं वैद्यक खात्याला आणि मुख्यत्वें करून लेडी डफरीन फंडाला जी मोठी मदत दिली आणि दुष्काळाच्या प्रसंगीं सरकारला मदत केली तिच्या स्मरणार्थ बहुमानाची पत्रिका सरकारानें त्यांस दिली आहे. तिसरे गृहस्थ आकोटचे स्पेशल माजिस्ट्रेट मि. गुलाम हुसेन उर्फ हसूबाबा हे होत. यांच्या सद्‌गुणाबद्दल आकोट तालुक्यांत चांगली विख्याती आहे. यांनीं सरकारी स्पेशल माजिस्ट्रेटी बहुत वर्षें बजाविली आणि तिकडील लोकांची न्यायदानानें मोठी सोय करून दिली इतकेंच नाहीं तर त्यांची देवीखात्याला मोठी मदत आहे आणि तसेंच वैद्यकखातें देखील त्यांच्या उपकृतीबद्दल मोठें ऋणी आहे. सरकारा हुद्याचें पण जोखिमीचें काम यांनीं चांगलें संभाळलें आणि लोकोपयोगी गोष्टीला चांगली मदत केली हें सर्व त्यांनीं सरकारी पैसा न घेतां बहुमानार्थ केलें तेव्हां अशा गृहस्थांस सरकारांतून मान मिळाला हें पाहून सर्वजण मि. हस्सू बाबा यांचा गौरव करितील.

बाळापूरच्या दरबारांत जमलेली मंडळी स्थानापन्न झाल्या नंतर रा. रा. लक्ष्मण गोविंद ओक वकील यांनीं दरबारचा उद्देश कळविला आणि वरील गृहस्थत्रयांचा नामनिर्देश करून त्यांच्या चांगुलपणाची व राजमान्यतेची प्रशंसा केली. दुष्काळा संबंधानें मे० प्रीडो साहेब यांनीं जी जीवापाड मेहनत केली आणि लोकांच्या जीवितांचें रक्षण मोठ्या बहादरीनें केलें त्या बद्दल त्यांचे आभार मानून लोकांच्या वतीनें राजश्री लक्ष्मणराव यांनीं साहेब बहादूरांचा धन्यवाद केला. मे० प्रीडो साहेबांनीं उर्दू मध्यें जमलेल्या मंडळीचे आभार मानून सांगितलें कीं दुष्काळाच्या वेळीं बहुत सभ्य, उदार, व श्रीमान लोकांनीं त्यांच्या कठीण कामाला हातभार लाविला आणि मोठ्या भगीरथ श्रमानें यशश्री संपादून दिली.

या दरबारच्या प्रसंगीं मे० प्रीडो साहेब यांनीं रा० रा० जानू पचरू महार यांस खुर्चीची कितावत दिली. राजश्री जानबा महार हे आपल्या खालच्या वर्गांत फार श्रेष्ट आहेत आणि त्यांच्या संपत्तीचा व्यय त्यांनीं विद्यादानाकडे केला आहे हें विशेष श्रेयस्कर होय. या बहुमानानें त्यांची थोरवी सरकारी टांकशाळेंतून शिक्का मोर्तबासह प्रतिष्ठित झाली ही आनंदकारक गोष्ट आहे.

## राष्ट्रीय सभा,

ईश्वरी कृपेनें पुढील इंदुवारीं दिवसा एक वाजण्याच्या सुमाराला उमरावती शहरीं राष्ट्रीय सभेच्या मंगल कार्यास प्रारंभ होईल. मुहूर्ताचा दिवस अगदीं समीप पोचल्यामुळें सर्वत्र तांबळ उडालेली पाहून मोठा आनंद व कौतुक वाटेल. बहुत महिन्या पासून चिंतिलेला निजध्यासांतला सुसमय आठ दिवसावर आला आहे ह्मणुन फलद्रुप होत असलेल्या आशेच्या उल्लासानें व वीरश्रीनें सर्व लोक राष्ट्रीय सभेच्या कडेकोट सिद्धतेला लागले आहेत.

प्लेगमुळें मोठी भिती बाहेर गांवच्या लोकासंबधानें आहे. मलकापुरास दहा दिवसाचें क्वारंटाईन बसविण्यांत आलें आहे. मलकापुरचे स्टेशन ह्मणजे मुंबई बाजूच्या किंवा जबलपुर बाजूच्या लोकांना वऱ्हाड प्रांताचा दरवाजा होय. प्लेगचे क्वारंटाईनच्या नियमांला राष्ट्रीय सभेची अनूकुळता असन सभेचे चालक गृहस्थ सरकाराच्या कामाला मदतनीस आहेत. राष्ट्रीय सभे निमित्त येणाऱ्या गृहस्थांस त्रास होऊं नये ह्मणून रिसेपशन कमिटीकडून उत्तम प्रकारची व्यवस्था ठेवण्यांत आली आहे. प्लेगाच्या भागांतून येणाऱ्या मंडळीस क्वारंटाईनच्या झोंपडीची दगदग ठेविली नाहीं. कांग्रेसनें निराळी जागा तयार केली आहे व्यवस्थापक लोक पृथक आहेत. मलकापुरचे कांहीं गृहस्थ, आकोल्याहून व उमरावतीहून मुद्दाम कांहीं घडलेले गृहस्थ असे मिळून मलकापूरची व्यवस्था करित आहेत. क्वारंटाईन मध्यें राहण्याची पाळी फार करून येणार नाहीं अशा विषयीं विशेष खबरदारी घेतली जाईल. ज्यांस तपासणीच्या निमित्तानें मुक्काम करावा लागेल त्यांच्या खाण्यापिण्याच्या, वगैरे सर्व प्रकारच्या सोयी उत्तम तऱ्हेनें केलेल्या आहेत भितीचें किंवा दगदगीचें कांहीं प्रयोजन नाहीं. सामानसुमान, आचारी, गडी माणूस वगैरे सर्व योजना पूर्वींच केल्या आहेत. क्वारंटाईनच्या भितीनें राष्ट्रीय सभेला येण्या विषयीं कोणी कांकूं करूं नये ह्मणून मुद्दाम चांगली सोय मलकापुरास केली आहे.

मलकापुरा शिवाय दुसरें कोठें ही वऱ्हाडांत क्वारंटाईन नाहीं. वऱ्हाडच्या मंडळीला हा क्वारंटाईनचा नियम लागू नाहीं. प्रकृती चांगली असली ह्मणजे कांहीं एक काळजी करण्याचें कारण नाहीं. प्रांतांतली मंडळी पुष्कळ जमली पाहिजे. प्रांतस्थ लोकांस कोठेंच मज्जाव नाहीं. बैलगाड्या उमरावतीस नेण्याचा खटाटोप न होईल तितका उमरावतीच्या सुव्यवस्थितपणाला फार आवश्यक आहे सरकारी कामगार राष्ट्रीय सभेला न जाण्या विषयीं लोकांस आग्रह करणार नाहींत. पण जर कोणी शंका घेतली तर ती बेलाशक झुगारून सभेला अगत्य येण्याचें करावें अशी प्रांतस्थ मंडळीस आमची विनंती आहे राष्ट्रीय सभेचा असा हृदयंगम देखावा आपल्या प्रांताला लाधला आहे तर तो पहाण्याची दुर्मिळ संधी दवडूं नये इतकेंच नाहीं तर ला कांनीं आपल्या नेत्राचें वैफल्य होऊं देऊं नये.

---

मद्रासे कडील राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी स्पेशल ट्रेनीनें सभेला येत आहेत. स्पेशल ट्रेनीच्या मुळें त्यांच्या प्रवासाला कोणत्याच प्रकारची हरकत येण्याचा संभव नाहीं. नामदार शंकर नायर व त्यांची इतर मित्र मंडळी याच ट्रेनींत येणार आहे.

---

बाबू डब्ल्यू. सी बानर्जी हे विलायतेहून परत आले असून ते आज रात्रीं उमरावतीस जात आहेत.

---

उमरावतीचा राष्ट्रीय सभेचा मंडप मोठा भव्य, विस्तीर्ण व रमणीय बनला आहे पांच सहा हजार लोकांस बसता येईल एवढा त्याचा विस्तार आहे. अर्धवर्तुलाकृतीची रचना असून प्रेक्षक व प्रतिनिधि यांस सभेचें उच्चस्थाना वरिल पीठ चोहोंबाजूनें सारखें दृष्टीस पडतें. मंडपाच्या दक्षिण बाजूला थोड्या अंतरावर प्रतिनिधिंच्या उतरण्याच्या बराकी बांधल्या असून तेथें टेबल, खुर्ची खाटा वगैरे सामान सुमान बरोबर व्यवस्थेशीर ठेविलें जात आहे. जेवणा खाण्याची सोय निरनिराळ्या जाती साठीं निरनिराळी केली असून ज्ञाती धर्मा प्रमाणें आचारी पाणके स्वतंत्र ठेवण्यांत आले आहेत जेवण्याची व्यवस्था मक्तयानें न देतां कांग्रेसकडून मुद्दाम निराळी करण्यांत आली आहे. कांग्रेसची व्यवस्था सानिटरी कमिशनर डाक्टर लिटल यांनीं पसंत केली आहे. वर्गणी जमविण्याची गर्दी उडाली आहे. वर्गणीदार गृहस्थ उदार मनानें फारशी तखलीफ देत नाहींत ही गोष्ट विशेष आनंदाची आहे. वर्गणी घरोघर मागण्याची सुरुवात नवीन करण्यांत आली असून जी रक्कम मिळेल ती गोळा करण्याचा विचार ठरला आहे. राष्ट्रीय सभेविषयीं लोकांची कळकळ वाढावी, प्रयेक कुटुंबावर तिच्या बद्दल कांहीं कर बसवावा आणि त्या योगानें राष्ट्र कार्याला सर्व लोकांचें एक चित्त करावें असा हेतु घरोघर वर्गणी गोळा करण्यांत धरला आहे वर्गणीची रक्कम अल्प असली तरी तिच्यामुळें

राष्ट्रीय सभेच्या मूलतत्वांचें प्रकाशन उत्तम होईल. ही वेळ अशी आणिबाणीची आहे कीं तिच्या बद्दल सर्व काळजी प्रांतस्थ लोकांत असली पाहिजे. आणि या प्रसंगाला देशभक्तीचें काम बजाऊन, प्रत्येकानें आपलें कर्तव्य बजावलें पाहिजे.

मद्रास, बंगाल, वायव्यप्रांत, पंजाब, मध्य प्रांत, मुंबई इलाख्यांतील कांहीं भाग इत्यादि भागांत राष्ट्रीय सभेला प्रतिनिधी निवडून धाडण्यासाठीं जाहीरसभा झाल्यानें भरत असल्या विषयीं आनंदकारक बातम्या ऐकूं येत आहेत. वऱ्हाडांतही गांवोगांव सभा भरत असून प्रतिनिधींची निवड चालूं आहे.

---

गेल्या मंगळवारीं सायंकाळीं गोरज मुहूर्तावर नागपूर येथील लालबागेंत उमरावतीचे हायकोर्ट वकील रा० रा० बळवंत रामचंद्र अनगळ यांचे धाकटे बंधू रा० रा० गोपाळराव यांचा नासिक जिल्ह्यांतील निफाडच्या कुळकर्ण्यांच्या कुलीन घराण्यांतील एका गत भर्तृकशी पुनर्विवाह झाला. हा प्रसंग साजरा करण्यास तेथील लहान थोर शें दोनशें मंडळी आली होती.

रा० गोपाळराव यांची म्याट्रिक्युलेशन परिक्षा झाली असून ते अद्याप विद्यार्थि दशेंतच आहेत. वधूस ही निफाड सारख्या गांवांत तिच्या स्थित्यनुरूप जितकें शिक्षण (४ थ्या इयत्ते पर्यंत) मिळावें तितकें मिळालें आहे. वराचें वय २०।२२ व त्यास अनुरूप वधूचें ही केवळ १५।१६ वर्षांचें आहे. अर्थात हा विवाह एकमेकांच्या पसंतीनें तर खराच परंतु उभयतांच्या प्रमुख आप्त इष्टांच्या संमतीनें व खटपटीनें घडून आला आहे.

पैठपणीं लग्नसंबंध घडला असून रा० रा० दत्तात्रय भास्कर जयवंत यांच्या अगदीं अलिकडे झालेल्या पुनर्विवाह प्रमाणेंच हा शरीर संबंध सर्व दृष्टीनें चांगला आहे. वऱ्हाडांत ही पुनर्विवाहाची सुधारणा कमी नाहीं हें विशेष समाधानाला कारण आहे.

---

## वतनदारी

पाटील पटवाऱ्यांच्या वतनदारी संबंधानें हल्लीं एक मोठा वादग्रस्त प्रश्न उद्भवला आहे. प्रस्तुतच्या पद्धतीप्रमाणें गांवोगांवचे पाटील पटवारी यांच्या नेमणुका होतात तेव्हां एका कालीं एका गांवीं अनेक कामगार पाटील किंवा पटवारी नेमता येतात किंवा फेरपाळीनें त्यांस कामगिरी देतां येते. तसेंच पाटील पटवारी कारकर्ता नसला तर त्याच्या जागीं मुखत्यारही घेतां येतो. बायकाकडेही वतनदारी चालूं शकते. कोणी वतनाचा हक्कदार अज्ञान असला तर त्याच्या नांवानें वतन करून त्याच्या मोबदल्यांत दुसऱ्याकडून काम करवून घेता येते. या व अशा अनेक सोयी व सवलती सध्यां उपलब्ध आहेत पण त्या यापुढें काढून टाकण्यांत याव्या अशा विषयीं वाटाघाटी चालूं आहेत. नवीन विचारांचें मूळतत्व असें कीं वतनदारी घराण्यांतून काढूं नये पण जो विद्येनें व इतर गुणांनीं लायक असेल त्यास वेतन द्यावें आणि सरकारी कोंम जो उत्तम करील त्यांस वेतन मिळावें सध्यां या पाटीलपटवाऱ्यांच्या वतनदारी संबंधांत चालूं असलेल्या प्रश्नाचें दिग्दर्शन केलें आहे पण पुढें सवडी प्रमाणें या बद्दल साधकबाधक गोष्टींचा विचार करण्याचा आमचा मनोदय आहे लोकांचे अभिप्राय गोळा करण्याच्या हेतूनें मुख्य मुख्य फेरफार ध्वनित केले आहेत प्रांतस्थ लोकांनीं या प्रकरणाचा विचार अवश्यमेव करून सरकारास आपल्या मताची बाजू दाखविली पाहिजे.

---

काल सायंकाळीं येथें जाहिरसभा भरून या जिल्ह्यातर्फे प्रतिनिधी निवडण्यांत आले आणि खालील विषय कांग्रेसपुढें निघावे असा ठराव झाला:—

(१) जुबिली निमित्त महाराणी सरकारचें अभिनंदन.

(२) सध्यांची सरहद्दीवरील लढाई विनाकारण असून प्राणहानी व द्रव्यहानी होते. निदान हा खर्च विलायतच्या खजिन्यातून व्हावा.

(३) दुष्काळ व प्लेग यामुळें यंदाचा लढाईचा खर्च विलायतेहून करावा.

(४) दुष्काळांत सरकारनें दुवा घेतला पण साऱ्याची माफी दिली नाहीं.

[५] ब्रिटिशकाळनी, अमेरिका व परराष्ट्र येथून आलेल्या दुष्काळ फंडाबद्दल आभार मानणें

[६] रायल कमिशन पुढें इंडियन साक्षीदार घेतले ही कृपा होय तरी खालील गोष्टी विचारात घ्याव्या:–

(अ) बजेटावर मतें घ्यावीं, कायदे कौंसिलांतील बिनसरकारी सभासदां पैकीं स्टेट सेक्रेटरीच्या कौंसिलासाठीं सभासद निवडावे. आणि कामन्स सभेच्या पोट कमिटी पुढ इंडियन बजेट निघावें.

(ब) लष्करी खर्च कमी करून पुष्कळ जागीं नेटिवांस नेमावें.

(क) सरहद्दीच्या मोहिमेचा खर्च इंग्लंडावर बसवावा.

(७) मे. ऱ्यांड व एअर्स्ट यांच्या खुनाबद्दल दुःखप्रदर्शन पुनिटीव पोलीस पुण्यावर नको

(८) अराजनिष्ठेबद्दलच्या कायद्यांत सुधारणा करणें.

(९) पोलिटिकल गुन्ह्याची चौकशी हायकोर्टाच्या फुल बेंचापुढें व्हावी.

(१०) दारिद्र्यामुळें जमिनीचा धारा कायमचा करणें

(११) सिव्हील सर्व्हिस परीक्षा इंडियांत घेणें.

(१२) वऱ्हाडासाठीं कायदे व्हाईसरायच्या कौंसिलांत पास व्हावे.

---

राष्ट्रीय सभेचा महिमा कांहीं विचित्र आहे तिच्या संबंधानें मनुष्य इतका स्वैर गुलाम बनतो कीं तो आपला (पोंकळ) मोठेपणा सोडतो, कोणतेंही काम हलकें मानीत नाहीं, आणि ज्यांचें आर्जव करण्याची जरूर नाहीं त्याची मर्जी सुप्रसन्न ठेवितो. ही राष्ट्र सेवा अहंभाव निर्मूल करिते. आणि तिच्या प्रभावानें आमच्या प्रांतांतील पुष्कळ सार्वजनिक लोकें इतर लोकांच्या हृदयांमध्यें पूज्य स्थानाला पोंचले आहेत. अशा राष्ट्रीय संत मंडळीची गणना आह्मी नामनिर्देशानें पुढें योग्य प्रसंगीं करूं. परंतु त्यांचा भलेपणा, देशाभिमान. स्वार्थत्याग इत्यादि गुणांचें ग्रहण करून इतर लोकांनीं त्यांच्या गोष्टीला यथाशक्ती मदत करावी आणि स्वतांसाठीं धन्यवाद संपादावा. आतां राष्ट्रीय सभेच्या समारंभाला पुरे पंधरा दिवसही राहिले नाहींत तर सर्वजणांनीं एक दिलानें व देशाभिमानानें राष्ट्रीय सभेची उभारणी सर्व दृष्टीनें हृदयंगम करावी एवढीच विनंती आहे. प्रांतस्थ लोकांस असा राष्ट्र मेळा पाहण्याची संधी पुन्हा येणार नाहीं तेव्हां उमरावतीस तारीख २७ दिसेंबराला येऊन आपल्या नेत्रांचें साफल्य करून घ्यावें.

---

# The Berar Samachar

MONDAY DECEMBER 20 1897

The present time belies our hopes in many important matters. Recent experiences leave a sad impression upon the people's minds. The Government is benign, benevolent, and well-meaning. But the present policy of administering India is every thing but satisfactory. The liberal policy of Lord Ripon is no longer a guide. It slowly gives way before the new wave of administration. The present policy is like a step-mother. It is more *Anglo Indian* than Indian. The civilizing agencies are too many at work and barbarism, for example, on the frontier is to be put down with costly and ruinous expeditions. Sir White's defence of Frontier wars will guarantee a war against the world if possible. The nation is on the brink of bankruptcy and yet no expenditure on account of administration from England can be curtailed. All things must contribute to make Great Britain grander still. It is then no matter as to how India stands or falls in the scale of other nations. India for India's sake should be the motto and then the British Government will count upon this vast empire as a part and parcel of the British nation. The influences of the new policy of repression can be seen in all departments of administration. We call this new change by the significant name of Imperialism. The main principle is to check the growth of people's representative institutions. The privileges of a living representation are declared to be uncongenial to India. The Local Self Government inaugurated by Lord Ripon stands discredited and we are afraid that new measures of repression will soon follow in the sequal. The Indian journalism has been ably dealt with in the recent criminal prosecutions. Law has been vindicated and public mouth has thus been muzzled effectively. The next step will be to curb the over-flow of public opinion in other channels. Let us hope for the better and be prepared for the worst.

---

In full unison with the *imperialism* of the supreme Government, the Berar Government have been developing a spirit of fault-finding with local bodies. The District Boards have their full share and municipalities come next. The annual report on the municipalities in Berar is full of disappointing resolutions. The Berar authorities admit the work of the year to be a record of progress on the whole but come to decide that election is not really congenial to the native mind. Some municipalities hold too many meetings so as to make attendance a tax on people's time. The Commissioner sees a germ of destruction in the jealousies and bickerings amongst the members themselves. People do not realize the value of municipal life and are not ready to pay taxes desirable for their own sanitary arrangements. Though municipal work is limited in its sphere still the Resident regrets to see such grounds in the conduct of the Karinja municipal committee as will lead him to suppress it altogether. If the threat is simply to teach a lesson and to make municipal bodies to show improvement in the near future we thank the Government for its good intentions. But to confess the truth, this year's report comes as a thunder bolt and signalizes the dangers that are looming in the work of the municipalities.

---

## वऱ्हाड

हवामान—अलिकडे थंडी फार कडाख्याची पडते. सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे. रब्बीचीं पीकें बरीं आहेत. शेतकामामुळें मालमजूरी चांगली मिळते आणि गरीब लोक सुखांत आहेत.

आलिशान रेसिडेंट मि. प्लौडन साहेब यांची स्वारी तारीख २ जानेवारी पर्यंत येणार नाहीं असें आतां पक्कें ठरलें असून त्यांनीं आपला रस्ता शेगांवमार्ग सोडून मुर्तिजापूरमार्गानें ठरविला आहे. तेव्हां साहेब बहादुरांच्या पेशवाईच्या किंवा सरबराईच्या निमित्तानें कोणालाही राष्ट्रीयसभा सोडून वाट पाहत बसावें लागणार नाहीं.

वाशिमचे क्लार्क आफ कोर्ट रा. रा. नारायण रामराव गुप्ते यांच्या ३ महिन्यांच्या रजेंत रा. रा. शिवराव काबळे क्लार्क आफ कोर्ट, बडनेरा यांस नेमून बडनेऱ्यास रा. रा. त्रिंबक नारायण तारे यांस बदललें आहे आणि बुलढाण्याच्या त्यांच्या डिपुटी क्लार्क आफ कोर्टाच्या जागीं रा. रा. रावजी गोविंद दामले यांस नेमलें आहे.

मे. आबर्ड साहेब हे आपल्या पत्नीस आणण्या साठीं मुंबईला गेल्या शुक्रवारीं गेले आहेत.

जानेवारीच्या १ ल्या किंवा २ रे तारखेला उमरावतीस सार्वजनिक सभेच्या आश्रया खालीं, प्रांतिक जाहिरसभा भरविण्याचा संकल्प ठरला आहे. त्या पाटील पटवाऱ्यांच्या वतनदारी संबंधानें सरकारांत जो वादविवाद चालू आहे त्याबद्दल मुख्य विचार करण्यांत येईल.

मलकापूरच्या क्वारंटाईन वरील मेडिकल आफिसर डाक्टर मारिसन हे फार सुशील, सभ्य, व लोकप्रिय असल्यामुळें मलकापूरच्या मेडिकल तपासणीच्या संबंधानें उतारूंस योग्य सुख मिळत आहे.

## आकोला बाजारभाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८८ रुपये |
| जवारी | ५५ रु० |
| गहूं (कांठे) | १२५ रु० |
| ,, (बनशी) | १३० रु० |
| चणे | १०० रु० |
| तेल | ६। रु० मण |
| तूप | ८ मण |
| मीठ | ३।।।= मण. |
| सोनें | २६ तोळा |
| चांदी | ८० |

---

## वर्तमानसार

सरकारी नोकराकडून आपलें काम लवकर किंवा आपल्या फायद्यांत व्हावें ह्मणून त्यांस लांच देण्याचा प्रघात पुष्कळ ठिकाणीं पडला आहे व त्याचा प्रसार इतका वाढला आहे कीं, कित्येक कचेऱ्यांतून कारकून व साधारण अधिकारी सरकारी नोकर कांहीं तरी लांच घेतल्यावांचून काम करीतनासे झाले आहेत. परंतु कायद्यानें लांच देणारे व घेणारे असे दोघेही गुन्हेगार गणले आहेत इकडे जावें तसें कोणाचें लक्ष जात नाहीं, ही मोठी दुःखाची गोष्ट होय. मुंबईतील स्मालकाज कोर्टांत कारकून वगैरे लोकांत लांच खाण्याचा प्रघात अतिशय चालू असल्याची बोलवा आहे. त्याच कोर्टांतील एका विश्वासराव नांवाच्या कारकुनास हुकमचंद नांवाच्या मारवाड्यानें आपलें काम लवकर करण्याबद्दल चार आणे लांच देण्याचा प्रयत्न केल्यामुळें त्यावर काम चालून म्याजिस्ट्रेट साहेबांनीं हुकमचंद शेटजीस एक दिवसाची कैद व ५० रुपये दंड, व दंड न दिल्यास आणखी दोन महिन्याची सक्तमजुरी अशी शिक्षा दिली. शिक्षा देतांना म्याजिस्ट्रेट साहेबांनीं आपल्या ठरावांत ह्मटलें आहे कीं, स्मालकाज कोर्टांतील कित्येक कारकून लांच घेतात, व लांच देणे व घेणें हा एक तेथें रिवाजच पडून गेला आहे. ह्मणून आरोपीचा गुन्हा जाणूनबुजून झालेला नाहीं, व त्यास फारसें वजन देतां येत नाहीं तथापि कायद्याच्या मानानें त्यास सोडतां येत नाहीं. ह्मणून केवळ दयाभूत अंतःकरणानें वरप्रमाणें शिक्षा देण्यांत आली आहे. हें उदाहरण लांच देणाऱ्या व घेणाऱ्या लोकांनीं लक्षात घेऊन, या असल्या नीच गुन्ह्यांत पुन्हा न शिरण्याचा ते प्रयत्न करतील अशी आह्मास आशा आहे.

टेलिफोन, फोनोग्राफ या यंत्राप्रमाणेंच पण त्यापेक्षांही विशेष उपयोगीं पडणारें असें 'तेलाटोग्राफ' नांमाचें एक यंत्र प्रो एलीसा ग्रे नांवाच्या एका विद्वानानें शोधून काढलें असून तें पूर्णपणें काम करतें अशाबद्दलची त्यानें अनुभवशीर खातरीहि केली आहे. हें यंत्र काढण्याचा उद्देश असा आहे कीं, टेलिफोनमध्यें मोठ्यानें बोलावें लागतें व त्यामुळें कोणतीही एखादि खानगी गोष्ट गुप्तपणें कळवितां येत नाहीं. एक मनुष्य दुसऱ्याशीं काय बोलत आहे हें तिसऱ्यास उघड समजूं शकतें. ही त्यांत जबरदस्त उणीव असल्यामुळें वरील यंत्र शोधून काढलें आहे. ह्या यंत्राचे अंगीं असा गुण आहे कीं, ह्याची तार घेऊन आपण इकडे जसें लिहावें तसेंच तिच्या दुसऱ्या टोंकांस लिहिलें जातें यामुळें नकाशा, चित्र किंवा लढाईच्या मैदानाचा प्लान पाहिजे ते ह्या यंत्राच्या साह्यानें जसेंच्यातसें दुसऱ्या ठिकाणीं पाठवितां येतें. एकेक सुधारणा ऐकावी तों आश्चर्यानें मन थक्क होतें. आमच्यांतील विद्वानांचें अशा शोधाकडे थोडेसें जरी लक्ष्य जाईल तरी आमच्या देशास किती फायदा होईल !

स० वि०

सत्पुरुषांचें जीवनचरित्र जसें आश्चर्यजनक असतें, तसाच त्यांचा देहांतप्रसंग ही असतो. कै० वा० पंडित गट्टूलालजी यांच्या अंतकाळचे संबंधानें अशी विलक्षण गोष्ट बाहेर आली आहे कीं—आपलें देहावसान होणार, ही गोष्ट पंडितजीला १० दिवस पूर्वींच कळून आली होती. व त्यावरूनच जरी त्यास दरबारची वरचेवर बलावणी येत असत तरी तिकडे न जातां अवशेष कालाचा सर्व लय इश्वरोपासनेंत लावून ते बसले होते. एवढेंच नव्हे; तर निधनकाल अगदीं घडिपळावर येऊन ठेपला असें त्यांना कळलें, तेव्हां तर ते नेहमींच्या राहत्या वस्तूचा निरोप घेऊन गोशाळेंत गेले. आणि त्या पवित्र स्थानीं त्यांनीं आपला पवित्र देह ठेऊन परलोकमार्ग स्वीकारिला ! सुखाचें मरण व सद्गति ती हीच !

परलोकवासि पंडित गट्टूलालजी यांचें स्मारक करण्याचा विचार मुंबईत सुरूं झाला आहे. तेथील 'आर्य सद्धर्मोदय' सभेनें १ हजार रुपये देऊं केले आहेत.

ना० टिळकांस मुंबईच्या तुरुंगांत बाजरीची भाकर लाविल्यामुळें त्यांचें वजन २३ पैंड कमी भरून हल्लीं ते सिकांत आल्याचें प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्यावर झालेला सरकारचा राग आतां तरी कमी होईल असें वाटत होते; परंतु अजून तसें कांहीं लक्षण दिसत नाहीं. सरकारानें आपणांवर दया करावी ह्मणून टिळकांचेतर्फें अर्ज होणार अशी जी बातमी उठली होती त्यांत कांहीं तथ्यांश नाहीं हें ठरलेंच. वास्तव लोकांनीं तरी त्यांच्या शरीरास होत असलेले कष्ट चुकण्यासाठीं मुंबई सरकारास अर्ज करून त्यास मुक्त करण्याबद्दल विनंती करावी आतां लवकरच जी राष्ट्रीय सभा उमरावतीस भरावयाची आहे, ते स्थान ह्या अर्जाचा विचार करण्यास अगदीं योग्य आहे. त्या सभेकडून असा अर्ज झाल्यास त्याला महत्व येऊन कदाचित् सरकारास कांहीं दया आली तर येईल. निदान त्यांचे कोठ्यास पचेल असें तरी अन्न द्यावें असें त्यास वाटण्याचा संभव आहे. राष्ट्रसभेनें विचाराचे गोष्टींच्या सदरांत ही महत्वाची गोष्ट बहुधा घातली असेलच.

नक्षत्रवृष्टी—पृथ्वीवर दर ३३ वर्षांनीं नोव्हेंबर महिन्याच्या मध्यास अतीशय नक्षत्रपात होत असतो असें ज्योतिर्विदांनीं ठरविलेलें आहे. अशा प्रकारच्या नक्षत्रवृष्टीचा अजब देखावा पूर्वीं सन १८६६ त पाहण्यांत आला होता. त्यानंतर ३३ वर्षें सन १८९९ त ह्मणजे आणखी २ वर्षांनीं भरतात; ह्मणून त्या वर्षीं व त्याच्या पुढील १।२ वर्षांत हा नक्षत्रवृष्टीचा देखावा दृष्टीस पडेल, आणि धूमकेतू ( शेंडेनक्षत्र ) ही उगवेल असें युरोपियन ज्योतिषीबुवांनीं वर्तविलें आहे.

स० शो०

शांतीच्या शमनार्थ कच्छमांडवी येथें एका सधन बाईनें विष्णु याग आरंभिला आहे.

फक्त पाणी पिऊन राहणारा एक साधू हल्लीं मद्रास इलाख्यांतील मेलापूर नामक गांवीं आला आहे ह्मणतात.

सिंध प्रांतांत व वायव्य प्रांतांतील कांहीं भागांत टोळांनीं पिकांना नुकसान पोंचविलें आहे.

खरी उदारता.

ज्यानें आपलें जन्माचें कल्याण केलें आहे त्याच्या पडत्याकाळीं योग्य ती मदत देऊन त्याला सांवरणें हीच खरी कृतज्ञता व उदारता. याच मासल्याचें एक उदाहरण नुकतेंच लंडन येथें घडून आलें आहे. तेथील किंग्सकॉलेजला सुमोंर दोन लक्ष रुपये कर्ज आहे ते एकदम फेडून टाकण्याकरितां त्याच विद्यालयांत शिकून हल्लीं नांवारूपास आलेल्या एका विद्यार्थ्यानें आपलें नांव गुप्त ठेवून १५ हजार पौंडांची रक्कम कालेजच्या कारभाऱ्याचे नांवें पाठवून दिली आहे. आमच्या देशांतही अशा प्रकारच्या पुष्कळच जीर्णसंस्था आहेत पण त्यांचा उद्धार करणाऱ्या अभिमान्यांचीच कायती उणीव आहे.

जपान देशांत जीं नाटकें होतात तीं कधीं रात्रीची होत नाहींत. दिवसासच होतात. आणि तीही आठ तासापेक्षां जास्त वेळ होत नाहींत प्रत्येक प्रेक्षकाला गादी व तक्या बसण्याकरितां मिळतो. तसेंच चिरूट, चहा, भाकऱ्या, भात. मेवा, सिरका व माशांचें सांबारें इतके पदार्थ खाण्यास मिळतांत.

वाघ आणि मगर.

नाईल नदीच्या किनाऱ्यालगतच्या जंगलांत शिकार करणाऱ्या एका शिकाऱ्यानें आपल्या डोळ्यांनें पाहिलेली एक गोष्ट नुकतीच एका इंग्रजी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केली आहे. त्यात तो असें ह्मणतो कीं वाघानें मारून टाकलेल्या एका जंगली रेड्याचे प्रेतावर समुद्रांतील एका बलाढ्य मगरानें हल्ला केला होता, चवताळलेला वाघोबा आपली होती नव्हती तेवढी शक्ति खर्च करून त्या प्रेतास कांहीं केल्या नेऊं देईना. शेवटीं मगरानें त्या प्रेतास सोडून वाघावरच चाल केली. बराच वेळ दोघांची झोंबी चालली आणि अखेरीस तर मगरानें त्या वाघास चित करून फरफर ओढीत समुद्रांत नेले, व जमीनीवर पडलेल्या प्रेतासही समुद्रांत नेऊन त्याला आपलें भक्ष्य केलें. वाघोबा ह्मणविणारांनीं वरील गोष्टीवरून सावध होणें चांगलें.

जपानचा राजा जेव्हां बाहेर निघतो तेव्हां कोणत्याही घराच्या कोणत्याही भागांतून आणि कोणासही त्याजकडे पाहण्याची सक्त मनाई आहे.

भडोच पासून सुरत वगैरेकडे जाणाऱ्या उतारूंच्या २ गाड्या बंद झाल्यामुळें व्यापाऱ्यांचें अतिशय नुकसान होत आहे.

मद्रास येथें २९, वऱ्हाडांत १७ आणि राजपुतान्यांत २८ दुष्काळपीडित माणसें राहिलीं आहेत. पण ही संख्या खरीच आहे कां?

जन्मापासून हातपाय नसलेला एक मनुष्य आपल्या तोंडानें कांचेच्या मण्याची चित्रें व इतर मौजेच्या जिनसा तयार करून विकतो व त्यावर आपले उपजीवन करतो. परमेश्वरानें कोणाचेच अडूं दिलें नाहीं यावरून तरी नास्तिकवाद्यांचा ईश्वर नाहीं असा असलेला गर्व खंडण होईल कां!

गु०

एक विलक्षण बातमीः— खरी आहे काय? गदगच्या सद्वृत्त पत्रांत लिहिलें आहे कीं, हंपी नांवाचें एक क्षेत्र होसपेट पासून ८ मैलांवर—तुंगभद्रा तीरावर आहे. तेथें हंपी विरुपाक्षाचें स्थान आहे. या हंपी विरुपाक्षाला आज पांच सहा दिवसांपासून एक साप वेढा घालून बसला असून देवाची पूजा अर्चाबंद झाली आहे. साप मध्यें कोठें बाहेर गेलेला पाहून पूजारी पूजेला जवळ जातात तों सर्प एकाएकी फोंफावून येतो आणि पुन्हां वेढा घालून बसतो! खरें असेल तर दुश्चिन्ह होय.

पुण्याचे एक पत्रकर्ते ह्मणतात कीं, आज तागाईत बायका— आज कितवा दिवस तुह्माला? असें एकमेकींनां विचारतांना दृष्टीस पडत. सुतका वांचन पुरुषांच्या तोंडीं हें वाक्य ऐकुं येत नसे. पण प्लेगच्या प्रभावानें आज कितवा हो दिवस तुह्माला? असें विचारण्याची पाळी बाप्यानां आली आहे. सेग्रिगेशन क्यांप व क्वारंटाईन यांत ठसठशीत मिशाळांच्या तोंडून वरील बायकांच्या विटाळा संबंधाचें वाक्य पांच पन्नास वेळां सहज ऐकूं येतें!

धा०

लार्ड एल्गिन हे आपलें काम सोडून जातील तेव्हां त्यांचे जागीं लार्ड जार्ज हॅमिल्टन हल्लींचे स्टेट सेक्रेटरी, यांची नेमणूक होईल अशी लोकवार्ता निघाली आहे. ही वार्ता खरी ठरल्यास हिंदुस्थानच्या लोकांचें दुर्दैवच समजलें पाहिजे.

शिंप्यांच्या पोटावर पाय येण्याचे दिवस कांहीं काळानें येणार!— अलीकडे एका शोधकानें आंगांत घालावयाचे कपडे न शिवतां तयार करण्याची नवी कृति शोधून काढली आहे असें ह्मणतात. ह्या कृतीनें शिंप्याप्रमाणें कपड्यांला एकही सांधा लावण्याची गरज उरणार नाहीं. ह्या शोधकानें एक चीक शोधून काढिला आहे, त्याचा दोऱ्याचे ऐवजीं कपड्यावर करावयाचा हा चीक उष्णतेपासून न पघळतां गरमीच्या स्पर्शानें तो अधिक घट्ट होतो! सुधारणेच्या प्रगतीचा हा काळ आहे. त्यांत नवीन कल्पना निघतील तितक्या थोड्याच!

अनुकरणीय निर्धार—पुणें येथें जोशी या उपनांवचे एका दुर्दैवी बाईचा नवरा सुमारें दीड दोन महिन्यापूर्वीं वारला. तिच्या मुलास प्लेगचा आजार होऊन तोही नुकताच हास्पिटलांत वारला. बाईवर अशा रीतीनें आकाशच कोसळलें आणि तिची वृत्ति एकदम परमार्थावर आली. हल्लीं तिचा असा निर्धार झाला आहे कीं, आपलें आयुष्य आतां प्लेगच्या रोग्यांची सुश्रुषा करण्यांत लावावें. बाईचा हा निर्धार अत्यंत प्रशंसनीय आहे.

आनंदकारक बातमी— बाबू रोमेशचंद्र दत्त बंगाल्यांतील पेनशनर सिव्हिलियन जे अलीकडे विलायतेस जाऊन तेथील राहिवासी झाले आहेत, त्यांची लोकोत्तर विद्वता मनांत आणून त्यांची योजना लंडनांतील युनिव्हर्सिटी कालेजांतील हिंदुस्थानच्या इतिहासाचे प्रोफेसरचे जागीं करण्यांत आल्याचें समजतें. विलायतेंत नेटिवाला प्रोफेसरची जागा मिळाल्याचें हें बहुधा पहिलेंच उदाहरण असेल!

न्या० सु०

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवाशी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........८१ ०६

दुसरे खेपेस .... ........८१

Six monthly......... 3 .............. 8 as

Single copy ........................ 4as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......4 as

Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXI AKOLA MONDAY 27 DECEMBER 1897 NO 50

वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख २७ माहे डिसेंबर सन १८९७ इ० अंक ५०

नोटीस

जीवगज गोविदजी अकोला ताजनापेठ यांस नोटीस देणार नाकर्जी गेला दुकान अकोला ताजना पेठ.

नोटिशीनें असें कळवितों कीं तुह्मास आह्मी दुकानाच्या कामावर नोकर ठेविले संवत् १९५२. दुकानचें काम बारदान व दुकानची विक्री देवघेव वगैरे उत्तम रीतीनें जतन करून ठेवावें व याजबद्दल तुह्मांस पहिल्यानदां ११। महिन्याचे रु. १०० शंभर देण्याचा ठराव व त्या शिवाय जेवण. असा ठराव करून तुह्मांस नोकर ठेवलें. त्यांत तुह्मी १० महिनें नोकरी केली त्याजबद्दल तुह्मांस संवत १९५२ मध्यें रु. ५२ दिले बाकी ३६॥।≈। तुमचे देणें. पुढें १९५३ मध्यें ११ महिन्यास ७५ रु. देऊ व शिवाय जेवण देऊ असा ठराव केला. तुह्मी ७॥ महिनेच नोकरी केली. त्यांत १ रु. दिला. तुह्मांस ज्या कामावर ठेवलें होतें तें काम न करतां त्या मुदतींत मालाची तुह्मी देखरेख व वारफेर न केल्यामुळें माल खराब झाला त्याची किंमत १९ रु हा माल ३॥ महिन्यांत खराब केलात व ह्मणून नोकरी कांहीं केली नाहीं. करितां माझी नुकसान झाली ह्मणून तुह्मांस ३॥ महिन्याचा खुराक व पगार आह्मी देत नाहीं. ते रु. ५९०१८६ खुराकासुद्धां झाले. हें सर्व वजा जातां तुमचे कडे आमचें घेणें ४१८६ निघतें. आतां ह्या सर्व व्यवहारांत तुमचें देणें आमचे कडेस ३६॥।-॥। हे सर्व अनामत ठेविले आहेत. लागतील तेव्हां न्यावेत तुह्मी तारीख २०।१२।९७ ची नोटीस दिली ती पावली त्यातील मजकूर सर्व खोटा आहे. तुह्मी विनाकारण गैर हिसाबी फिर्याद वगैरे कराल तर त्याजबद्दलच्या खर्चाची जोखीम कोणचेही प्रकारें आह्मांवर नाहीं. व त्याजबद्दल आह्मास आमचा कामधंदा सोडून जाव जबाब देणे लागल्यास त्याबद्दल सर्व नुकसानी या नोटिशीचे खर्चासह तुह्मा पासून भरून घेतलें जाईल. कळावें तारीख २३-१२-९७ इसवी.

सही

[ गुजराथींत ] नाकर्जीगेला

दस्तुर खुद्द

## डिटेनशन क्यांपचे नियम.

व्यायाम. १ डिटेनशन क्यांप मधील सर्व लोकांस क्यांपचे हद्दी बाहेर उत्तरेकडेस हवा खाण्यास जाण्याकरितां सकाळीं ८॥ वाजल्या पासून ९॥ वाजे पावेतों आणि संध्याकाळीं ४॥ वाजल्या पासून ५॥ वाजे पावेतों दोन वेळा परवानगी देण्यांत येत जाईल.

मित्र. २ क्यांप मध्यें आटकून ठेवलेले लोकांची भेट घेण्याकरितां मलकापूर येथील त्याचे मित्र मंडळीस सकाळचे ७॥ वाजल्या पासून सायंकाळचे ८॥ वाजे पावेतों प्लेग अधिकाऱ्यानीं अगर क्यांपचे सुपरिन्टेडींग आफिसरानीं दिलेल्या पासावरून परवानगी देण्यांत येईल. अशा प्रकारचे पास सुपरिन्टेडींग आफिसर यांजकडेस दुपारचे ११ वाजतां किंवा त्यानंतर अर्ज केल्यास दिले जातील. आणि दीड वाजल्यावर दिले जाणार नाहींत. ज्या लोकांस पास दिले जातील त्यांची नित्य नांववार यादी मेहेरबान पोलीस इन्स्पेकटर यांस दिली जात जाईल. आणि ज्या इसमा जवळ पास नाहीं अशा इसमास क्यांपमध्यें जाऊं दिले जाणार नाहीं हे पास बदलण्याचे नाहींत आणि तसें केल्यास पास रद्द केले जातील.

वाणी. ३ क्यांपचे आंत एक वाण्याचे दुकान असोन त्यांत सर्व प्रकारचे नेहमी लागणारी अन्न सामुग्री सरपणासह आहे. विकत घेणारानीं दुकानांत टांगलेले निरखपट्टी प्रमाणें सामान विकत घ्यावे.

स्वयंपाकाची भांडीं. ४ ज्या लोकांस स्वयंपाकाचीं भांडी लागतील त्यानीं मि. भिमराव मुनसरिम यांस मागितली असता मिळतील आणि सदरहू भांडीं त्या लोकांनीं क्यांप मधून निघून जाते वेळेस परत करावीत.

पोटगी भत्ता. ५ पोटगी भत्ता १९ वर्षांचें वर ज्यांचें वय आहे अशा लोकांस रोज तीन आणे प्रमाणें व १५ वर्षांचे आंत ज्यांचे वय आहे अशा लोकांस रोज दोन आणे प्रमाणें त्यांचे उपजीवना करितां त्यांचें रोजचे मजुरीचे मानानें आणि दुसरें इतर लोकांस ज्यांस जरूरी आहे असे सुपरिन्टेडींग आफिसरांस वाटेल त्या लोकांस दिले जात जाईल.

क्यांप मध्यें आणिलेले लोकांची प्रत्येक टोळी मिस्तर घोडेजी पोलीस इन्स्पेक्टर हे तपासत जातील आणि ज्याना पोटगी भत्याची जरूरी आहे अशा इसमांचीं नावें लिहून तीं नांवें मि. विष्णू नारायण याजकडेस पाठविली जातील. पोटगी भत्ता रोज पहाटेस सुपरिन्टेडींग आफिसराचे समक्ष चुकविला जात जाईल.

हजेरी. ६ दररोज दोन वेळा मेहेरबान पोलीस इनस्पेक्टर यांचें देखरेखे खालीं एकदां सकाळीं ७ वाजतां व दुसऱ्यानदां रात्रीं ९ वाजतां असे दोन वेळां हजेऱ्या घेतल्या जातील.

दिवे काढण्याबद्दल- ७ रात्रीची शेवटची पासिंजर येऊन गेल्यावर क्यांप मधील सर्व दिवे पायखान्याचे आणि पोलिसास जरुरीयात लागणारे दिवे खेरीज करून सर्व विजविले जातील.

आग लागण्याची भीती होईल तितकी कमी करण्याकरितां निरुपयोगी दिवे रात्रीं जळूं दिले न जातील हे पाहण्या करितां पोलिसास कडक हुकूम दिले जात आहेत.

कचेरीची वेळ. ८ सुपरिन्टेडींग आफिसर हे आपल्या क्यांप मधील आफिसांत नित्य ( रविवारी सुद्धां ) पहाटेस ११ वाजतां आणि त्या नंतर येत जातील. ज्यांना भेट घेण्याची इच्छा असेल त्यांना भेटतील आणि क्यांप मधील राहणाऱ्या लोकांच्या कांहीं गाऱ्हाणी, मागण्या अगर सूचना असल्यास त्यांची दाद घेतील.

( Sd. ) T. C. Plowden

सुपरिन्टेडींग आफिसर डिटेनशन

क्यांप मलकापूर

## कळेल पण उमजलें पाहिजे!

७४

प्रिय-- यांस.

उपदेश—आणि तुझा? लाडक्या तरुणा, तुझ्या पत्रानें मला किती तरी आनंद झाला आहे! त्यांत दृष्टीस पडणारा निश्चय, मनाचा थोरपणा आणि असाधारण धीरोदात्त वृत्ति हीं अत्यंत अभिनंदनीय आहेत–या शिवाय केवळ वाग्जाल अगर लेख यांत अनेक वेळ कांहीं अर्थ नसतो हें खरें असलें तरी तुझ्या बद्दल मला आजकालची का माहिती आहे? मग उपदेश तो काय करावयाचा! आपल्यास वाटेल तेंच खरें अशी तुझी वृत्ति आहे असें निदान मी तरी ह्मणणार नाहीं आणि तुला पसंत पडणारी गोष्ट पुढें मागें चुकीची ठरली तरी ती तुजकडून अत्यंत प्रामाणिकपणानें व खऱ्या कळकळीनें होत आहे तर कोणीहि शहाणा मनुष्य तुला दोष देणार नाहीं. ज्यांस तुझी पुरी माहिती नाहीं ते तुजविषयीं वाटेल तीं विधानें करोत–पण मजकडून तसें कधींहि होणार नाहीं....दुर्दैवी तरुणीची गोष्ट निघाली ह्मणजे जिच्यावांचून तुला आणि तुझ्या लाडकीस दुसरा विषयच नसे, तीच विफलजीविता पुरुषांसहि आपल्या धैर्यानें लाजविण्यास तयार झाली आहे व झाली तर तीच तुझा जन्ममित्र होणार हें ऐकून मलाच काय–पण तुझ्या स्वर्गस्थ लाडकीस देखील ब्रह्मानंद होईल. यापुढें पुनः ह्मणून संसारांत पडण्याची तुझी इच्छा नाहीं व असा प्रसंग न येतां तर मी देखील तुला आग्रह केला नसतां; पण कार्य महत्व आणि उदाहरणाची अवश्यकता हीं मनांत आणून तिचे दुःखाचा विचार अगोदर कर. अशा वेळीं स्वतःचे विकारवृत्तीस पार दावून पाहिजे तसे हाल काढावे लागले तरी तिला दुःखमुक्त करण्यास मागेंपुढें पाहूं नकोस. दुसरें लग्न ह्मणजे प्रथम पत्नीवरील खऱ्या आणि पूर्ण प्रेमाचें द्योतक नाहीं असें तूं ह्मणतोस–पण ती जिवंत असतांनाच जर ही तरुणी तुह्मां दोघांसहि प्रिय होती आणि त्याबद्दल तिला कोणत्याहि प्रकारें दुःख होत नव्हतें, तर तिचे मागें या तरुणीस जन्म मित्र केल्यास तिजवर तुझें प्रेम राहणार नाहीं असें निदान मला तर वाटत नाहीं इतकेंच काय, पण तुझ्या स्वभावावरून तिजवरील तुझें प्रेम अनंत काल असेंच राहील अशी माझी खात्री आहे..... सध्यां चालूं असणारे प्रकार, तुझ्या लाडक्या मंडळीस होणाऱ्या शारिरीक व मानसिक यातना आणि यांत अवश्य लागणाऱ्या लोकांची शिथिल वृत्ति हीं अत्यंत संतापजनक आहेत–आणि यांचा विचार करूं लागतांच संतापाग्नि इतका प्रज्वलित होतो कीं अखिल त्रैलोक्याचेंहि त्यापुढें भस्म होईलसें वाटतें.... पण हें निवारणाशक्य आहे असें मनांत येतांच अपरिमित नैराश्याचा पूर्ण पगडा बसून सर्व नाड्या आंखडून जातात! हें महत्वाचें काम हातीं घेण्यामुळें तुला ज्या अनंत मानसिक यातना होत आहेत त्यांची खरोखर कोणासहि कल्पना नसेल....दुर्दैवी तरुणी करितां का होईना–पण तूं मनाचा जो मोठेपणा दाखविलास तो पाहून मला निदान तिची स्थिति मनांत येऊन तरी फार आनंद झाला पण हीच मनाची इतकी क्षुद्रता दाखवून दुसऱ्या कोणी, पवित्र विचारानें भरलेल्या आणि अगोदरच दुःखानें होरपळून गेलेल्या तुझ्या अंतःकरणावर चरके दिले असते. तर मला खरोखर अतिशयच संताप आला असता–आतां पण संताप आला नाहीं असें नाहीं; पण तिच्याकडे पाहून राग गिळणेंच या प्रसंगीं उचित आहे आणि तसें तूं केलें नाहींस तर आजपर्यंतची तुझी बडबड व्यर्थ आहे! आपच्यांत मंडळी घसरतात ती अशाच प्रसंगीं -त्यांचीं कारणें मात्र निरनिराळीं असतात; पण माझ्या मतें बहुतेक कारणें निव्वळ ढोंग असून मावार, खाण्याचें मुख्य कारण केवळ भागुबाईपणा होय! तेव्हां या वेळीं आपली स्थिती आणि त्या कारुण्यमूर्तीची दैन्यावस्था हीं मनांत आणून पुनः संसारशृंखलांनीं बद्ध न होण्याचा निश्चय बाजूला ठेव—समाजाच्या सद्यस्थितींत संन्यासव्रतीनें राहणारी तरुण तरुणी वंद्य होतील हें खरें; पण आजमित्तीस प्रथम तिला दुःखमुक्त करून स्वातंत्र्य देणें आणि मग तिजकडून झाल्यास कांहीं करविणें हें इष्ट आहे. कदाचित् आज बारा वर्षें तिनें वैधव्यांत काढल्यामुळें तुझे मोठमोठे बेत सफल होणार नाहींत—पण निदान तिला कांहीं नच झालें तर तूंच तें करण्याचा यत्न कर. ती आहे त्याच स्थितींत राहिली तर तिजकडून मुलीचें कांहीं होणार नहीं--त्यापेक्षां निदान ती

अद्भुत गोष्ट—दहिवडी पासून चार कोसावर नरवणें ह्मणून गांव आहे, तेथील रानांत १।२ दिवसांपूर्वी समोरें ४०० हात लांब व ६ हात रुंद अशी जमिनीस भगल पडलेली असून ती जास्त वाढत चाललेली आहे अशी हकीगत तिकडून एकास आलेल्या खाजगी पत्रावरून कळते.

बरास लागलेली आग पाण्यानें विझवितांना कशी धांदल उडते व हें करीत असतां दुसरेंहि किती नुकसान हाते हें प्रसिद्ध आहे. आग विझविण्यासाठीं एकानें एक पूड तयार केली आहे. आग लागलेल्या ठिकाणीं ही पूड टाकली ह्मणजे ती त्या ठिकाणच्या आसपासचा आंक्सिजन वायु ( जो ज्वलनास अत्यंत अवश्य आहे तो ) शोषून घेते आणि त्यामुळें आगीचा भडका न होतां कांहीं वेळानें ती थांबते.

शु. सू.

हैदराबाद येथील निजाम सरकार आणि तेथील रेसिडेंट मि० प्लाउडन साहेब यांच्या मध्यें वेबनांव झाला आहे. रेसिडेंट साहेब आणि निजाम सरकारचे मुख्य दिवाण हे एक झाले आहेत आणि त्यानीं हिंदुस्थान सरकारास असें जाहिर केलें आहे कीं, निजाम सरकार फार उधळेपणानें खर्च करितात आणि तेणें करून संस्थानास कर्ज होत चाललें आहे. या आरोपाच्या निरसनार्थ निजाम सरकारांनीं सर्व राज्याची व्यवस्था करण्याचें काम आपल्या स्वताच्या हातांत घेतलें आहे. या नवीन व्यवस्थेच्या योगानें राज्याचा बंदोबस्त चांगला होऊं लागला आहे असें ह्मणतात

बंगाल्यांतल्या एका माणसानें लष्करी स्वाराचा पोषाक मिळविला आणि लटका स्वार होऊन प्लेग आफीसर झाला व लोकांस लुबाडण्याचा क्रम सुरू केला. बरीचशी संपत्ती कमावल्यावर एके दिवशीं पटकन पकडला गेला. लोकें मरताहेत आणि भामटे लुबाडताहेत! म. मि.

अंध कवि पण्डित गटूलालजी हे वारल्याचे दुसरे दिवशीं त्यांची पतिव्रता पत्नीही गत झाली. काय हें प्रेम.

आनाम येथील स्त्रीपुरुष.—आनामचें राज्य ईंडो—चायनीज् द्वीपकल्पांपैकीं पूर्व भागांत आहे. या राज्यांत ६० लाखावर वस्ती असून तेथील स्त्रिया पुरुषाप्रमाणेंच पोषाख करितात. पुरुषाप्रमाणेंच त्या पागोटे वापरतात. त्याचे केंस पुरुषाप्रमाणेंच ठेवलेले असून ते बांधण्याची वगैरे रीति स्त्रीपुरुषाची एकसारखीच आहे. स्त्रीपुरुषाच्या विजारी व स्वच्छ उपरणी घेण्याची पद्धति अगदीं सारखीच आहे. स्त्री पुरुषांचे चेहेरे व शरीर रचना अगदीं एक सारखीच आहे. पुरुषांस दाढी मुळीच नसते. आणि ज्या कोणास मिशा वगैरे असतात ते त्या काढून स्त्रियांचे चेहऱ्या प्रमाणेंच ते आपले चेहरे गुळगुळीत राखतात पाहण्यांत स्त्री पुरुष ही भिन्न समजण्याला साधन, त्याच्या कानांतील डूल आणि हातांतील आंगठ्या, हे आहे फक्त बायकांचे कानांत डूल असून त्या मात्र अंगठ्या वापरतात. पुरुषामध्यें ते दोन्ही अलंकार कोणी वापरीत नाहींत. सीलोन बेटांतील पुरुषामध्येंही पाहणाराला भेद मुळीच दिसून येत नाहीं १८२० वर्षापर्यंतचे पुरुष तर अगदीं स्त्रियांशी सदृश असतात त्यांना मिशा आल्या ह्मणजे मात्र पाहणाराला पुरुष अमुक व स्त्रिया अमुक असें समजून येते बाकी दोघांचेही पोषाख,' केसांची ठेवण वगैरे अगदीं एकसारखी असते असें सांगतात.

बर्जन ( नार्वे ) मध्यें एक कागदाचें देवालय आहे. त्यांत एक हजार माणसें बसूं शकतात. ही कागदी इमारत चुना दही व आंड्यांतील पाढरा पदार्थ ह्यांच्या रसायनाने पक्की बंद करून टाकिली आहे.

सेंटपिटर्सबर्ग मध्यें एक घड्याळ आहे त्याला ९५ तबकड्या आहेत त्यावरून पृथ्वीवरील तीस निरनिराळ्या ठिकाणच्या वेळां समजतात पृथ्वी आणि तारे ह्यांच्या गतीचें ज्ञान होतें.

शेफील्ड--येथील एका चाकू सुऱ्यांच्या कारखान्यांत एक चाकू आहे, त्याला १८९० पाती आहेत दर दहा वर्षांनीं १० पाती त्याला जोडण्यांत येतात. न्या. सिं

दंतकथा--एक मनुष्य उताणा निजला असतांना त्यास जांभई आली व त्याबरोबर त्याची दृष्टी वर आढ्याकडे गेली, तों तेथें एक पाल बसलेली त्याच्या दृष्टीस पडली. मनुष्यास जांभई आली ह्मणजे तोंड वासलें जातें व डोळे बंद होतात, त्याप्रमाणें त्याची जांभई पुरी होण्यापूर्वीं ती पाल चटकर नाहींशी झाली जांभई पुरी झाल्यावर आढ्याकडे तो मनुष्य पाहतो तों तेथें पाल नाहीं! पाल आतां होती व इतक्यांत ती नाहींशी झाली यावरून ती जांभईबरोबर आपल्या तोंडांत खास पडली अशी त्याच्या मनाची खातरी झाली! मग काय, आपण आतां खास मरणार असें त्यास वाटू लागलें! व तेव्हां पासून तोच त्यास हृद्रोग लागला! अन्न बंद झालें, ताप येऊं लागला, डोकें दुखू लागलें! सारांश क्षयरोग्याप्रमाणें त्याची अवस्था झाली. पुष्कळ औषधोपचार केले, वैद्य दाक्तरांची शिकस्त झाली, तथापि तो रोगी बरा होण्याची आशा दिसेना! शेवटीं एका चाणक्ष वैद्याची व रोग्याची गांठ पडली त्यानें रोगाचीं सर्व कारणें व त्यावर आजपर्यंत कोणाकोणाचे काय काय उपाय केले ते सर्व विचारून घेतलें व तेवढ्यावरून त्याची खातरी झाली कीं, हा कांहीं रोग नसून नुसता मनाच्या भीतीचा प्रकार आहे. तेंव्हा त्यानें त्या रोग्यास केव्हांपासून व कोणत्या कारणापासून तुझ्या प्रकृतींत अस्वस्थता उत्पन्न झाली असा प्रश्न केला. रोग्यानें पालीची सर्व हकीकत सांगितली. ती ऐकतांच त्या चाणाक्ष वैद्यास रोग्याचें कारण तेव्हांच समजलें. त्यानें रोग्यास आश्वासन दिले व उद्या तुझ्या पोटांतील पाल काढून टाकतों असें तो ह्मणाला. दुसरे दिवशीं त्या वैद्यानें एक पाल मारून आपणाबरोबर घेतली व त्य रोग्यास एक उलटीचें औषध दिलें. उलटी होतांच त्यास न कळत त्यानें त्याच्या उलटींत ती पाल टाकून दिली, व 'ही पहा पाल बाहेर पडली खरी' अशी त्याच्या मनाची खातरी करून दिली झालें. रोग्याच्या मनांतील भीति नष्ट होतांच त्यास आराम पडला व थोड्या अवकाशांतच तो चांगला झाला पण तो चाणाक्ष वैद्य त्यास न मिळता, व त्याच्या मनांतील भीति दूर न होती. तर तो रोगी त्यांतच मरण पावला असता! अशाच प्रकारें हल्लींच्या प्रसंगीं प्लेगच्या खऱ्या रोगापेक्षां तन्निवारणार्थ सरकाराकडून घेण्यांत येत असलेल्या उपाया बद्दल लोकांचें मनांत जी निष्कारण भीति बसली आहे त्या भीतीनेंच कित्येक लोक घाबरत असावेत; आणि असें जर होत असेल तर लोकांची भीति दूर करणें हा हा सर्व उपायांत पहिला व महत्वाचा उपाय आहे.

टिळकांनीं आपल्या एका मित्राकडून सटिक ऋग्वेद मागविला आहे व कांहीं वैदिक व ज्योतिषशास्त्राची पुस्तकें वाचण्याचाही त्यांचा विचार आहे. हे सर्व ग्रंथ वाचून त्यांच्या 'ओरियन' नांवाच्या पुस्तकांत अपूर्ण राहिलेल्या पुष्कळ गोष्टींचा खुलासा करून त्या लिहून काढण्याचा व शेवटास नेण्याचा त्यांचा मनोदय आहे! थोर पुरुषा संबंधानें जें जें एकावें तें सर्वच विलक्षण!

आमचें हें धर्मराज्य आहे. ईशभक्तिसारखें आरोग्यसंरक्षणास दुसरें साधन नाहीं आपल्या पुराणांतरी परमेश्वराच्या नांवानें लक्षावधि न होण्या सारख्या गोष्टी झाल्याचें आपण ऐकिलें आहे. तेव्हां सग्रिगेशन, हॉस्पिटल यांसारख्या हजार खटपटींत न पडतां आमच्या सरकारांनीं स्वच्छतेचा जो क्रम टेवला आहे तेवढा मात्र चालू ठेऊन जागोजाग मोठमोठीं हवनें सुरू करावी, लघुरुद्र, महारुद्र, सप्तशतीचे पाठ, इत्यादि प्रकारें ईश्वर नामाच्या जयघोषानें सर्व शहर दुमदुमून सोडावें. प्रत्येक घरधन्यास आपलें घर सडासंमार्जनादि विधीनें रोज स्वच्छ करून आपापल्या दारापुढें लहान मोठें हवन करून रोज अग्निदेवतेची पूजा करण्याबद्दल आज्ञा करावी. ह्या दिवसांत कोणी मेल्यास त्याच्या प्रेताची अवहेलना न करतां प्रेतापुढें धूप कापूर जाळीत व अबिरादि सुवासिक द्रव्यें त्यावर उधळीत त्यास होईल तितक्या चपळाईनें दहन करावें, आणि त्या अग्नींत शेर सवाशेर तरी कापूर टाकावा. शहरांतील वस्तीचे भाग पाडून त्या दरेक भागाच्या लोकांस आळीपाळीनें शहराबाहेर बागांमधून व मोकळ्या हवेंतून उजळणीस जाण्यास सांगावें. वनदेवतांची पूजा करवावी. सारांश लोकांचीं मनें उल्हासवृत्तींत राहतील व त्याजकडून अनायासे स्वच्छता राहून आरोग्य संरक्षणाचे अनुकरण होईल असे उपाय अंमलांत आणलें असतां खातरीनें हल्लींच्या उपायांपेक्षां पुष्कळपट अधिक फायदा होईल.

बडोद्यास कोणा एका थोर गृहस्थाची गाडी कँपच्या रस्त्याच्या बाजूनें कामाठी बागचे झांप्याचे आंतील रस्त्यानें भरधांव जात असतां एक दहाबारा वर्षाची मुलगी रस्त्यानें जात होती. तिला अकस्मात गाडीचा धक्का लागून बरीच इजा झाल्याचें समजतें.

सरहद्दीवर गेलेली ब्रिटिश फौज तेथें पुरुखा झाडण्याकरतां गेलेली नाहीं, तर शत्रूचा पराजय करून विजयश्रीची माळ इंग्रजसरकारच्या गळ्यांत अडकविण्याकरतां गेली आहे. असें असतां गोऱ्या सैन्यानें काळ्या शिपायांना पाण्यांत पहोंचे आणि तेही ते उत्तम लढतात ह्मणून! हें चांगलें नव्हे काळे शिपाई चांगले लढून जें यश मिळवितात तें तर गोऱ्याच्याच पदरांत पडतें ना! मग त्यांचा हेवा करण्यांत काय फलप्राप्ति होणार? रा० वि०

डिसइन्फेक्टंट पासून रोग प्रतिबंधास किती मदत होते याची आह्मास बरोबर कल्पना नाहीं. तथापि सार्वजनिक आरोग्यदृष्ट्या प्रवाशांस व त्यांच्या कपड्यालत्त्यास डिसइन्फेक्ट करणें अवश्य असल तर ते एकाद्या विवक्षित स्टेशनावर करूं नये त्यापासून प्रवाशांस विनाकारण खोटी होते. असें स्नान घालणें अत्यावशकच असेल तर ज्या ठिकाणीं क्वारंटाइन असेल त्या ठिकाणीं स्नान घालण्याची व्यवस्था करावी. हल्लींच्या रीतीप्रमाणें प्रत्येक जातीच्या पुरुषांकरितां व स्त्रियांकरितां एक एक पीप भरून ठेवलेलें असतें व त्यांत बुचकळतात यामुळें तें शुद्धिस्नान न होतां अमंगळ स्नान होतें. यासाठीं डिसइन्फेक्ट करणारे पाणी प्रत्येकांस निरनिराळें देण्याची व्यवस्था करावी.

विधवा पुनर्विवाह—गेल्या मंगळवारी श्री. नवलोजीराव दाहासाहेब गुजर यांच्या लाल बागेंतील बंगल्यांत एक पुनर्विवाह झाला. हा पुनर्विवाह वैदिक धर्मप्रमाणें यथा साग करण्यात आला याबद्दल आह्मास फार संतोष वाटतो. वर उमरावती येथील वकील रा. रा. बळवंत रामचंद्र अनगळ बी. ए. एल. एल. बी. याचे कनिष्ठ बंधु रा. रा. गोपाळराव अनगळ हे असून वधु मथुराबाई ही होती. वराचें वय समारें २१ वर्षाचें असून वधूचें वय १६ वर्षाचें आहे. मथुराबाईची माहेरची व सासरची मंडळी नासिक जिल्ह्यात व मध्यप्रांतात असून प्रांतील किल्येकांच्या संमतीनें व साहाय्यानें हा पुनर्विवाह झाला ही एक विशेष गोष्ट आहे. मथुराबाईचा प्रथम विवाह तिच्या वयाच्या दहाव्या वर्षी झाला असून नंतर थोड्याच महिन्यात तिला वैधव्य प्राप्त झालें. अशा प्रकारचे पुनर्विवाह होऊं लागल्यास ते लोकसंमत होऊन त्याची उत्तरोत्तर वृद्धी होत जाईल. न्या.सु.

एका मेल्या माशाची पुढील गोष्ट प्रसिद्ध झाली आहे. एका मोठ्या जहाजाचा तांडेल आपलें गलबत जावा बेटांतून अमेरिकेत नेत होता. मोठ्या दर्यात तें जहाज झोकांनी चाललें असतां व जहाजाचा मुख्य तांडेल हातात सुकाणु धरून आनंदानें पडला असतां एकाएकीं जहाजास फार मोठा धक्का बसला आणि लागलीच जहाजावर जी तक्तपोशी केलेली असते तिजवर फार मोठा असा कांहीं तरी पदार्थ पडल्याचा आवाज झाला. हा असा प्रकार होतांच आमचे तांडेलसाहेब कावरे बावरे होऊन या प्रकाराचें कारण शोधूं लागले जिकडे तिकडे पाहातां जहाजास कांहीं इजा वगैरे झाली नाहीं असें आढळलें. पण इतक्यांत त्या जहाजावरच्या तक्तपोशीवर जों नजर गेली तों तेथें १२ फूट लांबीची माशाची एक शेंपटी पडली आहे असें आढळलें. लागलीच नावाड्यांनीं मोठाल्या दोरखंडानी त्या शेपटीस बांधून टाकलें अर्थात तो भयंकर मासा त्या खलाशांच्या भक्षस्थानी पडण्यास आयतांच सांपडून मेला अ.द.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवाशी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.